
# डॉ. लिली जोशी



RLI BK-0029428

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास
७६
२९४२९
२७।२।९८

भू-प्रवास

संदर्भ
भू-प्रवास
७६
२९४२९
२७।२।९८

# मसाईच्या देशात

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे**

सूचना खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे तसे न केल्यास घटना नियम क्र ५ (६) नुसार प्रतिदिनी २५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल (किमान दंड १ रुपया घेतला जाईल)

| | |
|---|---|
| - 1 APR 1998 | 30 MAY 1998 |
| १३।५।९८ | १२।८।९८ |
| १६।५।९८ | १।१०।९८ |
| ३०।६।९८ | २८।१०।९८ |
| १५।६।९८ | १६।१२।९८ |
| १।७।९८ | ३०।१२।९८ |
| ११।८ | २८।१।९९ |
| १५।८ | १५।३।९९ |
| ३०।६।९९ | २१।४।९९ |
| २३।१०।९९ | २६।५।९९ |
| | -१७।७।९९ (क्र मा पहा) |
| | ३।११।९९ १४००/११-९५ |

८ ९६ जोशी

ISBN–81–900073–89–9

श्री प्रकाशन क्र ९० / नोव्हेंबर १९९६

**प्रवासवर्णन**

**प्रकाशिका / मुद्रक :**

सौ प्राची प्रदीप चिकटे
गोकुळ मासिक प्रकाशनाकरिता
११९४, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
दूरध्वनी . ४७८०५५ / ३५३३६१

© डॉ लिली जोशी

आवृत्ती पहिली / शके १९१८ / सन १९९६

**अक्षरजुळणी :** समर्थ एंटरप्रायजेस, पुणे

**मुद्रण-स्थळ :**

जगम कलामुद्रण, पुणे

**मुखपृष्ठ :** सचिन जोशी

**मूल्य : साठ रुपये फक्त**

नरेंद्रास,
ज्याच्या साथीनं
देशविदेश पाहिले
असा 'हमसफर'

# अनुक्रमणिका


१ आफ्रिका एक कृष्णखड . . . १

२. जाबो ब्वाना, कारिबू. .. ५

३. दि ग्रेट रिफ्टव्हॅली-निस्सावा हसा . . २७

४ लेक नैवाशा कंट्री क्लब . . ... ....... , .. ... ३०

५ मसाईमारा . द बिग फाइव्ह .. . . . . . . . . .३४

६ बलून सफारी आणि शॅंपेन ब्रेकफास्ट . . . . . ४४

७ बळी तो कान पिळी . . . . . . . . .५४

८ मसाईमाराला रामराम - चलो मोंबासा . . . . . ५७

९ गेले पाहायचे राहून .. . . . . .६४


●○●

# मनोगत

शाळकरी वयात आफ्रिकेची पहिली ओळख झाली ती 'टारझन' या पुस्तकातून अवीट गोडी असणाऱ्या या पुस्तकाची मी तेव्हा किती पारायण केली असतील! टारझन, काळी माकडीण, टबलट, करटक सगळी जिवत पात्र-एप् वानराच्या टोळीचे हे सदस्य खरेखुरे वाटत शाळेत असतानाच 'हातारी' हा अप्रतिम सिनेमा पाहिला नदीवर आघोळीला निघालेली हत्तींची राग, मागे ती 'हातारी'ची प्रसिद्ध सगीताची धून - सगळ अजून आठवणीत आहे

त्यानतर थोड्या मोठ्या वयात 'ब्यूटिफुल पीपल हा कलाहारी वाळवटातल्या जीवसृष्टीवरचा उत्कृष्ट सिनेमा पाहायला मिळाला आणि खऱ्या अर्थान आफ्रिकेच्या वन्यजीवनाबद्दल कुतूहल निर्माण झाल त्यात भर घातली जॉय ॲडमसनच्या 'बॉर्न फ्री' पुस्तकान - आणि त्या पुस्तकावरून काढलेल्या सिनेमान पोटच्या मुलीसारखी वाढवलेली एल्सा सिहीण तिच्या नैसर्गिक जीवनपद्धतीत सामावली जावी म्हणून लेखिकेन केलेली धडपड मनाला स्पर्श करून गेली

दक्षिण आफ्रिकेत जन्मलेल्या आणि आफ्रिकन भूमीवर प्राणापलीकडे प्रेम करणाऱ्या विलबर स्मिथन आफ्रिकेच्या पार्श्वभूमीवर डझनावारी पुस्तक लिहिली आहेत अशा पुस्तकात मानवी पात्र अनेक असली, तरी या पुस्तकाचे खरे नायक तिथले वन्य पशूच आहेत अस जाणवत 'Elephant Song' 'Leopard Hunts In Darkness' अशा शीर्षकातूनही लेखकाच भावविश्व तिथल्या जीवसृष्टीत किती गुतलेल आहे याची कल्पना येते विल्बर स्मिथन आफ्रिकेच्या शूर आणि स्वाभिमानी आदिवासींचा परिचय करून दिला. तिथल्या भौगोलिक, आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीच दर्शन घडवल

आयुष्याची अनेक वर्षं एकेका प्राण्याच्या अभ्यासात खर्च करणाऱ्या, आणि त्या प्राण्याच सरक्षण-सवर्धन हेच जीवनध्येय मानणाऱ्या जेन गुडाल, डायन फॉसी, ॲना मर्झ वगैरेंच्या कार्याची माहितीही हळूहळू मिळत गेली कुतूहलाच रूपातर उत्सुकतेत, आणि उत्सुकतेच रूपातर जिज्ञासेत झाल कधी ना कधी आपल्याला वन्यप्राण्याच्या नैसर्गिक वसतिस्थानात जाऊन त्याना निदान न्याहाळता येईल का? असा विचार मनात घोळू लागला

प्रवासाची मनापासून आवड आणि बहुधा पत्रिकेत प्रवासाचा बलवत्तर योग असल्यामुळे आजवर देशात आणि देशाबाहेर अनेक ठिकाण पाहिली

मराठी माध्यमातून शिक्षण त्यामुळे प्रवास करतानाच रोजच्या रोज काय पाहिल आणि ते पाहून काय वाटल याची नोंद मराठीत करून ठेवत असे परतून घरी आल्यावर नातेवाईक आणि मित्रमडळी याना छायाचित्राबरोबरच मी लिहिलेल प्रवासवर्णनही वाचून दाखवत असे

गेल्या काही वर्षांत नेदरलँडमधील ट्यूलिप्सचा बहार, स्वित्झर्लडमधील इटरलाकेन हे नितातसुदर स्थळ, इग्लडमधील लेक डिस्ट्रिक्ट यावर लिहिलेले छोटे लेख प्रसिद्ध झाले आणि ते आवडल्याच अनेकानी आवर्जून सागितल

गोकुळ मासिक प्रकाशनाच्या सौ प्राची चिकटे आणि श्री प्रदीप चिकटे यानी मी नुकत्याच केलेल्या आफ्रिकन सफारीवर लिहिण्याचा अतिशय आग्रह केला आणि खरोखर त्याच्यामुळेच मी हे छोटेखानी पुस्तक लिहिण्याच धाडस केल आहे

केनियातली आमची 'किली सफारी' हा एक अत्यत आगळावेगळा आनददायक अनुभव होता आमचा गाइड बार्नी याच्याबरोबर गप्पा मारताना, तसच प्रत्येक ठिकाणच्या म्युझियम्सना भेट दिल्यामुळे तिथल्या अनेक मनोरजक लोककथा ऐकायला मिळाल्या अनेक वर्षं नैरोबीत वास्तव्य केलेली माझी मैत्रीण सौ विद्या सर्वदे आणि लुसाका-झाबिया इथे राहिलेली सौ वीणा नलावडे यानी अत्यत प्रेमान आणि उत्साहान मला तिथल्या समाजजीवनाची माहिती दिली अनेक छायाचित्र, लाकडी कोरीव वस्तू, चित्र वगैरे गोष्टी उदारपणे देऊ केल्या, त्याचा निर्देश केल्याशिवाय राहवत नाही Sketch Book of Africa हे माहितीपूर्ण दुर्मिळ पुस्तक सौ भृगुवार याच्याकडून मला पाहायला मिळाल तर माझी भाची डॉ स्मिता झावरेन तत्परतेन The Land And Wild Life Of Africa हे पुस्तक सदर्भासाठी मिळवून दिल माझ्या प्रवासी नोट्सवर आधारलेला मजकूर पुस्तकरूप देण्यासाठी तसा कमीच होता परतु वेगवेगळ्या सदर्भग्रथामधून वेचक आणि वेधक माहिती गोळा करून तसच Londolozi Corporation च्या अप्रतिम सुदर Wild Life Cassettes पाहून मी हे पुस्तक वाचनीय करण्यासाठी प्रयत्न केला आहे

माझे सर्वांत जवळचे मित्र आणि टीकाकार माझे पती नरेंद्र, आणि मुल केदार आणि मानसी यानी या प्रोजेक्टमध्ये मला सातत्यान प्रोत्साहन दिल आहे

पहिल फूल, पहिल मूल, तसच पहिल पुस्तक! तीच उत्कठा, तोच आनद वाचकापुढे ठेवताना तीच धास्ती

डॉ लिली जोशी

भू-प्रवास
१९६
२१४२८
२७।२।९८

## आफ्रिका एक कृष्णखंड

१

आफ्रिकेला कृष्णखड म्हणतात (Dark Continent) याच कारण केवळ तिथ कृष्णवर्णीय राहतात एवढच नाही ज्या भूमीवरची रान, पशुपक्षी, माणस याबद्दल बाह्य जगाला फारस काहीच माहीत नव्हत, अशी अज्ञात, अपरिचित, अधकारात बुडालेली भूमी म्हणजे कृष्णखड

आफ्रिका हे एक अतिप्राचीन विस्तीर्ण पसरलेल पठार आहे सुमारे ६० दशलक्ष वर्षांपासून त्यात फारसा बदल झालेला नाही इथल्या भौगोलिक परिस्थितीच दक्षिण अमेरिकेशी विलक्षण साम्य आहे हे दोन्ही खड दक्षिणेकडचे, दोन्हींच्या मधून विषुववृत्त जात, दोन्ही उत्तरेच्या सीमेवर इतर भूभागाशी जोडलेले आणि बाकी सर्व दिशाना समुद्रान वेढलेले अस असूनही आफ्रिकेच दळणवळण इतर जगाशी दक्षिण अमेरिकेच्या मानान आधीपासून चालू झाल हे निश्चित।

आफ्रिकेतले बरेचसे पर्वत ज्वालामुखीच्या उद्रेकातून तयार झालेत उदा माऊट केनिया, माऊट मेरू, अल्गॉन, कॅमेरून वगैरे इथला सर्वोच्च पर्वत किलीमाजारो हा ज्वालामुखीच आहे

आफ्रिकेतली ज्वालामुखींची प्रक्रिया अजूनही चालूच असते आणि याचा परिणाम म्हणजे इतरत्र कुठेही न दिसणारी ४००० मैल लाबीची पृथ्वीच्या कवचाला पडलेली भेग किंवा चीर भूस्तर विरुद्ध दिशेन ओढले जाऊन मध्येच खचलेल्या या भेगेला इथे The Great Rift म्हणतात मोझाबिकपासून एशिया मायनर पर्यंत दक्षिणोत्तर पसरलेली ही Rift शेकडो ते हजारो फूट खोल आहे आणि आफ्रिकेची अनेक प्रसिद्ध सरोवर याच Rift मध्ये सापडतात रुडॉल्फ, अल्बर्ट, किवू, न्यासा ही त्यातली काही नाव विस्तारात जगातल दुसऱ्या क्रमाकाच सरोवर लेक व्हिक्टोरिया या Rift च्या एका बेचक्यात आहे (पहिला क्रमाक लेक सुपीरियर) आणि खोलीमध्येही दुसऱ्या क्रमाकावर असलेल लेक टागानिका Rift valley मध्येच आहे

१९ व्या शतकापर्यंत हे कृष्णखड शेकडो किंवा हजारो वर्षांपूर्वीपासून

जस अनाघ्रात, अ-नागर होत तसच राहिल इथले वन्यपशू मानवापासून पूर्ण सुरक्षित, मुक्त, स्वच्छंद जीवन जगत होते आपापल्या वशाच सवर्धन करीत होते इथले आदिवासी अगदी पहिल्यापासून जसे राहात आले तसेच छोट्या झोपड्या बाधून, धनुष्यबाण आणि भाल्यान शिकार करीत आणि जनावराच्या कातड्याची वस्त्र वापरीत निर्भयपणे जगत होते मणी आणि धातूच्या तारानी बनवलेले दागदागिने आणि झाडाचा चीक कुरळ्या केसाना लावून केलेल्या चित्रविचित्र केशरचना यानी स्वत ची शरीर सजवीत होते त्याच्यात टोळीयुद्ध व्हायची हरलेल्याच्या बायका आणि गुरढोर सर्रास पळवली जायची प्राण्याची शिकार होत असे फक्त उदरभरणासाठी या सर्व गोष्टी त्याच्या जीवनप्रणालीचा एक भागच होत्या

सर्वस्वी जगलचे कायदेकानून पाळणाऱ्या अशा भूमीवर हळूहळू गोऱ्या माणसान प्रवेश केला जे आपल्या देशात १६ व्या शतकात झाल तेच ३०० वर्षांनी आफ्रिकेत झाल प्रथम समुद्रकिनाऱ्यावरची नैसर्गिक बदर गोऱ्याच्या नजरेत भरली इथ धाडसी दर्यावर्दी युरोपियन खलाशी आपापल्या राजेराण्याच्या आशीर्वादान जहाजाचा नागर टाकू लागले व्यापाराच्या मिषान आफ्रिकन कृष्णखडात पाऊल टाकणाऱ्या युरोपियनाच्या हृदयात आपापल्या साम्राज्याचा विस्तार करण्याची आकाक्षा जागृतच होती साहस, युद्धकौशल्य, मुत्सद्दीपणा आणि राजनिष्ठा हे गुण त्याच्यात होतेच

जेव्हा दक्षिण आफ्रिका डच बोअर्सनी पादाक्रात केली, पोर्तुगीजानी मोंबासा काबीज केल फ्रेंचानी अल्जेरियाचा घास घेतला त्याच सुमारास ब्रिटिशानी पूर्व आफ्रिकेत पाय रोवले आणि एकामागून एक हजारो एकर जमिनी ताब्यात घ्यायला सुरुवात केली इथ स्थायिक होऊ पाहणारे लोक या जमिनींची नाममात्र किंमत ब्रिटिश साम्राज्याकडे चुकवीत होते. इथल्या आदिवासी जमातींच्या मूलभूत हक्कापासून त्याना वचित करण्यात येत होत याची जाणीवही खूप वर्षांत त्याना झाली नाही आपल्यावर आक्रमण करणाऱ्या परकीयाची पर्वा न करता, आपल्या सनातन पद्धतीनच ते आदिवासी जगत राहिले

१८७७ साली झाजिबारच्या सुलतानान ब्रिटिशाना व्यापाराची सवलत दिली त्यानतर केवळ ११ वर्षांत भारतातल्या ईस्ट इडिया कपनीच्या धर्तीवर, पूर्व आफ्रिकेमध्ये इपीरियल ब्रिटिश ईस्ट आफ्रिका कपनी स्थापण्यात आली

हळूहळू किनाऱ्यापासून आत २०० मैलापर्यंत वेगवेगळ्या आफ्रिकन जमातींशी सलोखा करीत ब्रिटिशानी आतपर्यंत मजल मारली ऐतिहासिक महत्त्वाची 'युगाडा रेल्वे' १८९८ मध्ये मोंबासापासून नैरोबीपर्यंत सुरू झाली या रेल्वेच काम करण्यासाठी प्रथम भारतीय मजूर व मागाहून व्यापारी आफ्रिकेला पोचले या वेळी केनियामध्ये (पूर्वीची ब्रिटिश ईस्ट आफ्रिका) वन्य जीवाची एवढी समृद्धी होती की रेल्वेलाइनवर झेब्रे-जिराफाचे मोठमोठे कळप येऊन उभे राहात शेळ्यामेंढ्याना हाकलाव तस त्याना हाकलाव लागे 'Man Eaters of Tsarvo' या पॅटरसनच्या पुस्तकात असा उल्लेख आहे, की धावत्या आगगाडीच्या डब्यात सिहान दारातून प्रवेश केला आणि एका प्रवाशाला जबड्यात पकडून त्यान खिडकीतून बाहेर उडी टाकली

आफ्रिकेचा हा राजकीय इतिहास काहीसा विस्तारान लिहिण्याच कारण एवढच, की या परकीय आक्रमणामुळे तिथल्या वन्य जीवनावर कमालीचा परिणाम झाला प्रथम स्वत च्या सरक्षणासाठी, खाद्य मिळवण्यासाठी व नतर एक खेळ म्हणून प्राण्याची सरसकट कत्तल होऊ लागली मोठमोठ्या जनावराना मारण्याला 'Game' म्हणायची पद्धत इग्रजाचीच त्सेत्से माशाचा नायनाट करण्यासाठी हजारो प्राणी मारले गेले हस्तिदतासाठी हत्ती, पिसासाठी शहामृग, कातड्यासाठी हरीण, चित्ते, बिबळे, सुसरी याचा बळी जाऊ लागला परिणामी प्राणिजीवन नष्टप्राय होऊ लागल

आफ्रिकेच्या शोध-मोहिमावर जाणारे साहसी प्रवासी सहसा जलमार्गान जाण पसत करीत नाईल, नायजर, झाबेझी, कागोसारख्या महानद्या आणि लेक व्हिक्टोरिया - टागानिकासारखी विस्तीर्ण सरोवर आणि त्याच्या आसपासचा भूप्रदेश ही प्रथम शोधाची ठिकाण बनली

आफ्रिकेच कृष्णखड बाह्य जगतापुढे प्रकाशात आणणाऱ्यामध्ये डॉ डेव्हिड लिव्हिंग्स्टोनच नाव अग्रहक्कान घ्याव लागेल मूळचा स्कॉटिश मिशनरी असलेला डॉ लिव्हिंग्स्टोन वृत्तीन कमालीचा साहसी आणि जिज्ञासू होता कृष्णवशीयाच्या गुलामगिरीला पायबद घालण्याच्या उदात्त हेतून त्यान प्रथम आफ्रिकेत पाय ठेवला उणीपुरी ३५-४० वर्ष त्यान आफ्रिकेत काढली सातत्यान नव्यानव्या जागा शोधून काढताना त्यान झाबेझी नदीच्या मुखापर्यंत मजल मारली आणि डोळे दिपवणाऱ्या व्हिक्टोरिया फॉल्सचा तसच लेक न्यासाचा शोध लावला न्यासालॅडमध्ये एकदा लिव्हिंग्स्टोनन २ मैलाच्या परिसरात ८०० हत्ती मोजल्याचा

उल्लेख आहे प्रवास करताना तो आदिवासींशी दयाळूपणान वागे त्याच्यात मिळून मिसळून जाई एकदा सिंहाच्या हल्ल्यात तो जबर जखमी झाला एकदा ३ वर्षं तो आफ्रिकन 'बुश' मध्ये बेपत्ता होता New York Herald न लिव्हिंग्स्टोनचा शोध लावण्यासाठी स्टॅन्ले नावाच्या पत्रकाराची नेमणूक केली तब्बल २३८ दिवसाच्या भटकतीनतर त्याची गाठ थकलेल्या, आजारी आणि वृद्ध लिव्हिंग्स्टोनबरोबर पडली, तेव्हा त्याच्या तोंडचे शब्द प्रसिद्ध आहेत. भावनावेगान गद्‌गदून गेल्यावर केवळ २-३ शिष्टाचाराचे शब्दच तो बोलू शकला "Dr Livingstone, I Presume!" या ऐतिहासिक भेटीनतर लवकरच आफ्रिकन आदिवासींच्या सहवासात लिव्हिंग्स्टोनचा मृत्यू झाला त्याचा वसा जणू स्टॅन्लेन घेतला आज आफ्रिकेतल्या Ruwen zory रुवेन्झरी पर्वतरागाचा शोध लावण्याच श्रेय स्टॅन्लेकडेच जात याच पर्वतरागाना Mountains of the Moon अस म्हटल जात.

इकडे व्यापारासाठी किंवा मजुरीसाठी आफ्रिकेत आलेले भारतीय आता चागलेच रुळले होते वसाहतवाल्याच्या तुलनेत त्याची सख्याही जास्त होती आशियाई आणि कृष्णवशाच्या लोकावर वसाहतवाल्यानी अनेक जाचक निर्बंध लादले होते गाधीजींच्या नेतृत्वाखाली (तेव्हा ते बॅ मोहनदास गाधी होते) समान नागरी हक्कासाठी भारतीयानी जोरदार लढा दिला तेव्हा युरोपियन चागलेच गडबडून गेले लष्करी सामर्थ्यावर भारतीयाना नामोहरम करण त्याना शक्य नव्हत, तेव्हा त्याच्या काही मागण्याना समती देऊन हा सत्याग्रहाचा लढा कसाबसा थाबवण्यात आला

आज आफ्रिकेतून बऱ्याच वसाहती नाहीशा झाल्या आहेत बरेच छोटे मोठे देश स्वायत्त झाले आहेत ओरबाडून काढलेल्या उघड्या बोडक्या कृष्णखडाचे वारसदार आपल निसर्गवैभव कस जपाव याच्या चितेत आहेत

# जांबो ब्वाना कारिबू !

२

नमस्कार मराठीभाषक निसर्गप्रेमी, पशुपक्षी मित्र आणि हौशी पर्यटकानो, आफ्रिकन सफारीवर आपल मन पूर्वक स्वागत ! कारिबू !

आफ्रिका आहे एक गूढ रहस्यमय कृष्णखड आफ्रिका म्हणजे होरपळून टाकणारी आग आफ्रिका म्हणजे कोणाही छायाचित्रकाराच प्रत्यक्षात उतरलेल स्वप्न ज्याला शहरी बकालपणापासून दूर दूर जायचय त्याच्यासाठी आफ्रिका साक्षात् नदनवनच आहे आकारमानान विस्तीर्ण आणि वन्य जीवनाच्या बाबतीत पृथ्वीवरच सगळ्यात समृद्ध खड आहे आफ्रिका या खडात मानवनिर्मित देश इतके आहेत, की आपल्याला सगळ्याची नावही माहीत नाहीत, पण याच भूमीवर निसर्गाच जे वैविध्य दिसून येत तेदेखील अन्यत्र सापडणार नाही इथ प्रचड मोठी वाळवट आहेत विषुववृत्तीय घनदाट विस्तृत गवताळ वाखरी आहेत इथ उघड्या माळरानावर प्रचड सख्येन निर्भयपणे चरणारे विविध वन्य जीव जगात दुसरीकडे कुठेही पाहायला मिळणार नाहीत तसच इथल्या पाणथळ दलदलीच्या प्रदेशात हजारोंच्या सख्येन वस्ती करणारे पाणपक्षी म्हणजे पक्षीनिरीक्षकाच्या डोळ्याना मेजवानीच आहे

आधुनिक यत्रयुगीन जगाच्या सदर्भात आफ्रिकन कृष्णसस्कृती मृतप्राय झाली आहे अस कुणाला वाटल, तर ती मोठी चूक ठरेल आफ्रिकेचा आत्मा पुरातन आहे, सनातन आहे, चिरतन आहे तो मृत नाही तर मूक आहे, विशुद्ध आहे गौरवर्णीय दर्यावर्दी लोकानी आफ्रिकेवर चढाया केल्या. वसाहती केल्या आपला ठसा इथल्या अनाघ्रात मातीवर उमटवण्याचा प्रयत्न केला, तरी तो मूठभर शहरापुरताच मर्यादित राहिला आफ्रिका समजून घ्यायची असेल तर जायला हव किनाऱ्यापासून आत, पुष्कळ आत, जगलात, वाळवटात, आफ्रिकन 'बुश' मध्ये

तेव्हा चला तर आफ्रिकेच्या सफरीवर पाहिलत सफर हा हिंदी शब्द आणि सफारी हा स्वाहिली शब्द किती साम्य आहे ! तसेच दुसरे स्वाहिली

शब्द म्हणजे मुसाफिरी (प्रवास), चाय (चहा) आणि सिंबा (सिंह) 'जांबो' हा अभिवादनाचा सर्वव्यापक शब्द कोणीही कोणालाही उद्देशून दिवसाच्या कोणत्याही वेळी वापरावा आपल्या मराठमोळ्या 'रामराम' सारखा! 'ब्वाना' हे आहे आदरार्थी संबोधन - महाशय, 'सर' या अर्थी

आफ्रिकन सफरीवर पर्यटकांना घेऊन जाणाऱ्या फारच थोड्या भारतीय कंपन्या आहेत आम्हीसुद्धा 'यू व्ही आय हॉलिडेज' या मुंबईच्या पर्यटन संस्थेत पैसे भरले खरे, परंतु तिकडे पोचल्यावर 'सोमक सफारीज्' या केनियातल्या सर्वांत मोठ्या प्रवासी कंपनीतर्फेच आमची सोय करण्यात आली सोमकचे संचालक आहेत पिढ्यान् पिढ्या केनियात वास्तव्य करणाऱ्या भारतीय वंशाचे श्री सोफत इतर अनेक ब्रिटिश आणि युरोपियन कंपन्यापेक्षा सोमकचा पसारा जास्त मोठा आहे केनियात फिरल्यावर लक्षात आलं की पर्यटनापासून इतर अनेक उद्योगधंद्यांवर अनिवासी भारतीयांचं चांगलंच वर्चस्व आहे

कोणत्याही आफ्रिकी देशाला भेट देण्यापूर्वी करण्याची एक अनिवार्य गोष्ट म्हणजे 'पिवळा ताप' (यलो फीव्हर) ची लसटोचणी ही सोय फक्त मुंबईत असल्यानं त्यासाठी एक फेरी मारावीच लागते याव्यतिरिक्त कॉलरा लसही घ्यावी, असं म्हणतात - आम्ही घेतली नव्हती आणि हिवतापप्रतिबंधक क्लोरोक्विनच्या गोळ्या आधीपासून सुरू कराव्या लागतात

मुंबईला 'गेटवे ऑफ इंडिया' हे नाव इंग्रजांनी दिलं केनियाची राजधानी नैरोबीलाही 'गेटवे ऑफ ईस्ट आफ्रिका' म्हणता येईल उत्तरेला 'माउंट केनिया' आणि दक्षिणेला किलिमान्जारो पर्वतरांगांच्या मधोमध किकुयु टेकड्यांच्या पायथ्याशी हे सुंदर शहर वसलेलं आहे त्याच्या सभोवार सुमारे १०० मैलांपर्यंत चहाकॉफीचे मळे पसरलेले आहेत नैरोबीचे रहिवासी म्हणजे इंग्लिश, भारतीय, सोमाली, किकुयु आणि मसाईंच मिळून बनलेलं रसायन आहे

साडेपाच तासांच्या प्रवासानंतर एअर केनियाचं विमान नैरोबी एअरपोर्टला उतरलं नैरोबीच्या भूमीवर पहिलं पाऊल ठेवतानाच थंडगार वाऱ्याच्या झुळुकांनी आमचे स्वागत करून आश्चर्याचा धक्काच दिला नंतर आम्हाला कळलं की जरी केनियामधून विषुववृत्त जात असलं आणि सारा देश उष्ण कटिबंधात येत असला तरी नैरोबी हे समुद्रसपाटीपासून बरंच उंचावर असल्यामुळे इथल्या हवेत नेहमी सुखद गारवा असतो

मोठ्या उत्साहवर्धक वातावरणात आणि आनदी मन स्थितीत आम्ही दोघे (मी आणि माझे पती डॉ नरेंद्र जोशी) मेफेअर कोर्ट या आलिशान हॉटेलवर येऊन पोचलो आजचा दिवस नैरोबी हिंडून पाहण्यासाठी राखलेला होता त्याप्रमाणे शहरात फेरफटका मारून आलो ब्रिटिश वसाहतीच्या काळात नावारूपाला आलेल हे शहर लाबरुद रस्ते, देखण्या इमारती आणि भरपूर हिरव्यागार वृक्षानी नटलेल आहे रस्त्यान जाणारे लोक समिश्र वशाचे दिसतात प्रत्येक दुकानात, हॉटेलमध्ये किंवा कार्यालयात नैरोबीचे भूतपूर्व अध्यक्ष 'राष्ट्रपिता' म्हणावेत अशा 'जोमो केन्याटा' याचा फोटो लावलेला दिसतो त्यानी उभारलेल्या स्वातत्र्यलढ्यामुळेच ब्रिटिश गुलामगिरीतून देश मुक्त झाला मात्र आज केनियातले उद्योगधदे आणि अर्थव्यवस्था याच्यावर भारतीयाच नियत्रण आहे

आमच मेफेअर हॉटेल पर्यटकानी नुसत गजबजलेल होत मुख्यत्वेकरून युरोपियन लोक दिसत होत त्यातही इग्लडचे जास्त वातावरण मोकळ आणि उत्साहान भारलेल होत प्रत्येकजण एका साहसी मोहिमेवर जाण्यासाठी उत्सुक दिसत होता प्रवासी कपन्याचे प्रतिनिधी आपल्या अतिथींना सूचना देण्यात गढले होते सफारीवर जाताना वेषभूषा कशी हवी, तिकडे प्राणिनिरीक्षण करताना वागण्याचे नियम कोणते, वगैरे। दुसऱ्या दिवशी भल्या सकाळीच म्हणजे ७ वाजता नाश्त्यासाठी आम्हाला तयार व्हायच होत आणि ८ वाजता आम्ही कूच करणार होतो 'अबोसेली' अभयारण्याकडे

## सफारी किलिमान्जारो

त्याप्रमाणे खरोखरच दुसऱ्या दिवशी सगळ हॉटेल खाकी हाफपँटस्, खाकी शर्टस्, डोक्यावर टोप्या, काळे चष्मे, मोठमोठे लेन्सवाले साधे किंवा चलत्चित्र कॅमेरे मिरवणाऱ्या गोऱ्या साहेब आणि मडमिणींनी फुलून गेल होत आम्हीसुद्धा अस्सल देशी जीन्स आणि शर्ट घालून आपला भारतीय बाणा सिद्ध करीत त्याना सामील झालो सकाळचे ७ वाजले होते भारतात तो खग्रास सूर्यग्रहणाचा-दिवाळीचा दिवस होता जगभरच्या खगोलप्रेमींचे डोळे आकाशाकडे लागले होते आम्हींही तशाच एका रोमाचक अनुभवासाठी उत्सुक बनलो होतो हॉटेलच्या शोकेसमध्ये नित्य वापरातले स्वाहिली शब्द आणि त्याचे समानार्थी इग्लिश, फ्रेंच अन् जर्मन शब्द याची यादी लावलेली होती ही कल्पना मला फार उपयुक्त वाटली

नाश्त्याची व्यवस्था पोहण्याच्या तलावाच्या बाजूला मोकळ्या हवेवर केली होती मेनू प्रचड मोठा होता सवय नसताना इतक्या लौकर यातल काय खाणार असा प्रश्न पडला जेमतेम फळाचा रस, चहा आणि सिरियल घेतल तर पोटच भरून गेल गोरे साहेब मात्र इमानेइतबारे ऑम्लेट, हॅम, वॅफल्स, पॅनकेक्स, कोल्डकटस् सगळ्याचा समाचार घेत होते अखेर अर्धा तास लोटला आणि हॉटेलच्या मागच्या आवारात आपापल्या बॅगा घेऊन हळूहळू मडळी जमायला लागली आवारात असख्य गाड्या उभ्या होत्या 'सोमक सफारी'च्या विशिष्ट चिन्हामुळे त्या गाड्या चटकन् ओळखू येत होत्या काल नैरोबी विमानतळावर भेटलेल्या सोमकच्या हसतमुख प्रतिनिधीन आम्हाला आमची गाडी दाखवली आणि आमचा ड्रायव्हर-मार्गदर्शक 'बार्नी' याची ओळख करून दिली

प्रत्येक प्रवासी कपनी टाझानिया / केनियातील अनेक अभयारण्याच्या वेगवेगळ्या सहली आयोजित करते त्यातली आम्ही निवडली होती 'किली सफारी ' आफ्रिकेतला अत्युच्च हिमाच्छादित पर्वत किलिमाजारो पार्श्वभूमीवर असून, पुढे हत्तींचा एक कळप सथपणे चरत आहे अस सुदर छायाचित्र मी सोमकच्या पुस्तिकेत पाहिल होत, म्हणून आम्ही मुबईत यू व्ही आय् मध्येच या सफारीसाठी नाव नोंदवल होत

सोमकच्या गाड्या म्हणजे अत्यत मजबूत बाधणीच्या आणि उत्कृष्ट अवस्थेतल्या निसान व्हॅन्स होत्या प्रत्येक व्हॅनमध्ये आठ पर्यटक बसू शकतात प्रत्येकाला स्वतत्र मोठी खिडकी मिळते सीटस् अगदी आरामदायी असून व्हॅनच छत उच करण्याची सोय असते प्राणीनिरीक्षण करताना सरळ उभ राहून छत उच करून मधल्या मोकळ्या जागेतून बाहेर पाहता येत, अडथळा न येता फोटो काढता येतात अगाला भरपूर वारा लागतो आणि तिथल्या उष्ण हवेत तो हवाहवासा वाटतो 'किली' सफारीसाठी आम्ही फक्त दोघेच पर्यटक होतो, म्हणजे एवढी मोठी गाडी खास आमच्यासाठीच निघाली होती आम्ही दुसऱ्या कोणत्या सहलीत सामील व्हाव, अशी विनती सोमकवाल्यानी चुकूनसुद्धा केली नाही हे विशेष

गाडीचा ड्रायव्हर नुसता वाहन चालवतो एवढच नाही, तर आपला मित्र, तत्त्वज्ञानी आणि मार्गदर्शक म्हणून तो भूमिका बजावतो त्याला आपुलकीन

'कॅप्टन' म्हणून सबोधल जात प्रत्येक दिवशीची सफारी सपल्यावर त्याला 'टिप' देणही अपेक्षित आहे आमचा ड्रायव्हर बार्नीपण अगदी उत्तम मार्गदर्शक निघाला उचपुर कमावलेल शरीर, हसतमुख चेहेरा, बोलका स्वभाव आणि अस्खलित इंग्लिश यामुळे प्रथमदर्शनीच आमच मत त्याच्याविषयी अनुकूल झाल ओळख झाल्याबरोबर त्यान सागितल, 'आपली सफारी सपेपर्यंत मी तुम्हाला स्वाहिलीत तरबेज करून सोडतो' म्हणून

'जाबो' या अभिवादनाची ओळख आधीच झाली होती आता 'ट्वेन्डे' (twendı) म्हणजे 'निघूया' अस म्हणत आम्ही गाडीत बसलो आणि 'क्काहेरी मेफेअर' म्हणजे गुडबाय करून निघालो अबोसेलीला.

स्वाहिली भाषेत अबोसेली म्हणजे गरम आणि धुळीन भरलेली जागा हे नाव किती सार्थ आहे याचा प्रत्यय आम्हाला लवकरच आला नैरोबीतून बाहेर पडताच गुळगुळीत डाबरी हायवेच रूपातर कच्च्या खडबडीत रस्त्यात झाल आजुबाजूला झाडझाडोरा विशेषसा दिसेना, उलट सर्वत्र वैराण रखरखीत प्रदेश दिसत होता हवा तापत चालली होती गाडीमागून धुळीचे ढग उठत होते दूरवर जमिनीपासून आकाशापर्यंत उडणाऱ्या धुळीचे स्तभ दिसत होते उन्हाच्या चदेरी माऱ्याखाली धूळ चकाकत होती

आणि अचानक क्षितिजाजवळ विस्तीर्ण पसरलेल सरोवर दिसू लागल त्याच निळशार पाणी, झाड-टेकड्या याची पाण्यात पडलेली प्रतिबिंब बघून मन उत्फुल्ल झाल मोठ्या उत्सुकतेन आम्ही बार्नीकडे पाहू लागलो तो गालातल्या गालात हसत होता अबोसेली जवळ आल वाटत ! पण हा हन्त हन्त ! आम्हाला जे सरोवर दिसल ते चक्क मृगजळ होत गाडीच्या वेगाबरोबर तेही पुढे पुढे धावत होत वाळवटात मृगजळ दिसत, त्यामागे धावून हरण उरी फुटतात अस ऐकल होत पण हा मायावी भास प्रथमच अनुभवला

तब्बल पाच तासाच्या खडतर प्रवासानतर काहीसे कटाळून बसलो असताना अचानक काहीतरी वेगळच रस्त्याकडेला दिसल निरखून बघितल तर काय - शहामृग होते ते एक सुदर देखणा नर आपली लाब मान वळवून सरळ आमच्याकडे टवकारून बघत होता ८-१० फूट उची, चकचकीत काळीशार पिस आणि शेपटाला गर्द शेंदरी पिसाचा तुरा यामुळे तो फारच मोहक दिसत होता त्याच्या दोन बायका काही अतरावर अदबीन उभ्या होत्या गवतातल्या

किड्याचा शोध घेत तो पुढे सरकला की राखाडी कळाहीन अशा त्या माद्या नवऱ्यामागून तुरुतुरू धावत होत्या निसर्गानच नराला मादीपेक्षा आकर्षक रूप बहाल केल असल पाहिजे आपल्याकडची मोर-लाडोरीची जोडी पाहा ना! आमच्या पुढच्या प्रवासात आफ्रिकेचे हे राजस पक्षी अनेकदा भेटले आपल्या लाबसडक माना पटापट मागेपुढे हलवीत, सगळीकडे लक्ष ठेवीत, जरा धोक्याची चाहूल लागताच लाबलाब ढागा टाकीत पसार होणारे शहामृग नतर फार ओळखीचे झाले

## सेरेना लॉज अंबोसेली

आता हळूहळू झेब्रे, जिराफ, हरण दिसायला लागली आमची प्रवासाची मरगळ एकदम नाहीशी झाली अधीरतेन आम्ही आसमत न्याहाळू लागलो अचानक वैराण ओसाड प्रदेशात हिरवे पुज दिसायला लागले बघता बघता हिरव्यागार वृक्षराजीत लपलेल्या अबोसेली सेरेना लॉजवर आम्ही येऊन पोचलो लॉज कसल - सर्व सुखसुविधानी सज्ज अस ते पचताराकित हॉटेलच होत मात्र त्याची रचना मसाई खेडेगावाच्या धर्तीवर केलेली होती आम्ही मसाईलँडच्या अतर्गाभ्यातच येऊन पोचलो होतो

उत्कृष्ट निगराणी केलेली बाग, रगीबेरगी फुलाचे ताटवे, वेगवेगळ्या जातीचे नीट जोपासलेले वृक्ष - या ओसाडीत हे नदनवन फुलल कस? इथ पाणी आल कुठून? लॉजच्या मागच्या बाजूला मोठी पाणथळ दिसत होती नद्या नाहीत, सरोवर नाहीत मात्र दूर क्षितिजाजवळ दृष्ट लागेल इतका सुदर किलिमाजारो दिसत होता आफ्रिकेतला हा उत्तुगतम पर्वतराज (उची २०,००० फूट) त्याच्या पसरट शिरस्त्राणासारख्या हिमाच्छादित शिखरामुळे फारच शोभिवत दिसतो वर्षातून २ वेळा येणाऱ्या पावसाळ्यात या पर्वतावर भरपूर पाऊस पडतो उन्हाळ्यात बर्फ वितळून खाली येत हे सार पाणी भूगर्भात जिरून जात दीड-दोनशे किलोमीटर अतरापर्यंत जमीन हळूहळू उतरत गेल्यामुळे भूजलपातळी पृष्ठभागावर येते आणि अशा पाणथळी निर्माण होतात त्याला इथे 'वॉटरहोल' किंवा 'स्वँप' म्हणतात या पाण्यामुळे दलदल, चिखल, पाणवनस्पती, गवत, खुरटी झुडपे, मध्यम उचीची झाड अस पर्यावरण निर्माण होत साहजिकच त्यात कीटक, मासे, पक्षी, पशूची भर पडते अबोसेलीच्या या पाणथळीला मॅरॉक स्वॅम्प अस नाव होत

अबोसेली सेरेना लॉजवर आम्ही पोचलो तेव्हा दुपारच्या जेवणाची वेळ झाली होती वेगवेगळ्या शाकाहारी आणि मांसाहारी पदार्थांची नुसती रेलचेल होती 'चकूला मझूरी' (Chakula Mzuri) म्हणजे 'छान आहे जेवण' अस कुकला सागून आम्ही थोडी विश्रांती घेतली आणि दुपारी बरोबर चार वाजता आमच्या गाडीत येऊन बसलो

आता आम्ही पहिल्यावहिल्या सफारीवर निघालो होतो इथ वावरायच तर इथले नीतिनियम पाळण आवश्यक होत इथ अभयारण्यात फक्त अधिकृत वाहनातून आणि रुळलेल्या वाटावरून जायच असत गाडीतून खाली उतरून चालण, प्राण्याच्या मागे गाडी पळवून त्याना बिथरवण, प्राण्याना शीळ घालून, हाका मारून उत्तेजित करण किंवा त्रास देण या गोष्टींना सक्त मनाई आहे शिकार करण तर कायद्यान गुन्हाच आहे ठिकठिकाणी रस्त्यावर पाट्या दिसतात 'वन्यपशूसाठी राखीव', 'रस्ता ओलाडण्याचा अग्रहक्क पशूचा' वगैरे. एक गोष्ट सर्वत्र आढळली ती म्हणजे प्राण्याना सन्मानपूर्वक वागवण्याची रीत, त्याच्या ठायी असणाऱ्या अमानुष शक्तीचा यथायोग्य आदर आणि धाकसुद्धा हौशी पर्यटक फाजील उत्साह दाखवू लागले तर त्याचे गाइड तावडतोब त्याना वळणावर आणतात.

आम्ही सफारीवर गेलो त्याच्याआधी नुकतीच घडलेली एक दुर्घटना सगळ्याच्या चर्चेचा विषय झाली होती केनियातच राहाणार एक कुटुब खासगी मोटारीतून फिरायला गेलेल असताना रस्त्यावर त्याना सिहाचे छावे दिसले नवऱ्याकडे साधा कॅमेरा होता बायको व्हिडिओ शूटिंग करीत होती त्या छाव्याचे जवळून फोटो काढायच्या नादात हे महाशय गाडीतून उतरले, अगदी जवळ जाऊन कॅमेऱ्याचा 'अँगल' साधू लागले, आणि अचानक काळ जवळ ठेपला! आपल्या बच्च्याच्या सुरक्षिततेसाठी आक्रमक बनलेल्या सिंहिणीन प्रचड ताकदीनिशी त्या दुर्दैवी माणसावर झेप घेतली आणि त्याच्या अक्षरश चिध्या करायला सुरुवात केली. सुन्नबधिर झालेली त्याची पत्नी गाडीतून हे दृश्य बघत होती आणि तिच्या नकळत तिचा कॅमेराही हा महाभयकर प्रसग टिपून घेत होता ही हकीकत ऐकताना आम्हीही शहारलो जगलच्या कायद्यासमोर माणूस किती तुच्छ आहे, हतबल आहे - ही जाणीव झाली

अभयारण्यात फिरण्याच्या वेळाही ठरलेल्या असतात सकाळी ६ ते

८ आणि दुपारी ४ ते ६ भर दुपारी इथे अत्यत प्रखर ऊन असत अशा वेळी प्राणी-पक्षी सावलीला गारव्याच्या जागी बसून राहातात त्यामुळे ते जेव्हा जागा सोडून अन्नाच्या शोधात फिरत असतात, तीच वेळ पर्यटकाना निरीक्षणासाठी बरी पडते सध्याकाळी सहानतर हळूहळू काळोख होऊ लागतो शहरापासून शेकडो मैल दूर अशा दुर्गम ठिकाणी वीजपुरवठा नसतोच विद्युत्जनित्रावर वीजनिर्मिती करून लॉजवर उजेडाची सोय केलेली असते मात्र त्या छोट्याशा परिघाबाहेर सर्वत्र निबिड अधकाराच साम्राज्य असत हीच वेळ असते निशाचर हिंस्र पशू शिकारीला बाहेर पडण्याची तेव्हा पर्यटकाना सध्याकाळनतर लॉजच्या आवाराबाहेर फिरण्याची बदी असते कित्येक ठिकाणी कुपणातून विद्युतप्रवाह खेळवलेला असतो कुपणाच्या आत घुसू पाहणाऱ्या श्वापदाना अडवण्यासाठी ही खबरदारी घेतलेली असते

## शांततामय सहजीवन

आफ्रिकन सफारीवर सगळीकडे उदड सख्येन दिसलेले प्राणी म्हणजे झेब्रे धष्टपुष्ट आणि उमदा दिसणारा हा प्राणी म्हणजे पट्टे रगवलेला देखणा घोडाच वाटतो छोट्या शिगराच्या अगावर फिकट ताबूस पट्टे असतात पूर्ण वाढ झाली की त्याचा रग तकतकीत काळा किंवा तपकिरी होतो झेब्रे हे खरे कळपात राहणारे खेळकर तरतरीत प्राणी आहेत एकमेकाना ढुशा काय मारतील, लाथा काय झाडतील, प्रेमान हुगतील, गोंजारतील, पण जवळ गेल की गर्वान आम्हाला पोज द्यायच सोडून, लाजून पळूनच जायचे बेटे त्यामुळे झेब्र्याचे बरेच फोटो पाठमोरेच आलेत त्यातून त्याचे कान अगदी तिखट असतात झेब्र्याचे शत्रू म्हणजे सिह, बिबळ्या किंवा चित्ता जरा चाहूल लागली की झेब्रे ताबडतोब पसार होतात

पण झेब्रे सच्चे मित्र असतात ते 'वाइल्डबीस्ट' किंवा 'ग्नू' या हेंगाड्या प्राण्याचे बोकडदाढीचा आणि फेंगड्या चालीचा 'ग्नू' मी भारतात कधी पाहिला नव्हता ग्नूना धड ऐकू येत नाही आपला काळ जवळ आलाय हेही समजत नाही मात्र आपल्यातली ही त्रुटी भरून काढायला ते झेब्र्याशी मैत्री करतात त्याच्या आगेमागे चरत राहतात झेब्रे पळाले की स्वत पळत सुटतात आणि आपला जीव कसाबसा वाचवतात निसर्गान या बावळट प्राण्याना एवढ तरी शहाणपण दिलय

लहान मुलाच्या कार्टून्समध्ये झाडाच्या शेंड्याआडून जिराफ डोकावताना दिसतो इथे अबोसेलीला प्रत्यक्ष पाहिला! सुरुवातीला त्याच सबध शरीर दिसतच नाही गवतात, झुडपात दडल्यामुळे दिसत ते शरीराच्या एक पन्नासाश असणार चिचोळ डोक, त्यावरची आखूड शोभेची शिग आणि ताठ उभे दोन कान मी कुठे ? अस विचारत असते स्वारी मग मात्र आपल्याला दिसते अगावरची चित्रविचित्र नक्षी - जिराफाच्या जातीप्रमाणे त्या नक्षीच डिझाइनपण वेगवेगळ असत एकाच वेळी ४-५ जिराफ पळताना बघायला मिळण हा एक अनोखा अनुभव आहे त्याच्या लाब लाब तगड्या अशा तालात मागेपुढे होतात, जणू कोणा नृत्यदिग्दर्शकान बसवून घेतलेले पदन्यास मात्र जिराफाची एक लाथ सिहालासुद्धा पाणी मागू देत नाही शिकारी पशू जिराफाच्या वाटेलाच जात नाहीत

आपल्यालाही जिराफाच्या अगदी जवळ जाता नाही बिचकून लगेच पळ काढतात दहा-बारा फूट उचीची 'छोटी' जिराफबाळसुद्धा झिडपिडत आईमागून पळत सुटतात

हरणाचे तरी किती प्रकार! अगदी लहान गोजिरवाणी जात म्हणजे गॅझल (Thomson's Gazelle) गर्द तपकिरी मखमली अगावर दोन्ही बाजूनी डौलदार पाढरे पट्टे सातत्यान हलत राहाणारी आखूड शेपूट या हरणाच टाणटाण उड्या मारत पळत सुटण आणि डोळ्याच पात लवेस्तोवर अदृश्य होण म्हणजे एक काव्यच आहे शकुतलेची लाडकी आश्रमहरिणं याच प्रकारची असावीत

इम्पाला ही दुसरी जात गॅझलपेक्षा मोठी एक उचापुरा शिगवाला नर, त्याच्या पाठी अनेक हरिणी, त्याची पाडस, नुकतेच वयात येऊ लागलेले नर, असा सगळा कुटुबकबिला कितीतरी वेळ सथपणे चरत राहातो चाऱ्याच्या शोधात भटकत असताना इतर गवतखाऊ प्राण्याबरोबर त्याच अगदी छान जमत 'कुठेही 'तुला-मला' न करता झेब्रे, ग्नू, जिराफ, हरण सुखान एकत्र नादतात शाततामय सहजीवन जगणारी ही मडळी मनुष्य-प्राण्यापेक्षा समजस वाटतात खरी

मात्र प्राण्यामध्ये बहुपत्नीत्व हाय नियम दिसतो एक नर, अनेक माद्या, साधारण सारख्या वयाचे बछडे अशी कुटुब पाहायला मिळतात बच्चा मोठा झाला की तो स्वत च नवीन कुटुब तयार करतो स्वामित्व प्रस्थापित करण्यासाठी

तरुण नरामध्ये लढती होतात अगदी हरणसुद्धा शिगाच्या टकरी लावून झुझतात पशूच्या सहवासात राहाणाऱ्या मसाई लोकानाही बहुपत्नीत्व पसत पडत, यात काय नवल !

**मॅरॉक स्वॅम्पला भेट**

झेब्र्याच्या कळापातून वाट काढीत आमची गाडी आता पाणथळीकडे धावत होती. हा बार्नी मोठा दिलदार मनुष्य Birds of Africa आणि Mammals of Africa ही दोन पुस्तक त्यान उदारपणे आम्हाला देऊ केली त्या पुस्तकातली रगीत चित्र पाहून त्याबरहुकूम प्राणी किंवा पक्षी ओळखण हे काम आव्हानात्मक आणि मनोरजक होत सोबतीला बार्नीच अखड समालोचन चाललेल केनिया-टाझानियातली एकूण एक अभयारण्य बार्नीन इतक्या वेळा पालथी घातलीत की तिथल गवताच पातन् पात त्याच्या ओळखीच आहे नजर तर इतकी तयार की दुर्बिणीशिवाय गवतात मुरून बसलेला प्राणी तो लाबूनच हेरतो आणि आम्हाला दाखवतो

काही मिनिटाच्या आतच हिरव्या पाणवनस्पतींनी पूर्ण झाकलेली प्रचड मोठी दलदल दिसू लागली आणि मोठ्या खुशीत तिथ पाण्यात आणि चिखलात डुबणारे हत्तीपण आपण वाघसिहाना जगलचे राजे मानतो पण कोणत्याही आफ्रिकी माणसाला विचारा - नि सशय तो म्हणेल - हत्ती हाच जगलाचा राजा आपल्या भारतीय हत्तीपेक्षा हे आफ्रिकी हत्ती आकारानही मोठे असतात आणि त्याचे सुळेही जास्त लाबलचक असतात अगदी माद्यानाही बऱ्यापैकी लाब सुळे असतात सर्वात डोळ्यात भरतात ते आफ्रिकी हत्तींचे कान, प्रचड मोठे डोक्यापासून छातीपर्यंत झुलणारे पाणी हत्तींना अतिशय प्रिय खोल पाण्यात पोहण, एकमेकाना डुबक्या देण, उच फवारे उडवण अशा जलक्रीडा करायला हत्तींना खूप आवडत

आमच्या समोरचे हत्ती मात्र दलदलीत शात उभे राहून चरत होते सर्वांगावर वाळलेल्या चिखलाच सरक्षक कवच होत त्रासदायक त्से त्से माशा आणि इतर कीटकापासून बचाव करण्यासाठी हत्ती मुद्दामच चिखलात लोळतात हत्ती चालायला लागले की त्याच्या पावलाच्या आघातान आसपासच्या गवतातले किडे उडायला लागतात त्यामुळे हत्तींच्या जवळ हमखास किडेखाऊ पक्ष्याची गर्दी असते हे पक्षी खुशाल हत्तींच्या अगावर बसून तिथलेही किडे खातात

काळ्याभोर हत्तीच्या पाठीवर बसलेला पाढराशुभ्र बगळा हे दृश्य वरचेवर दिसत दोघाच्याही उपयोगी पडेल अस हे निसर्गाच समायोजन आहे

आमची गाडी उभी होती तिथ जवळच एक अगदी वैशिष्ट्यपूर्ण पक्षी खाली मान घालून किडे टिपण्यात मग्न होता. हाच प्रसिद्ध आफ्रिकन क्राऊन क्रेन म्हणजे क्रौचपक्षी डोक्यावर ऐटबाज भगवा तुरा मिरवणारा हा भव्य पक्षी वाल्मिकींना दिसलेला शुभ्रक्रौंच नव्हे तर त्याचा आफ्रिकी जातभाई पाणथळीवर राहणारे हे पक्षी पाणवनस्पतींच्या गर्दीतच ठिपक्याठिपक्याची अडी घालतात क्रौंच युगुलाच परस्परप्रेम इतक नितात असत की एकदा नरमादीची जोडी जमली की मृत्यूच त्याची ताटातूट करू शकतो

पण वारवार आमच लक्ष वेधून घेत होते जकाना नावाचे अतिसुदर पाणपक्षी याना कमळपक्षी असही म्हणतात नारिंगी, सोनपिवळी छाती, रगसगतीचे पिसारे, भपकेबाज डौलदार रूप यामुळे जकाना पाहणाऱ्याला मत्रमुग्ध करून टाकतात लाब काटक्यासारखे पाय, त्याची बोट आणि नखही तशीच लाब लाब यामुळे जकाना मोठ्या कौशल्यान तोल सावरीत पाणवनस्पतींवर पावल टाकीत तुरुतुरू चालतात पाणकोंबड्या आणि बदकही ज्या गर्दीत पोचू शकत नाहीत तिथल अस्पर्शित खाद्य जकानाना सहज मिळवता येत

अस असल तरी जकाना माद्या फार भाडखोर आणि आक्रमक असतात नवरा मिळवण्यासाठी एकमेकींमध्ये मारामाऱ्या होतात नवरा मिळाला की मादी तरगत्या पाणगवताच्या गादीवर अडी घालते आणि सरळ दुसरीकडे चालती होते त्या अड्याची पुढची देखभाल नरच करतो. मादी लगेच दुसऱ्या नराचा शोध घेते आणि नवा घरोबा करते

समोरच्या दलदलीत हत्तींच्या बरोबरीन चिखलस्नान करण्यात दग असणारे अजूनही बरेच प्राणी दिसले निरखून पाहिल्यावर आम्ही उद्गारलो 'अरे, या तर चक्क म्हशी!' मात्र आपल्या भारतीय म्हशींपेक्षा बऱ्याच थोराड, केसाळ आणि उग्र चेहेऱ्याच्या अर्धवर्तुळाकृती शिगवाल्या या म्हशी-रेड्याना लोळवायला एकटा सिह पुरत नाही दोघतिघ मिळून चढाई करतात तेव्हाच रेडा नामोहरम होतो या वॉटर-बफेलोबद्दल आम्ही फारशी प्रतिक्रिया दाखवली नाही याच बार्नीला आश्चर्य वाटल तेव्हा आम्ही सागितल- "बाबा रे, लहानपणापासून म्हशीच्या दुधावर आम्ही वाढलो आणि म्हशींच्या कळपातून

वाट काढीत अजून आम्हाला वाहन चालवाव लागत त्या म्हशींच आम्हाला इतक अप्रूप कस वाटणार ?'' बार्नीला म्हशींच दूध पिण्याची कल्पना कशीशीच वाटली तिकडे फक्त गायीच दूध वापरतात ना!

आता बार्नीन गाडी मागे वळवली आणि थोड्या वेगळ्या वाटेन आम्ही सेरेना लॉजकडे जाऊ लागलो आसपास सर्वत्र छोटी छोटी तळी दिसत होती त्या सथ जलाशयात अधूनमधून खडक वर यावेत तसे काळे पुज दिसत होते बार्नी म्हणाला - ते हिप्पो आहेत म्हणून हिप्पोंना पाण्यात डुबायला इतक आवडत की केवळ नाकपुड्या आणि कान पाण्याबाहेर आणि बाकीच अगडबब शरीर पाण्यात, असे ते तरगत राहातात 'परदे में रहने दो, परदा ना उठाओ' अशा या लाजाळू हिप्पोसुदरींना सपूर्ण कस पाहायच असा आमच्यापुढे प्रश्नच पडला अखेर आमची इच्छाशक्ती प्रबळ ठरली आणि पाण्यान निथळणारे तकतकीत काळ्याशार रगाचे दोन हिप्पो ऊन खायला तळ्याकाठी उभे राहिलेले दिसते आपल्याच मस्तीत असणाऱ्या या जलचराना आम्हा प्रेक्षकाची मुळीच पर्वा नव्हती बाकी हिप्पोंना आपण पाणघोडा का म्हणतो हे कळत नाही या लाजऱ्याबुजऱ्या महाकाय प्राण्याच घोड्याशी काडीमात्र साम्य नाही लाबून पाहिल तर हिप्पो आणि रानरेडे सारखेच वाटतात पण हिप्पो आकारात आणि वजनात रेड्यालाही भारी ठरतो

तब्बल ८००० पौंड वजन असणारे हे हिप्पो 'बेहेमॉथ' जातीचे होते हिप्पोची दुसरीही एक जात आहे - एखाद्या मोठ्या डुकराच्या आकाराची याना 'पिग्मी हिप्पो' म्हणतात - ही जात आता फक्त मादागास्कर बेटातच सापडते

दिवसा सतत पाण्यात डुबणारे हे प्राणी रात्री बाहेर पडतात आणि रात्रभर गवत चरतात दररात्री ५०-६० पौड गवताचा फत्ता उडवतात एरवी गरीब आणि मठ्ठ वाटणारे हे प्राणी त्याची प्रायव्हसी धोक्यात आली तर जाम खवळतात बार्नी म्हणाला - सहसा छोट्या छोट्या तळ्यात एक तर हिप्पो राहतात किंवा सुसरी - एकत्र आले तर दोघाची जुंपेलच

धडकी बसवणारा भीतिदायक शिकारी म्हणजे सुसर झाबेझी आणि नाइल नदीतल्या सुसरी प्रसिद्धच आहेत पण इतरत्र सुसरींची सख्या आता बरीच रोडावलीय याच कारण म्हणजे सुसरीच्या कातडीपासून केलेल्या पर्सेस,

बूट, कातडी पट्टे या गोष्टींची माणसाला लागलेली चटक सुसरी थंड रक्ताच्या असल्यामुळे रात्रभर ऊबदार पाण्यात राहातात, सकाळी बाहेर येऊन उन्हाला बसतात ऊन फार वाढल तर झाडाच्या सावलीत जातात किंवा पुन्हा पाण्यात उतरतात अस 'तळ्यात-मळ्यात' करत शरीराच तापमान बरोबर साभाळतात सुसरींना सहसा शत्रू नाहीतच पण त्याची पिल्ल आणि अडी यावर गरुड, ससाणे, मॅरबू स्टॉर्क याचा डोळा असतो तोंड वासून किनाऱ्यावर पडलेल्या सुसरींच्या डोक्याशी बसून प्लोव्हर पक्षी त्याच्या दाढात अडकलेले मासकण खातात आणि दात साफ करून देतात शत्रू आल्यास मोठमोठ्यान आरडाओरडा करून धोक्याची सूचना देतात मग सगळ्या सुसरी लगबगीन पाण्यात उतरतात शत्रू म्हणजे जमिनीवरून किंवा होडीतून येणारी माणसच !

उन्हाळ्यात सुसरी नदीतळाच्या चिखलात स्वत.ला पुरून घेतात पावसाळ्यात पुराच पाणी आसपास पसरत तेव्हा तिथल्या प्राण्यावरही ताव मारतात सुसरीचा जबडा म्हणजे एक जबरदस्त चिमटा असतो त्या चिमट्यात भक्ष्य पकडून सुसर खोल पाण्यात जाते आणि तो प्राणी गुदमरून मरेपर्यंत पुन पुन्हा पाण्यात कोलाट्या घेते इथे अबोसेलीला मात्र हिप्पोंच्या मानान सुसरी कमी आहेत

## जंगलचे सफाईकामगार

रस्त्यान जाताना अगदी समोरच एक कोल्हा दिसला आम्हाला पाहताच त्यान तिथून पळ काढला कोल्हे सहसा एकटेदुकटेच फिरताना दिसतात जगलचे सफाईकामगार म्हणून कोल्ह्याच नाव घ्याव लागेल त्याची चालसुद्धा दबत दबत नजर चुकवून पसार होणाऱ्या भुरट्या चोरासारखी वाटते मान उच करून रुबाबात चालणारा कोल्हा सहसा दिसणार नाही तो कधी स्वत. शिकार करीत नाही हिंस्र पशूनी शिकार करून आपला 'सिहाचा वाटा' उचलल्यावर जी मृत प्राण्याची कलेवर पडली असतात ती कोल्हे ओढून नेतात उरलेल्या मासाचे लचके तोडून तोडून फक्त हाड शिल्लक ठेवतात अभयारण्यात फिरताना असे कितीतरी पाढरेशुभ्र सागाडे किंवा सुटी हाड पाहायला मिळाली त्यावरून हा प्राणी कोण होता तेही आम्ही ओळखायला शिकलो

जगलच्या या सफाईखात्यात कोल्ह्याच्या बरोबरीन असतात तरस हे प्राणी अगापिंडान चागले थोराड आणि धष्टपुष्ट असतात रग काळा किंवा तपकिरी

ठिपकेवाला पाठीमागून पाहिल तर हा बिबळ्या आहे की काय वाटाव! मात्र पुढून पाहिल की लगेच भ्रमनिरास होतो कुठे बिबळ्याचा रुबाबदार जबडा - कुठे तरसाच लाबुडक थोबाड! काळी तरस एकटी दुकटी दिसतात, पण ठिपकेवाली कुटुब एकत्र राहतात दुसऱ्या प्राण्यान केलेल्या शिकारीवरच तरसाचा डोळा असतो कोल्हे निदान तो शिकारी निघून जाण्याची वाट पाहतात, तरस त्याहूनही धूर्त असतात चित्ता किंवा बिबळ्या प्रचड वेगान पाठलाग करून हरणासारख्या प्राण्याची शिकार करतो पण या पाठलागानतर स्वत इतका दमतो, की थोडा वेळ त्याच्या अगात त्राणच उरत नाही धापा टाकणाऱ्या चित्त्याच्या अगदी डोळ्यादेखत तरस त्याची शिकार पळवून नेत तरसाबद्दल आणखी तिरस्कार वाटावा अशी गोष्ट म्हणजे जेव्हा मोठे वन्यपशू आपल्या बछड्याना सोडून शिकारीसाठी बाहेर पडतात तेव्हा त्याच्या पाळतीवर असलेले तरस बच्च्यावर धाड घालतात तरसापासून चित्तिणीला फार जागरूक राहाव लागत आपली पिल्ल कुणाच्या नजरेला पडू नयेत म्हणून दडवावी लागतात निसर्गाचे कायदे सर्व पशूना सारखे असले, तरी हा न्याय अजब वाटतो

तरसाच ओरडणही मोठ चमत्कारिक असत विशेषत रात्रीच्या वेळेला वाटत, जणू एखादी म्हातारी चेटकीण खदाखदा हसतेय शहारे आणणाऱ्या अशा मानवी हसण्यालाही laughing like a hyena अशी उपमा दिली जाते

हिंस्र श्वापदान शिकार केल्यामुळे कोणतही जनावर जखमी किंवा मरून पडलेल असो, त्याचा वास गिधाडाना बरोबर लागतो म्हातारपणान किंवा आजारान मृत्युपथाला लागलेल्या प्राण्यावरही गिधाडाची नजर पडतेच झाडाच्या शेंड्यावर टोळकी करून बसलेली गिधाड दुरूनच आपल्याला दिसतात आणि समजत त्यानी आपल भक्ष्य बरोबर हेरल आहे सथपणे घिरट्या घालत गिधाड प्रथम अदाज घेतात, खात्री करतात की त्याना कुणी प्रतिस्पर्धी नाहीये, तेव्हाच खाली उतरतात ती मृत प्राण्याची जाड कातडी फाडायची कामगिरी कोल्हे किंवा रानकुत्र्याची पण एकदा कातडी फाटली की तिथून डोक घालून गिधाड अधाशीपणे अक्षरश पोट फुटेपर्यंत खातात इतक की त्याना नतर उडताही येत नाही शहामृगाची जाड कवचाची अडीसुद्धा खाली टाकून फोडून खातात अस बार्नी म्हणाला मृत प्राण्याकडे त्यानी नुसती टक लावली असेल तर खुशाल समजाव - सिह किंवा चित्ता जवळपासच आहे

मात्र या परजीवी प्राण्याना क्षुद्र लेखण्याच मुळीच कारण नाही उलट त्याच्यामुळे इथल पर्यावरण अबाधित राहत कचराडेपोच्या गाड्याना आपण नाक मुरडतो, पण त्या फिरत नसतील तर गावाचा उकिरडा होईल नेमक तेच काम करण्यासाठी निसर्गान कोल्ही, तरस आणि गिधाड याची योजना केलीय, आणि तीसुद्धा मानवापेक्षा अधिक परिणामकारक पद्धतीन

ही आमची पहिलीच सफारी अशी भरगच्च पार पडत होती आजवर माहीत नसलेल्या अनेक नवनवीन गोष्टी कानावर पडत होत्या. आम्हाला विस्मित करत होत्या वेळ कसा भराभर गेला ते समजल नही सध्याकाळचे सहा वाजले होते गोरजमुहूर्तावर अधूनमधून गायींचे कळप चारणारे मसाई भेटत होते सेरेना लॉजवर परतलो तेव्हा सर्वांग धुळीनं भरल होत लॉजवरचा पोहण्याचा तलाव निमत्रण देत होता अर्धा तास पोहल्यावर सारा शीण गेला

आता अधार पडला होता लॉजच्या पाठीमागे असलेल्या पाणथळीवर मोठमोठे प्रकाशझोत सोडले होते पाणी प्यायला आलेली गॅझल, झेब्रे, जिराफ स्पष्ट दिसत होते कीटकाचा किर्र आवाज पार्श्वसगीत देत होता आकाशात चद्र वर आला होता दूरवर चादण्यात न्हायलेली किलिमाजारोची शिखर स्वप्नमय वाटत होती मखमली काळ्या साडीवर खडी काढल्यासारखे तारे चमकत होते आफ्रिकेच स्वत च झाड अकेशिया म्हणजे आपली बाभळ! निष्पर्ण काटेरी अकेशियाचे वृक्ष सर्वदूर पसरलेल्या मैदानी प्रदेशात छत्रीसारखे उगवलेले दिसत होते एरवी दुर्लक्षित अशा या झाडावरही चादण्यान आपली रुपेरी किमया केली होती बाकी सर्वत्र गर्द निबिड काळोखाच साम्राज्य होत ती रात्र दीर्घकाळ स्मरणात ठेवावी अशी होती सेरेना लॉजमध्ये मात्र विद्युद्दीपाचा लखलखाट होता मद्याचे चषक उचावले जात होते काचपात्राच्या किणकिणाटात नाजूक हसण्याच्या लकेरी मिसळत होत्या लॉजच्या हद्दीबाहेर आणि आतल्या वातावरणात कमालीचा विरोधाभास होता

## हत्ती-खरा जंगलचा राजा

दुसऱ्या दिवशी लवकर उठून प्रभातफेरीसाठी सज्ज झालो आता काल सध्याकाळचा धुरळा खाली बसला होता हवा अगदी स्वच्छ, नितळ होती वातावरणात सुखद गारवा होता सूर्योदय व्हायचा होता, पण आकाश पूर्वेकडे आरक्त दिसत होत आमच्या भोवतालचा मॅरॉक स्वॅम्प कधीचा उठला होता

पक्षी भिरभिरत होते जिराफ सलामी देत होते दुडक्या चालीन झेब्रे पळत होते आज आम्ही वेगळ्या वाटेन चाललो होतो हा सारा प्रदेश खजुरीसारख्या खुरट्या झुडपानी भरला होता इथ फार मोठ्या सख्येन हत्तींची हाउसिग कॉलनी दिसत होती अगदी आमच्या वाटेवरूनही मिरवणुकीत जाव तसे हत्ती चालले होते थाबलेल्या गाडीला खेटून जाताना त्याना कसलही भय वाटत नव्हत काचाआडून आम्हीच काहीस घाबरून त्याच निरीक्षण करीत होतो

हत्तीच्या कळपाच नेतृत्व करत असते एखादी आई किंवा सासू शोभावी अशी प्रौढ हत्तीण तिच्या पावलावर पाऊल टाकून जातात तिच्या तरुण लेकीसुना त्याच्या पायापायात घोटाळणारी छोटी हत्तीबाळ इतकी गोजिरवाणी दिसतात! जास्त दगा-मस्ती केली तर आईच्या सोंडेचा फटकारा रपृदिशी बसतोच अगावर-तरीही त्याचा अवखळपणा चालूच असतो सथपणे पुढेपुढे सरकत अखड चरणारा हत्तींचा कळप हे बघत राहाव अस दृश्य असत जवळ गेल तर फाद्या तोडण्याचा काड् काड् आवाज येतो हत्ती हा प्राणी अती खादाड आणि विध्वसक एका हत्तीला दिवसाला जवळजवळ ३०० किलो अन्न लागत दिवसातून १५-१६ तास त्याची पोटपूजा चालू असते

कळपापासून बऱ्याच अतरावर दूर कुठेतरी एकाडा नर सुस्तपणे उभा असतो आपल्याच मस्तीत असणाऱ्या नराला कौटुबिक जिव्हाळा कमीच असतो मात्र आपल्या कच्चाबच्च्याच्या रक्षणासाठी सदैव जागरूक असतात त्या हत्तिणीच एखादी आक्रमक आणि सतप्त हत्तीण सोडेत उचलून छोट्यामोठ्या जनावराना अगदी सहजगत्या भिरकावून देते सिह-चित्तेसुद्धा तिच्या वाटेला जात नाहीत तिच्या पायाखाली तुडवल गेल तर चेंदामेंदाच व्हायचा!

अशा या हत्तीला जगलात कुणाचच भय नसत मात्र माणूस नावाचा भयकर हिंस्र प्राणीच हत्तींचा एकमेव शत्रू आहे हस्तिदताच्या लालसेपायी आजवर किती हत्तींची बेगुमानपणे कत्तल झाली याची मोजदाद करण कठीण आहे जगभरच्या अमिराचे दिवाणखाने सजवण्यासाठी हजारो हत्तींना जीव गमवावा लागला आहे सध्या हत्तींची शिकार बेकायदेशीर असली, तरी दुर्गम भागात चोरून शिकार करणारे असतातच आपल्याकडे नाही का वीरप्पनची टोळी पोलिसाच्या नाकावर टिच्चून धुमाकूळ घालते ? हस्तिदताची तस्करी हा सगळ्याच आफ्रिकी देशाच्या प्रशासनाच्या डोकेदुखीचा विषय आहे फक्त झिबाब्वेमध्ये कडक सरकारी नियत्रणाखाली अधिकृतपणे हत्तींची काही प्रमाणात कत्तल होते

त्याला 'एलिफट कलिग' म्हणतात (Elephant Culling) कारण त्या छोट्याशा देशात हत्तींची सख्या इतकी बेसुमार आहे, की हत्तींनी जगलच्या जगल खाऊन उजाड केली आणि आता त्याची नजर शेतीवाडी-लोकवस्तीकडे वळू लागली आहे एका ठिकाणच अन्न सपल की हत्ती प्रचड सख्येन स्थलातर करतात मोठेमोठे कळप अनेक देशाच्या सरहद्दी ओलाडतात

हत्तींच्या या निवासस्थानी बराच वेळ रमल्यावर आमची गाडी पुढे निघाली खजुरीच्या बनातून पुन्हा एकदा आम्ही तळ्याच्या प्रदेशात प्रवेश केला होता 'अग अग राणी, इथे कुठे पाणी' अस गमतीन म्हणतानाच आम्ही पाणपक्ष्याकडे निरखून पाहात होतो आणि अचानक एक नितातसुदर दृश्य मनावर कायमच कोरल गेल एका विस्तीर्ण पाणथळीवर शेकडो रोहित पक्षी एका पायावर उभे होते नाजुकसा बाधा, निमुळते गुलाबी पाय, पाढऱ्याशुभ्र पखात रक्तवर्णी पिसाचा शिडकावा, अन् कोणत्याही सौंदर्यप्रसाधन कपनीन नक्कल करावी अशी लालचुटुक वक्राकार चोच मोठ्या कौशल्यान आणि नजाकतीन देवान हा देखणा पक्षी रगवला आहे आपल्याही देशात हा देखणा पक्षी पाहुणा म्हणून गुजरातच्या समुद्रकिनाऱ्याजवळ दलदलीच्या प्रदेशात-तसच महाराष्ट्रातही रेहेकुरीसारख्या ठिकाणी येतो

आत्ता आमच्या समोर जे उभे होते ते 'लेसर फ्लेमिंगो' होते. उथळ पाण्यात डोक बुडवून आणि शेपूट वर करून शीर्षासन केल्यासारखे उभे होते रोहिताची चोच बाकदार आणि कगोरेवाली असते त्या कगोऱ्याचा गाळणीसारखा उपयोग करून ते पाणी आणि चिखल बाहेर टाकतात आणि आपल अन्न (छोटे मासे, खेकडे, पाणवनस्पती) आतच अडकवतात तळ्याच्या बाहेर गाडीजवळच भुरकट राखाडी रगाचे, थोड्या मोठ्या आकाराचे 'ग्रेटर फ्लेमिंगो' होते बिचारे राजकन्येच्या कुरूप सावत्र भावडासारखे निस्तेज वाटले मात्र नजर पुन:पुन्हा वळत होती ती समोर-स्वच्छ नितळ जलाशयात उभे राहिलेले ते शेकडो पक्षी आणि त्याची प्रतिबिब मिळून जे अप्रतिम दृश्यकाव्य तयार झाल होत त्याकडे, उगीच नाही अशा ठिकाणाला 'गुलाबी नदनवन' (Pink Paradise) म्हणत भारावलेल्या मन स्थितीतच सेरेना लॉजवर परतलो

## मसाईच्या सहवासात

आज आम्हाला नाश्ता केल्याबरोबर दुसऱ्या एका कार्यक्रमाला जायच होत, 'मसाई खेड्याला भेट' हा आमच्या सफारीचाच एक भाग होता अबोसेलीला

येता येता वैशिष्ट्यपूर्ण पारपरिक वेषातले मसाई नजरेला पडले होते आफ्रिकेत मसाई ही कडव्या लढवय्या वृत्तीची जमात केनियात बहुसख्येन किकुयु लोक राहतात पण त्याच्या खालोखाल मसाई वशाचीच माणस अधिक या लोकाना शेतीभाती माहीत नाही वर्षातून दोन वेळा पडणाऱ्या पावसान इकडे गवत उगवत अशा गवताळ प्रदेशाला 'सॅवाना' म्हणतात हिरव्या चाऱ्याच्या शोधात आपली गायींची खिल्लार घेऊन फिरायच अस याच भटक आयुष्य शेणमाती आणि लहान लहान काटक्या वापरून मसाई छोट्या गोलसर झोपड्या वर्तुळाकार बाधतात अशा १५-२० झोपड्या म्हणजे झाल त्याच गाव किवा वाडी भर उन्हात तळपत असलेल्या या झोपड्या आतून गार असतात हेही नवलच! मातीच्या मडक्यात स्वयपाक म्हणजे मास भाजून खायच 'घरात एका बाजूला चूल-तिच्यावर धूर बाहेर जाण्यासाठी छोट भोक, आणि दुसऱ्या बाजूला अरुदसा चौथरा करून झोपण्याची सोय

मसाई स्वत ला जगलची लेकर समजतात त्याना जगलची भाषा कळते कायदा कळतो एखाद्या काळविटाला गवत खायचा हक्क आहे, तसाच एखाद्या सिंहाला काळवीट ठार करण्याचा हक्क आहे आणि तसाच मसाईलाही सिहाचा सामना करायचा हक्क आहे सिहाशी किंवा कोणत्याही शत्रूशी लढताना मसाईला फक्त तीन गोष्टी लागतात उजव्या हातात भाला, डाव्या हातात ढाल आणि हृदयात साहस

मसाई मुलमुली वयात आली की त्याची सुता करतात त्या वेळी मुलाला प्राण्याच रक्त आणि दही खायला दिल जात १२-१४ वर्षाची पोर गायी राखायला गेली, की कुठेतरी त्याची गाठ बिबळ्या, चित्ता किंवा सिहाशी पडतेच एकट्या मसाईन भाल्यान सिहाला ठार करण हे त्याच्या वयात येण्याच, बहादुरीच लक्षण समजल जात सिहाच डोक भाल्यावर टोचून घेऊन मसाई जवान घरी परततो त्यानतर त्याच्या उजव्या दडावर तीक्ष्ण शस्त्रान रागोळीसारख्या नक्षीदार जखमा केल्या जातात अशा जखमाचे व्रण म्हणजे मसाईच्या मर्दानगीची निशाणीच ही साक्ष पटल्याखेरीज त्याला लग्न करता येत नाही

मसाई ही बहुपत्नीक जमात एक पुरुष कितीही बायका करतो मात्र प्रत्येक बाईचा 'महाल' म्हणजे झोपडी निराळी मसाई खेड्याचा पाटील इग्लिशमधून आम्हाला ही सगळी माहिती देत होता मी त्याला विचारल, "नाही

एखाद्याला सिंहाची शिकार जमली तर तो कुवारा राहतो की काय?'' तो हसून म्हणाला, ''मुलीच्या बापाला दहा गायींचा हुडा दिला की शिकार न मारताही लग्न करता येत ''

मसाईंचा एकूण अवतार नाटकातली सोंग एगवावीत असा असतो एकजात सारे मसाई लालभडक लुंगीसारखी चादर कमरेला गुडाळतात आणि एक खाद्यावरही घेतात कानात प्रचड मोठी जडजड कर्णभूषण असतात त्यांच्या वजनान कान खाद्यापर्यंत लोंबलेले असतात गळ्यात खूप वैशिष्ट्यपूर्ण डिझाइनच्या रगीबेरगी मण्याच्या तारेत ओवलेल्या माळा असतात हातातही तशीच ककण स्त्रीपुरुष दोघाचीही डोकी तासलेली असतात उन्हातान्हातून खूप घाम येतो म्हणून ही पद्धत शेकडो वर्षांपासून ज्या पद्धतीन मसाई राहात आलेत त्यात अजून तिळमात्र बदल नाही मसाई जेव्हा शहरी बनतो, शिक्षण घेतो तेव्हाच तो केस वाढवतो

कोणाच्याही अगावर लाल रग सोडून इतर कपडा दिसणार नाही या लाल रगाला हिंस्र श्वापदही घाबरतात, जवळ फिरकत नाहीत मसाई बहुधा गायी, शेळ्या, मेंढ्या यांच मास खातात हरण, झेब्रे वगैरेंना ते मारत नाहीत दिवसभर तळपत्या उन्हात रानोमाळ भटकल्यावर सध्याकाळी मात्र मद्यप्राशन आणि ढोलकीच्या तालावर नृत्य हे मसाईंचे आवडीचे कार्यक्रम विशेषत: पौर्णिमेच्या रात्री फेर धरून नाचायला त्याना फारच आवडत अशा वेळी मुलगे डोक्यावर रगीबेरगी पिस खोचलेल्या वेण्या लावतात, पायात धातूचे घुगरू बाधतात जगली माजराची कातडी कमरेला बाधतात कोलबस जातीच्या माकडाच्या शेपट्या मोठ्या ऐटीत पाठीमागे अडकवलेल्या असतात नृत्य चालू असताना त्याही डौलदारपणे हलत असतात

आम्ही ज्या खेड्याला भेट दिली तिथे २५-३० झोपड्या होत्या बाहेरून काटेरी कुपण होत वन्यपशूपासून तेवढच काय ते सरक्षण आमची ही भेट प्रत्येकी ५०० शिलिग इतकी जबरदस्त फी भरून होत होती त्यामुळे सारी जनता आमच्या स्वागताला सज्ज होती त्याच्या प्रमुखान अस्खलित इंग्लिशमध्ये आम्हाला माहिती दिल्यावर त्याच्या 'मा' नावाच्या भाषेत एक हुकूम सोडला, आणि चक्क 'स्वागत करूया सकल जनांचे' च्या धर्तीवर त्यानी स्वागतगीत म्हणायला सुरुवात केली त्याच्या हस्तकलेच प्रदर्शनही त्यानी माडल होत

पण भरमसाट किमतींमुळे त्याना एकही गिऱ्हाईक भेटल नाही

खेड्याच्या बाहेरच एकुलत एक बाभळीच झाड होत त्याच्या सावलीत एका फळीवर २ पासून १२ वर्ष वयाची अनवाणी पोर दाटीवाटीन बसली होती पोरगेलेसे मसाईमास्तर फळ्यावर ABCD काढत होते मुल तालासुरात नर्सरी ऱ्हाईम्स म्हणत होती आमच्यासारखे परदेशी पाहुणे त्याना नवीन नव्हते तोडक्या मोडक्या इग्रजीत ती आमच्याशी बोलत होती

केनियामध्ये १९६९ पर्यंत ब्रिटिश वसाहती होत्या त्यामुळे इग्रजी हीच त्याची पहिली भाषा आहे मसाईसुद्धा याला अपवाद नाहीत

**क्वाहेरी अंबोसेली**

दुपारी ४ वाजता अबोसेलीमधली शेवटची सफारी होती कालपासून इथल्या सपाट प्रदेशात हिंडताना मध्येच एक छोटीशी टेकडी-आपल्या पर्वतीएवढी दिसली होती 'ऑब्झर्वेशन हिल' नावाच्या या टेकडीवर बार्नी आम्हाला घेऊन गेला टेकडीवर अर्थात पायी चढून जायच होत आमच्या बरोबरच्या अनेक फिरगी पर्यटकाना मागे टाकून आम्ही भराभर वर चढून गेलो माथ्यावर एक छोटस लाकडी घरकुल होत त्याला चारी बाजूनी मोठमोठ्या खिडक्या होत्या दोन ठिकाणी शक्तिमान दुर्बिणी बसवल्या होत्या तिथून मॅरॉक स्वॅम्पच विहगम दृश्य दिसत होत खूप लाबवर जलक्रीडा करणारी हत्तींची कुटुब, रानरेडे, हिप्पो दुर्बिणीमुळे अगदी स्पष्ट दिसल्यान फार आनद झाला आता आमची नजर थोडीफार सरावली होती आम्हीच प्राणी ओळखून बार्नीला दाखवीत होतो तरीपण मधूनमधून अनोळखी पाणपक्षी दिसतच होते

परतीच्या रस्त्यावर अचानक रानडुकराची एक छोटी पलटण निमुळती शेपूट ताठ वर करून पळत गेली खरोखर विनोदी दृश्य होत ते बार्नी हसून म्हणाला, 'केनियन एक्स्प्रेस आहे ती, मधे कुठे थाबायची नाही " मात्र ही रानडुकर बहुधा पिल असावीत पूर्ण वाढ झालेला आफ्रिकन वॉर्टहॉग म्हणजे एक धडकी बसवणार प्रकरण आहे या प्राण्याला रूपरगाच्या बाबतीत निसर्गान डाव माप दिलय रापलेल्या अगाचा आणि मळलेल्या कपड्याचा खेडवळ शेतमजूर कधी रुबाबदार देखणा दिसतो का? तसाच असतो रानडुक्कर कडक काट्यानी आच्छादलेली राखाडी त्वचा आणि मिचमिच्या डोळ्यात पुरेपूर सशय भरलेला पण म्हणून त्याच धाडस आणि शौर्य कमी लेखायच कारण नाही आपल

घर-म्हणजे खोलवर खणलेल बीळ, आपला परिसर आणि आपले बालबच्चे याच्यावर सकट कोसळल, तर शत्रू कोणताही असो, सर्व शक्तीनिशी त्याच्यावर कोसळून पडतो तो रानडुक्करच आणि ज्या वेगान तो बिळातून निघून सुसाट शत्रूवर धावून जातो त्याचा जवाब नाही त्या शत्रूचा खातमा केल्याखेरीज तो मुळी थाबतच नाही त्या केनियन एक्स्प्रेसला खरोखर दाद द्यावीशी वाटली

वाटेन येताना मधेच एक हिडीस दिसणारा धिप्पाड पक्षी उभा होता गळ्याखाली लोंबकळणाऱ्या पिशवीमुळे तो फारच ओंगळ वाटत होता पुढे जवळच त्याचे आणखी चारपाच भाऊबद दिले जमिनीवर एका खड्ड्यात मादीन अडी घातली होती आणि ती अड्यावर बसली होती या पक्ष्याच नाव 'मॅरबू स्टॉर्क' मृत प्राण्याची शरीर खाऊन जगणारा जगातला एकमेव करकोचा एखाद्या चेटकिणीच्या गोष्टीत शोभेल असा हा कुरूप पक्षी गिधाडावर हल्ला करून त्याच्या तोंडचा घासही पळवायला कचरत नाही

पण मॅरबू स्टॉर्क पाहून धास्तावलेल मन लगेच प्रसन्न झाल ते आणखी एका सुदर्शनी पक्ष्याच्या जोडीमुळे पाढराशुभ्र रग, डोक्यावर काळाभोर ऐटबाज तुरा आणि पायही काळे, नुसत वर्णन ऐकून बानींन सागितल 'सेक्रेटरी बर्डस' आणि खरच Birds of Africa मध्ये लगेच त्याच चित्रही सापडल गवतातून ऐटीत फिरत किडे शोधणाऱ्या या पक्ष्याना टॉक् टॉक् बूट वाजवत चालणाऱ्या सेक्रेटरी मुलींची उपमा दिली जाते

आजही सध्याकाळ सेरेना लॉजवर पोहण आणि बागेतल्या खुर्च्यावर आराम करण्यात घालवली आमचा आणि अबोसेलीचा सबध आता सपला होता नजर पुन पुन्हा किलीमाजारोकडे वळत होती ते निसर्गनिर्मित शिल्प डोळ्यात साठवून घेत होती


दुसऱ्या दिवशी सकाळी सेरेना लॉजमधून नाश्ता घेऊन निघायच होत आतापर्यंत तिथल्या राजेशाही खान्याची सवय झाली होती सुरुवातीला फळाचे रस - अननस, सत्री, पॅशनफ्रूट किवा आबा, सिरिअल, दूध, फ्रूट सॅलड, योगर्ट (दही) गरम गरम टोस्ट, लोणी, चीजचे असख्य नमुने, जॅम, मार्मलेड, हवा तितका उत्कृष्ट स्वादाचा केनियन चहा किंवा कॉफी, उकडलेले बीन्स किंवा बटाट्याचे प्रकार हे तर नुसत शाकाहारी खाण झाल मासाहारी लोकासाठी आणखी वेगवेगळे प्रकार असत खरोखर पर्यटकाना किती लाडावून ठेवायच




भू-प्रवास
९१६
२१४३८
२०/२/९८

हे या प्रवासी कपन्याच जाणोत आजवर अनेकदा परदेशात जाऊनही खाण्यापिण्याची अशी रेलचेल सहसा पाहिली नव्हती सगळ्यात उपासमारीची वेळ तर युरोपमध्ये यायची

तात्पर्य - केनियन सफारीवर जाताना तुम्ही बरोबर नेलेला खाऊ जसाच्या तसा राहतो अतरात्मा शात झाल्यावर तृप्त मनान (आणि पोटान) अबोसेलीचा निरोप घेतला आणि पुढच्या प्रवासाला निघालो



चित्तीण आपल्या बछड्याबरोबर



बलूनमधून अवतरण



मसाई पाटलासमवेत लेखिका



लबूजी लबूजी – रेटिक्युलेटेड जिराफ



सोकावलेला चोर - बबून



अंबोसेली सेरेना लॉज



हत्ती जंगलचा राजा



मोंबासा सी रिसॉर्ट




लेक नैवाशा कंट्री क्लब



पेलिकन . आपल्याच
प्रतिबिंबाच्या प्रेमात ?

अग अग
(आफ्रिकन) म्हशी





देखणा गुलजार गडी
शहामृग नर

## दि ग्रेट रिफ्टव्हॅली - निरोपाचा हसा

**3**

अबोसेलीपासून गरम धुळीन भरलेला रस्ता तुडवत आमची निसान नैरोबीच्या दिशेन पळू लागली हा बार्नी एक कुशल ड्रायव्हर तर आहेच, पण त्याच वेळापत्रकही अगदी बिनचूक असत. नाहीतर खड्ड्यानी भरलेल्या या खराब रस्त्यावरून आतल्या लोकाना कमीत कमी त्रास होईल अशी गाडी भरधाव चालवण आणि वेळेवर मुक्काम गाठण काही सोपी गोष्ट नाही आणि या गाड्याही भक्कम बाधणीच्या, म्हणूनच या रस्त्यावर त्याचा निभाव लागतो

रस्त्यावर एका मसाई गावात गाडी थाबली तिथ त्याच्या हस्तकलेच प्रदर्शन आणि विक्रीकेंद्र होत त्यावर सरकारी निर्बंध असल्यान फसण्याची शक्यता कमी होती हातमागावर विणलेल्या मसाईंच्या लालभडक चादरी, रगीबेरगी सुबक गुफलेले मण्याचे दागिने, लाकडी (साग किंवा शिसव) कोरीव कामाच्या वस्तू - प्राण्याची चित्र, फर्निचर, विशिष्ट रगीबेरगी पाषाणात कोरलेली शिल्प, अस्सल तजेलदार ताब्याच्या कोरीव वस्तू, सिसाल नावाच्या गवतापासून तयार केलेल्या चटया, वॉलहँगिंग्ज असे असख्य नमुने तिथे माडलेले होते मसाई स्त्रीपुरुषाची 'हेडस्' किंवा पूर्णाकृती फारच वैशिष्ट्यपूर्ण वाटल्या आफ्रिकेची आठवण म्हणून त्यातल्या काही वस्तू जिराफ, ऱ्हायनो, हत्ती वगैरे आम्ही घेतल्या पूर्वी अशा दुकानातून सर्रास हस्तिदताच्या वस्तू मिळत असत आता हस्तिदताच्या व्यापारावर बदी घालण्यात आली आहे फक्त झिबाब्वेमध्ये काही शासकीय केंद्रात अजून हस्तिदत मिळतो तसच उत्कृष्ट प्रतीच ताब झाबिया आणि झिबाब्वेमध्येच उपलब्ध आहे, तेव्हा ताब्याच्या वस्तू तिकडच्याच जास्त चागल्या अस सागण्यात आल

मोजक्या परकीय चलनामुळे मोह वाटूनही काही थोड्याच वस्तू घेता आल्या. "तुम्ही कुठून आलात?" अस विक्रेते (तुच्छतेन) विचारीत कारण गोरे पर्यटक भराभर खरेदी करत होते. "आम्ही भारतीय आहोत" "We are Mhındıes" अस स्पष्टीकरण कराव लागल 'मोइडीज' म्हणजे भारतीय

नैरोबीच्या जवळ आल्यावर पक्का डाबरी रस्ता लागला अचानक नैरोबीच्या अलीकडेच बार्नीन गाडी वळवून दिशा बदलली आणि लवकरच लक्षात आल की आपण वेगळ्याच भौगोलिक प्रदेशात प्रवेश केलाय चक्क आपल्या दक्षिण भारतातल्या निलगिरीसारखा डोंगराळ प्रदेश, वळणावळणाचा घाट, जिकडेतिकडे उच्च सूचिपर्णी वृक्ष, डोंगरउतारावर लावलेल्या फ्लॉवर-कोबीसारख्या भाज्या आणि अधूनमधून चहा-कॉफीचे मळे आपण आफ्रिकेत विषुववृत्तावर आहोत अस वाटतच नव्हत सूर्यान ढगाआड केव्हाच दडी मारली होती वातावरणात हवाहवासा वाटणारा गोड गारवा घोटाळत होता गाडी उच उच चालली होती. हा न्गॉन्ग कट्री (Ngong Country) म्हणजे केनियाचा पर्वतीय प्रदेश इथ सर्वत्र समृद्धी दिसत होती अत्यत उत्तम रुद रस्ता, दोन्ही बाजूनी देवदाराच घनदाट अरण्य, एकाहून एक सुरेख बगले आणि इमारती पाहून उटी, कोडाईकॅनालची आठवण येत होती. तिकडे जशा खूप शाळा आहेत तशाच इथही शाळा, महाविद्यालयाच्या इमारती दिसत होत्या लोकल ट्रेनमधून मुल, तरुणतरुणी येऊन आपली वाट धरत होते मुख्यत उच्चभ्रू श्रीमत लोकाच हे वसतिस्थान दिसत होत नैरोबीतले धनाढ्य व्यापारी सुटीचे दिवस घालवायला इथच न्गॉन्गमध्ये येऊन राहातात

अशा नयनरम्य न्गॉन्गमधून जाताना अधूनमधून 'टस्कर बीअर', च्या जाहिरातीचे फलक दिसत होते मोठ्या अक्षरात 'नि सावा हसा' Ni Sawa Hasa' लिहिलेल असायच या शब्दाचा अर्थ आहे "सर्व काही ठीक उत्तम!" All is well with the world' अस प्रसिद्ध Pippa's song' मध्ये म्हटलय ना त्या चालीवरचाच हा वाकप्रचार 'हबारी' (Habari) म्हणून कुणाची चौकशी केली (How are you?) की हसतमुखान उत्तर मिळायच 'नि सावा हसा'

अबोसेलीहून येताना मसाई हस्तकलेच्या अनेक वस्तू पाहिल्या होत्या इथे न्गॉन्गमध्ये अतिशय सुबक विणीच्या तऱ्हेतऱ्हेच्या गवती वस्तू दिसत होत्या तजेलदार रगाची भौमितीय किंवा मुक्तहस्त डिझाइन्स असलेल्या या टोपल्या, पिशव्या किंवा चटया फार आकर्षक होत्या त्याना इथे Sisal mats म्हणतात हातान विणलेल्या या वस्तू म्हणजे उत्तम कारागिरीचा नमुना असून अनेक गृहिणींचा हा घरबसल्या करण्याचा व्यवसाय आहे

आता आम्ही घाटमाथ्यावर येऊन पोचलो इथून दिसणाऱ्या Great

Rift Valley च मनाला भुरळ पाडणार दर्शन घेण्यासाठी सर्व प्रवासी इथ थाबतात Rift म्हणजे घळ किंवा खड्डा पृथ्वीला पडलेला हा लाबलचक खड्डा पार मोझाबिक पासून जॉर्डनपर्यंत पसरलेला आहे इथ केनियात अत्यत सुदर अशा नैवाशा, नाकुरू आणि बोगोरिया तलावानी अन् हिरव्यागर्द वृक्षराजीन ही व्हॅली पूर्ण झाकून टाकलेली आहे आता तर 'नभ मेघानी आक्रमिलेल' होत पाऊस सुरू झाला पावसातून रमतगमत आम्ही घाट उतरून खाली आलो आणि तशाच हिरव्यागार वनश्रीन नटलेल्या नैवाशा गावात प्रवेश केला

# लेक नैवाशा कंट्री क्लब

४

नैवाशात पोचलो तेव्हा हवा अतिशय आल्हाददायक होती चित्तवृत्ती प्रफुल्लित झाल्या होत्या इथल्या 'लेक नैवाशा कट्री क्लब' मध्ये आज आमचा मुक्काम होता नैवाशा सरोवराच्या काठी ब्रिटिशानी बाधलेला हा क्लब उत्कृष्ट स्थापत्याचा नमुनाच आहे एखाद वनस्पतिउद्यान असाव इतक्या काळजीपूर्वक इथल्या विस्तीर्ण बगिच्याची आखणी करण्यात आली आहे नाना तऱ्हेच्या उचउच घनदाट वृक्षवेली, त्यामधून भिरभिरणारे, किलबिलणारे, रगाची उधळण करणारे शाखारोही पक्षी, आणि नजर ठरणार नाही इतक्या लसलसत्या पोपटी रगाची हिरवळ मध्यभागी क्लबहाऊस आणि दोन्ही बाजूनी तळ्याच्या दिशेन कमानदार मार्गावर बाधलेली कॉटेजेस् प्रत्येक कॉटेजपुढे व्हराडा आणि स्वतत्र छोटीशी बाग. मनमोहक फुलाच्या ताटव्यानी बहरलेली! पाहताक्षणी प्रेमात पडाव, असा तो क्लब पाहून प्रवासाचा सारा शीण पळून गेला. हिरवळीवर 'आपलच घर आहे' अशा थाटात चक्क मोर फिरत होते "हा खास भारतीय पक्षी इथ कसा?" विचारल्यावर कळल भारतातूनच आयात केलेत हे पाहुणे पूर्ण माणसाळलेले हे दिमाखदार पक्षी पर्यटकाकडे दुर्लक्ष करून डौलान इकडेतिकडे वावरत होते फोटोसाठी पोजही देत होते.

पाऊस आता सातत्यान रिमझिमत होता जेवणानतर क्लबच्या व्हराड्यात बसून स्वादिष्ट केनियन चहाचे कप पुन्हा पुन्हा घेत दुपारभर बसून राहिलो-क्लबमागेच पसरलेल्या लेककडे पाहात केनियन चहा अगदी सौम्य आणि उत्तम दर्जाचा असतो त्या पावसाळी हवेत तो फारच सुखकर वाटला दुपारी चारच्या सुमारास उघडीप झाली ताबडतोब आम्ही पाऊलवाटेन लेककडे धाव घेतली. नैवाशा लेक खर तर चार वेगवेगळ्या सरोवराच मिळून बनल आहे खुद्द नैवाशा गोड्या पाण्याच असल तरी बाकीची तीन खाऱ्या पाण्याची आहेत मधोमध क्रेसेंट आयलड म्हणून एक छोटस बेट आहे दाट झाडी आणि वेगवेगळ्या पशुपक्ष्यानी भरलेल हे बेट एक निसर्गनिर्मित प्राणिसग्रहालयच आहे

शिवाय इथ हिंस्र श्वापद नसल्यान निर्धास्तपणे पायी फिरून प्राणिनिरीक्षणाची मौज लुटता येते बेटावर जाण्यासाठी तराफा पद्धतीच्या बोटी आहेत कर्कश आवाज करणाऱ्या मोटरलॉंचेसना इथ बदी आहे पूर्वी इथे अँफिबिअन पद्धतीची म्हणजे पाण्यात उतरू शकणारी विमान येत त्याना 'उडत्या नौका' flying boats म्हणत त्यातून आलेले पर्यटक क्लबमध्ये राहात आजच वातावरण पावसाळी असल्यामुळे बोटी बद होत्या कोणीच क्रेसेंट आयलडवर जाऊ शकत नव्हत आम्हीही तळ्याकाठी उभे राहून तिथल सृष्टिसौंदर्य न्याहाळात होतो हातात दुर्बीण आणि बार्नीच Birds of Africa हे पुस्तक होत प्रत्येक पर्यटकाकडे ही आयुध होतीच

पक्षीनिरीक्षणाची सुरुवात करायची असेल तर ती पाणपक्ष्यापासून करावी अस म्हणतात एकतर ते आकारान बऱ्यापैकी मोठे असतात, उघड्यावर समूहान सापडतात त्यामुळे चटकन् दिसतात शाखारोही पक्ष्यासारखे पानाच्या गर्दीत लपलेले नसतात शुभ्र पाढरा आणि चकाकता काळा यामध्ये अनेक दिलखेचक रग पाणपक्ष्यात पाहायला मिळतात त्याच आकाशात उडण आणि पाण्यात पोहण दोन्ही प्रेक्षणीय असत गालबोट लावायच तर त्याच्या आवाजाला लावता येईल बहुतेक जणाचे आवाज कर्कश असतात मजुळ शीळ घालावी ती गर्द रानातल्या शाखारोही पक्ष्यानीच

इथ नैवाशाला प्रामुख्यान दिसत होते पेलिकन पाढऱ्याशुभ्र रगाचे, मजबूत चोचीचे आणि प्रचड आकाराचे आकाशातून वेगान झेपावत येऊन पाण्यात तितक्याच सफाईन पोहणारे पेलिकन थडीत मोठमोठ्या मजला मारून स्थलातर करून इकडे येतात पेलिकनचा थवा पाण्यावर अर्धगोल करून उतरतो, सारेजण पख आपटत माशाना उथळ पाण्याकडे हाकलतात आणि एकदम सगळे मिळून सघटितपणे चोचीखालच्या पिवळ्या पिशवीत मासे भरून घेतात म्हणजे अगदी योजनाबद्ध मासेमारी करतात 'पेलिकन ब्रीफ' ही जॉन ग्रिशॅमची कादबरी वाचल्यापासून पेलिकन बघायची माझी इच्छा आज नैवाशाला पूर्ण झाली

पेलिकन्सना नैवाशाचे राजे म्हटल तरी त्याच्या दरबारात इतर अनेक जातींचे पक्षी होतेच पाणकोंबड्या, बदक, इजिप्शियन गीज ही चिल्लर मडळी सुळकन् पाणी कापत इकडेतिकडे फिरत होती, पटकन् डोक आत घालून पाणवनस्पती किंवा मासे पकडत होती हिमगौर रगाचे आयबिस आपली

कुदळीसारखी बाकदार चोच काठावरच्या गाळात खुपसून भक्ष्य हुडकत होते चमच्यासारखी चोच असणारे 'स्पूनबिल' चोच अर्धी उघडी ठेवून गाळातून फिरवत होते लहान बेडूक, पाणकीटक, मासे जे मिळेल ते स्वाहा करत होते उन्हाची तिरीप पडली की मानेवर-पखावर चकचकीत हिरव्या, जाभळ्या किंवा ब्रॉझ रगाची झळाळी दिसत होती

बगळे, पाणकावळे (कॉर्मोरन्टस्) आणि स्टॉर्क म्हणजे करकोचे याची इथ मोठ्या प्रमाणावर वस्ती दिसत होती किनाऱ्यावरील चिखलात शेकाटे आणि टिटव्या तुरूतुरू फिरत पटकन् चोच मारून भक्ष्य पकडत होत्या जवळपास कोणी गेल तर जिवाच्या आकातान टिटव्या आरडाओरडा करतात काठावरच्या जमिनीत उथळ खड्ड्यातच त्या अडी घालतात शत्रूला हाकलण्यासाठी कर्कश आवाजाखेरीज या चिमण्या जीवाकडे दुसर साधन नसतच

आणि उचावरून एखादा दगड कोसळावा त्याप्रमाणे सरळ खाली झेप घेऊन बघता बघता पाण्यातली मासोळी घेऊन जाणारे हे कोण ? हे तर खड्या किंवा धीवरपक्षी तसा आकार छोटा पण त्यामानान चोच मात्र लाबच लाब आणि जाड, मजबूत कवी वर्णन करतो तसच देखण रूप

**''शुभ्र छाती पिवळे पोट जसा चाफा यावा फुली।**
**पख जणू थंडीमध्ये बंडी घाले आमसुली।।**

खड्या झाडाच्या फादीवर बसून खाली पाण्यात नजर ठेवतो, किंवा पाण्यावर उडताना हवेतच स्थिर राहून टेहळणी करतो आणि पाण्यालगत एखादी मासोळी चमचमली की बस् बाणासारखा सुळकन् झेपावतो अशा या किंगफिशरला कवी मोठी गमतीदार विनती करतो

**'गड्या पाखरा तू असा सारा देखणा रे कसा ?**
**पाण्यावर उडताना नको मारू मात्र मासा।'**

दूर क्रेसेट बेटावर झाडाच्या शेंड्यावर तपकिरी सोनेरी रगाचेही मोठे पक्षी निश्चल बसले होते प्रथम वाटल की ती गिधाड आहेत पण दुर्बिणीतून स्पष्ट दिसल ते होते मासेमारी करणारे पाण्यावरचे पक्षीराज गरूड

नैवाशाहून फक्त ६० किलोमीटर अतरावर नाकुरू सरोवर आहे तिथल्या पाण्यात सोडा जास्त असल्यान खूप अल्गी (शेवाळ) वाढतात त्या खाण्यासाठी हजारोंच्या सख्येन तिथ रोहितपक्षी येतात इतकी गर्दी करतात की तळ्याचा

पृष्ठभाग पूर्ण झाकून जाईल त्या 'गुलाबी स्वर्गाची' अप्रतिम सुदर चित्र क्लबमध्ये जिकडेतिकडे टागली होती मात्र नैवाशावर रोहिताची गैरमर्जी असावी ज्याना बहुतेक नाकुरू 'हाऊसफुल' आढळल, ते तुरळक रोहित नैवाशाला आले असावेत अबोसेलीलासुद्धा आम्हाला जास्त रोहित दिसले होते

खर तर नैवाशा कट्री क्लबमध्ये एक रात्र विश्राम करायचा म्हणून आम्ही थाबलो होतो बरोबर बार्नी नव्हता पण पक्षीनिरीक्षणाचा आनद कसा लुटावा हे त्यान शिकवल होत दुसऱ्या दिवशीसुद्धा पहाटेच आम्ही तळ्याकडे धाव घेतली धुक्याची चादर पाघरून नैवाशा झोपलेल होत आसमतातल्या हिरवाईला आदल्या दिवशीच्या पावसान पाचूची लकाकी लाभली होती हिरवीगार तृणपाती अजून जलबिंदूच्या भारान लवलेली होती सृष्टिदेवी जणू हळुवारपणे 'मलमली तारुण्य माझे तू पहाटे पाघरावे' अस सरोवराला आर्जवत होती पाण्यावर मद मद लहरी उमटत होत्या

बघता बघता हे पाणपक्षी पहाटेचे दूत होऊन आले. धुक्याचा पडदा सारून कोवळी सूर्यकिरण डोकवू लागली नीरव शाततेत केवळ पाखराचे आवाज सोबतीला होते तळ्याच्या कडेकडेन चालताना मनात एक अवर्णनीय आनद भरून राहिला होता 'सरोवर हे निसर्गाच नेत्रकमळ आहे' या थोरोच्या वचनाची आठवण आली जड पावलानी परतताना क्लबच्या हिरवळीवर चरणारा एक धिप्पाड काळवीट (वॉटरबक) दृष्टीस पडला आम्ही खूप ज़वळ जाईपर्यंत त्यान आमच्याकडे बघितलही नाही इपालाच्या दुप्पट मोठा, भरदार अगाचा, चमकदार डोळ्याचा आणि अक्कडबाज शिगाचा तो वनमृग सहा फूट उच असलेली भित एका उडीत लीलया ओलाडून पलीकडच्या गवतात दिसेनासा झाला

मनात हुरहुर दाटत असतानाच आम्ही नैवाशाला 'क्वाहेरी' करून बार्नीला 'जाबो, बार्नी, टवेन्डे' म्हणून सागितल, आणि आमची निसान रस्त्याला लागली आता आमचे डोळे लागले होते केनियातल्या सर्वांत मोठ्या अभयारण्याकडे म्हणजेच 'मसाईमारा'कडे

## मसाईमारा : द बिग फाइव्ह

५

मसाईमारा म्हणजे जगप्रसिद्ध सेरेन्गटी अभयारण्याचाच उत्तरेकडील भाग 'मारा' नदीच्या दोन्ही बाजूनी पसरलेला विस्तीर्ण पठारी प्रदेश, मध्येच छोट्या टेकड्या आणि त्याच्या कुशीतल्या घळी, आणि उघड्या गवताळ कुरणात मधे-मधे छत्रीसारखा विस्तार असणारे अकेशियाज् (बाभळी) हे मसाईमाराच चित्र या प्रदेशाचे पिढ्यान् पिढ्या राजे आहेत मसाईवशीय नीग्रो आणि आफ्रिकन 'बिग फाइव्ह' म्हणजे सिंह, हत्ती, रानरेडा, ऱ्हायनो आणि चित्ता

माराकडे जाणारा रस्ता अत्यत खराब आणि खड्ड्यानी भरलेला होता अशा रस्त्यावरून गाडी चालवण आणि वेळेवर पोचण खरच कौशल्याच काम होत मात्र बार्नीन ज्या आत्मविश्वासान आमची निसान अशी भरधाव पळवली की पुन पुन्हा त्याला दाद द्यावी त्याच म्हणण अशा रस्त्यावर वेगानच जाव लागत, नाहीतर गाडीच्या सस्पेंशनची पुरी वाट लागते

सध्या मारामध्ये शुष्क कोरडा सीझन होता. इथे दोन हप्त्यात पाऊस पडतो नोव्हेंबर-डिसेंबर २ महिने आणि फेब्रुवारी ते मे या महिन्यात आम्ही गेलो तेव्हा ऑक्टोबर सपत आला होता ऊन 'मी' म्हणत होत गवत पूर्ण वाळून पिवळ सोनेरी पडल होत याच वेळी दक्षिण सरहद्दीपलीकडे टाझानियात सेरेन्गटीमध्ये हिरव्या चाऱ्याची लयलूट होती त्यासाठी शाकाहारी प्राण्याच्या झुडीच्या झुडी दक्षिणेकडे निघाल्या होत्या दरवर्षी सुमारे २० लाख गवतखाऊ प्राणी (यात मुख्यत झेब्रे, हरण, वाइल्डबीस्ट आणि हत्तीसुद्धा असतात) केनियातून टाझानियात आणि पुन्हा उलट दिशेन प्रवास करतात या प्राण्याच्या मागोमाग त्याची शिकार करणारे हिंस्र पशूही असतातच याला महान् स्थलातर (Great migration) म्हणतात

हे स्थलातर करताना असख्य माद्या बछड्याना जन्म देतात हिंस्र पशूची शिकार बनून गवतखाऊची सख्या फार रोडावू नये म्हणून निसर्गानच ही युक्ती योजली आहे सेरेन्गटीकडे जाताना मोठमोठ्या कळपाना 'मारा' नदी ओलाडावी

लागते जिथ पाण्याला उतार असेल अशी जागा शोधून पैलतीरी जाण्यासाठी झेब्रे आणि वाइल्डबीस्ट (ग्नू) पाण्यात उतरतात प्रवाह जोराचा असतो दगडगोट्यावरून पाय सटकत असतात गर्दीमुळे ढकलाढकली, रेटारेटी होत असते. 'बळी तो कान पिळी' या न्यायान जो ताकदवान असेल तो पुढे जातो पाण्यात मगरी दबा धरून थाबलेल्या असतात. सधी मिळताच एखाद्या ग्नू चा पाय जबड्यात धरला की झाल मगर त्याला खोल पाण्यात ओढून घेऊन जाते आत्ताचा हा काळ स्थलातराचा असल्यान आपली नैसर्गिक वसतिस्थान सोडून हजारोंच्या सख्येन हे प्राणी सेरेन्गटीकडे निघाले होते प्राणिनिरीक्षणासाठी हा काळ सुयोग्य समजला जातो

मसाईमाराच्या प्रवेशद्वारापाशी गाडी थाबताच हस्तकलेचे नमुने विकणाऱ्या मसाई बायकानी आम्हाला गराडा घातला भरपूर घासाघीस करून बऱ्याच पर्यटकानी रगीबेरगी मण्याचे दागिने खरेदी केले मीही माझी मुलगी आणि तिच्या मैत्रिणींसाठी बागड्या घेतल्या 'फ्रेंडशिप बँड' म्हणून त्या पुण्यात सगळ्याना आवडल्या दुकानातल्यापेक्षा हे भावही जरा कमी होते इथ आमचा मुक्काम कीकरॉक लॉजवर होता मसाईमारात बाधलेल हे पहिलच लॉज पचताराकित सुविधा असलेल हे विश्रामधाम ऐन रखरखीत वैराण प्रदेशात उभ केल आहे मुख्य इमारतीत भोजनगृह, मद्यालय, चहापानगृह आणि इतर अनेक दालन आहेत, तर निवासाची सोय स्वतत्र कुटिरात केलेली आहे लॉजच आवार प्रचड मोठ असून पोहण्याचा तलावही इथ आहे इथल्या पर्यटकात हिंदी चेहेरेही दिसत होते काहीजण तर अगदी मुबईहून आले होते इथल्या शाकाहारी मेनूमध्ये चक्क पुरी किंवा चपातीचा समावेश होता. जेवण उरकून थोडा आराम केला आणि मारामधल्या 'बिग फाइव्ह' च्या दर्शनासाठी सज्ज झालो

मसाईमारा हे ६५० चौरस मैल पसरलेल विस्तृत अभयारण्य आहे त्यामध्ये असख्य रुळलेल्या वाटा आहेत एका वेळी जवळजवळ ३०-३५ गाड्या पर्यटकाना घेऊन या वाटावरून फिरत असतात, मारा बुश पिंजून काढत असतात प्रत्येक गाडीत रेडिओ असतो सदेशाची देवाणघेवाण सतत चालू असते एखाद्या गाइडला चागल श्वापद दृष्टीस पडल की तो रेडिओवरून इतराना ती जागा कळवतो २-४ मिनिटात भराभर आणखी ५-६ गाड्या तिथ येऊन पोचतात या बाबतीत सगळे गाइड 'एकामेका साह्य करू, अवघे धरू सुपथ' या चालीन चालतात

अर्थात पर्यटकाचा त्यात फायदाच होतो त्यानाही वेगवेगळे प्राणी पाहता येतात म्हणजे, तुम्ही कोणत्याही प्रवासी कपनीतर्फे गेलात तरी प्रत्यक्ष सफारीच्या वेळी तुम्ही या गाइड मित्रमडळींच्याच ताब्यात असता

आमची निसान कीकरॉक सोडून थोडीशी पुढे जाते ना जाते तोच 'टोपी' हरणाच्या कळपानी आमच स्वागत केल इपालापेक्षा बरीच मोठी, पुष्ट अशी टोपी हरण त्यांच्या पायावरच्या जाभळ्याकाळ्या डागामुळे चटकन् ओळखू येतात हुबेहूब अशीच दिसणारी पण हे जाभळे डाग नसणारी 'हार्टबीस्ट' हरणपण खूप पाहिली थोड्याच वेळात बार्नीन गाडी थाबवली आणि बोटान निर्देश करून तो काही तरी दाखवू लागला निरखून पाहिल्यावर तीन फूट उचीच्या पिवळ्या गवतात मिसळून गेलेला ठिपक्या-ठिपक्याचा सोनेरी प्राणी पाहिला प्रथम मला तो बिबळ्याच वाटला पण आकारान खूपच छोटा, अत्यत तरतरीत, ताठ मानेचा आणि उभ्या कानाचा तो प्राणी म्हणजे रानमाजर होत (Serval cat) हा निशाचर प्राणी शिकार करूनच पोट भरतो ससे, खारी, छोटे पक्षी हे त्याच खाद्य

पाठोपाठ तरसाच एक कुटुब एक घळईत सावलीला पहुडलेल दिसल हे तरस काळसर राखाडी नव्हते तर ठिपकेवाले पिवळे होते त्याची लाबुळकी तोंड पाहिल्यावरच त्याची ओळख पटत होती तरस दिसायला कुत्र्यासारखी असली तरी ती कुत्र्याप्रमाणे भक्ष्याचा पाठलाग करू शकत नाहीत वाघसिहाप्रमाणे एका उडीत भक्ष्याला लोळवण्याच सामर्थ्यही त्याच्याकडे नसत राखाडी तरस बहुधा एकेकटे फिरतात आणि कोल्हेगिधाडानी फस्त केलेल मृत जनावराच उरलसुरल मास खाऊन जगतात अगदी मोठमोठी हाड मजबूत दाढानी फोडून आतली अस्थिमज्जासुद्धा खाऊन टाकतात मात्र आम्हाला दिसलेले हे ठिपकेवाले तरस समूहान राहतात बिबळ्या, चित्ता किंवा सिहसुद्धा जर एकाकी असेल तर तरसाचा कळप अशा हिंस्र पशूलाही त्याच्या भक्ष्यावरून पळून लावतो. एकूण काय, तरस बघून मनाला तितकस बर वाटत नाही, हे खर।

थोडसच पुढे गेल्यावर बार्नीन गाडी पुन्हा थाबवली आमच्यापुढेच निघालेल्या अजून २-३ गाड्या आधीच तिथ थाबल्या होत्या जवळपास तर कुठलच जनावर दिसेना मात्र सगळ्याच्या नजरा एका गरीबवाण्या झाडाकडे लागल्या होत्या बिनफाद्याच्या या सरळसोट झाडाला फक्त टोकाशी काय तो

थोडासा शेंडा होता तिथच तेवढी पानाची झुपकेबाज टोपी होती त्या पानाआड साक्षात् एक बिबळ्या दडून बसला होता शिकार मारून दातात पकडून त्यान ती झाडावर नेली होती आणि स्वस्थपणे तो आपल्या भक्ष्याचा समाचार घेत होता हा बिबळ्या झाडावरून थेट आमच्या गाडीवरही उडी मारू शकला असता नव्हे, याच पद्धतीन अनेकदा बिबट्या शिकार साधतो म्हणून गाड्या काहीशा लाब उभ्या करून माणस दुर्बिणीतून बिबट्याचा वेध घेत होती पानाआड लपल्यामुळे त्याच सपूर्ण शरीर दिसत नव्हत, पण 'त्याची जाडजूड शेपटी आणि पाठीचा भाग आम्हाला स्पष्ट दिसत होता बार्नीन गाडी हळूहळू गोल फिरवत आम्हाला त्याच दर्शन सर्व बाजूनी घडवल 'बिग फाइव्ह' मध्ये झाडावर चढण्यात बिबट्यासारखा तरबेज दुसरा कोणी नाही माणसाच्या डोळ्यापेक्षा बिबट्याच नेत्रपटल फार सवेदनशील असत अधुक प्रकाशात किंवा काळोखातही इन्फ्रारेड कॅमेऱ्याप्रमाणे तो चागल बघू शकतो म्हणून तर हा प्राणी जातिवत निशाचर आहे. 'Leopard hunts in the dark' अस विलबर स्मिथच्या एका कादबरीच शीर्षकच आहे

बिबट्याला तिथच सोडून आम्ही गाडी पुढे काढली झेब्रे, ग्नू आणि टोपी हरणाच्या कळपातून वाट काढीत पुढे जाऊ लागलो शहामृग, जिराफ याची बेतशीर कुटुबही भेटत होतीच हत्तींचे समूह सथपणे झुलत होते आईच्या पावलावर पाऊल टाकून जाणारी वेगवेगळ्या वयाची हत्तींची पोर बघून 'जगल बुक' ची आठवण येत होती हे सारे प्राणी तसे रमतगमत जाताना दिसले तरी त्याचा रोख दक्षिणेकडे स्पष्ट दिसत होता

आणि अचानक बार्नीन तुफान वेगान गाडी पळवायला सुरुवात केली बेसावधपणे उभे राहिलेले आम्ही चटकन् खाली बसून आधार शोधू लागलो दोनतीन किलोमीटर अतर तोडून जाताना निरनिराळे तर्कवितर्क मनात लढवत होतो आणि अचानक नाटक पाहायला मिळाव तसा लायन शो पाहायला मिळाला, अगदी 'बॉक्स' मधून आफ्रिकन सिहाच आम्हाला झालेल हे पहिलच दर्शन दोन माद्या आणि पाच पिल्ल अस कुटुब गुडघा गुडघा वाढलेल्या गवतात बेमालूम मिसळून गेल होत सिहाची सोनपिवळी त्वचा गवताच्या पिवळ्या रगाशी हुबेहुब मॅचिग साधत होती सरूपतेचं वरदान मिळालेला हा प्राणी भक्ष्याच्या अगदी जवळ जाईपर्यंत भक्ष्याला त्याचा पत्ताच लागत नाही

दोन्ही सिहिणी अगदी शात बसल्या होत्या अधूनमधून मान वळवून आजूबाजूला जमलेल्या प्रेक्षकाकडे बघत होत्या बच्चे गुरकावत होते झोंबाझोंबी करीत एकमेकाच्या खोड्या काढीत होते मधूनच एखाद हळव्या भुकेच पोर येऊन आईला लुचत होत आईला की मावशीला हे कळायला मार्ग नव्हता या दोन बायकाचा दादला कुठे दिसत नव्हता बच्च्याच्या अगावर फिकट तपकिरी ठिपके होते सिहिणींच अग मात्र नितळ तुकतुकीत सोनेरी होत

माजराच्या घराण्यात सिंह हा एकमेव समाजप्रिय प्राणी गवताळ कुरणाच्या या सॅवाना प्रदेशात वावरणाऱ्या सिंहाचे समूह असेच मोठमोठे असतात साधारणपणे एक मोठा नर इतरावर वर्चस्व गाजवतो एका कळपात एकाच वेळी अनेक सिहिंणींना पिल्ल होतात कळपातल्या सगळ्या छाव्याच सगोपन सिहिणी सारख्याच ममतेन करतात शिकार करून छाव्याच पोट भरण आणि तरसासारख्या शत्रूपासून त्याच रक्षण करण ही दोन्ही काम सिहिणी मोठ्या दक्षतेन करतात सिहाला बाप बनण्याखेरीज बहुधा फारस काम नसत सुस्तावून लोळत पडण्यात त्याचा बराचसा वेळ जातो सिंहिणींनी मिळवलेल्या शिकारीतला आपला 'सिहाचा वाटा' उचलायला मात्र तो मागेपुढे पाहात नाही

डोळे भरभरून केवळ १०-१५ फुटावरून आम्ही त्या सिहकुलाला निरखत होतो कॅमेरे फटाफट चालले होते शेवटी सिहिणींनाच आमचा कटाळा आला असावा एकवार तुच्छतेन त्यानी आमच्याकडे पाहिल आणि आपली पिलावळ घेऊन डौलान त्या निघून गेल्या एका घळईतून पलीकडे दिसेनाशा झाल्या नाटक सपल्यावर गर्दी हटावी त्याप्रमाणे तिथे जमलेल्या साऱ्या गाड्या पागल्या

अबोसेलीसारखी दलदल इथ नसली तरी रानरेड्याचे कळप भरपूर होते बार्नी जिला 'केनियन एक्स्प्रेस' म्हणायचा अशी रानडुकराची पलटण भरधाव पळापळ करताना अनेकदा दिसली अचानक एका उघड्या खडकावर उन्हात लोळणाऱ्या तीन सिहिणी दिसल्या पूर्ण वाढ झालेल्या ऐन वयातल्या त्या माद्या कट्टयावर बसून गप्पा मारणाऱ्या मैत्रिणीच वाटल्या थोड्या वेळान त्याच्यातली एक उभी राहिली आणि आळस द्यावा त्याप्रमाणे तिन आळोखेपिळोखे दिले, शेपूट वर उचावली अन् एक मस्त आरोळी ठोकली मात्र, आम्ही तिथून काढता पाय घेतला त्या आरोळीला प्रतिसाद देणारा कोणी आयाळबहाद्दर येतोय का, हे बघण्याची उत्सुकता तशीच राहिली.

आतापर्यंतचा वेळ इतका भराभर गेला होता, सहा वाजत आलेत हे समजलच नाही ती जाणीव करून दिली तिरप्या उन्हान आणि लाब सावल्यानी आम्ही कीकरॉकपासून बरेच दूर आलो होतो परतीच्या वाटेला लागण आता क्रमप्राप्त होत आजची सफारी भरगच्च घटनानी भरलेली होती आणि अचानक बोनस मिळावा त्याप्रमाणे एक चित्तथरारक नाट्य पाहायला मिळाल सारा चारपाच मिनिटाचा खेळ, पण क्षणोक्षणी उत्सुकता वाढवत नेणारा

त्याच अस झाल रेडिओतून खूपच उत्तेजित स्वरात स्वाहिलीतून सदेश येत होता 'किल किल' (Kill) असे शब्द मधूनच ओळखू येत होते तेव्हा पुन्हा एकवार वाकडी वाट करून इतर गाड्याचा शोध घेऊ लागलो थोड्याच वेळात एका मोकळ्या माळरानावर येऊन पोचलो तिकडे ४-५ गाड्या आधीच येऊन थाबल्या होत्या बार्नीनं लाबूनच गाडी न्यूट्रलमधे टाकून अगदी कमी कमी आवाज करत ते ठिकाण गाठल आधी पोचलेले लोक दुर्बिणी आणि झूमलेन्सेस सरसावून काहीतरी शोधत होते गाड्याची इजिनही बद होती दूरवर तीन नाजूक लहानखोर चणीची गॅझल हरण सथपणे चरत होती पण ते दृश्य काही नवीन नव्हत आम्हाला एक अक्षरही न बोलता लोक नुसत्या खाणाखुणा करत होते शेजारच्या गाडीतून मान उचावून बघणाऱ्या गोऱ्या म्हातारीला मीही भुवया उच करून विचारल, 'काय चाललय ?' तिन ओठातल्या ओठात पुटपुटत जबाब दिला, 'चीऽता' तिच्या तर्जनीच्या दिशेन निरखून पाहिल तेव्हा अवघ्या १५-२० फुटावर एका खोलगट लपणात मुरून बसलेल ते जनावर नजरेला पडल लाब सडपातळ शरीर, अगावर काळे ठिपके, अप्रमाणबद्ध वाटाव इतक छोट डोक-नुसत बघायला तरी छाप पाडेल अस हे रूप नव्हत कान तेवढे अधूनमधून हलत होते मात्र त्याच्या बसण्यामध्ये आराम किंवा शिथिलता अजिबात नव्हती उलट सगळ शरीर सुगठित, स्नायुमय, आकुचन पावलेल त्या स्नायूचा ताण डोळ्याला जाणवत होता आणि आमचा मानसिक ताण वाढवत होता दोन-तीन मिनिट अशी गेली असतील वाऱ्याचा सुळसुळ् आवाजच काय तो शाततेचा भग करीत होता

हळूच-अगदी हळूच तो चित्ता उभा राहिला दहावीस पावल तशीच दबकत दबकत सथपणे त्यान टाकली आणि मग-विजेचा लोळ कोसळावा त्याप्रमाणे तो यमदूत लाबलाब झेपा टाकीत त्या निरागस हरिणाच्या दिशेन

दौडू लागला 'जगातला सगळ्यात वेगवान प्राणी' हा किताब काही उगीच नाही मिळालेला त्याला ताशी ११० ते १२० कि मी वेगान तो पळू शकतो मात्र हा झझावती वेग काही सेकदच टिकवता येतो पण ते सेकद भक्ष्यावर तुटून पडायला पुरेसे असतात

इकडे आम्ही प्रेक्षक श्वास रोखून बसलो होतो सर्वांनाच छातीत धडधड जाणवत होती कळत नकळत त्या नाट्याचा आम्ही एक भाग बनलो होतो 'देवा, वाचव त्या गोजिरवाण्या हरणाना' अशी मूक प्रार्थना करत होतो आणि खरोखर आमची प्रार्थना 'तिकडे' ऐकू गेली असावी चित्ता जीवघेण्या अतरावर येण्याआधीच हरणाना त्याची चाहूल लागली तिघजण तीन दिशाना टाणटाण उड्या मारत वाऱ्याच्या वेगान पळाली डोळ्याच पात लवत ना लवत तोच दिसेनाशी झाली चित्त्यानही त्याचा पाठलाग केला नाही खिलाडूपणे माघार घ्यावी तसा सथ पावल टाकत तो पुन्हा समोर येऊन बसला

एरवी निशाचर असणारा चित्ता बिबट्याप्रमाणे झाडावरही चढू शकतो पण त्याच खर कसब पाहायला मिळत ते उघड्या गवताळ वाखरात, प्रचड वेगान पाठलाग करून भक्ष्याला लोळवताना भक्ष्याच्या पाठीमागून सवारी करून चित्ता प्रथम त्याचा वेग कमी करतो आणि शक्य तितक्या लवकर त्याच्या नरडीचा घोट घेतो श्वासनलिका फाटली की काही सेकदात तडफडून भक्ष्याचा प्राण जातो आपल्या दूधपित्या बच्च्याना शर्थीन प्रयत्न करून चित्तीण जगवते तरसासारख्या शत्रूपासून वाचवण्यासाठी कुठे खबदाडीत त्याचा लपवून ठेवून त्याच्यासाठी शिकार करून आणते एखाद हरिण नुसत जखमी करून आपल्या पिलाना ती शिकार करायच शिक्षण देते दातात पकडून झाडावर शिकार घेऊन जायला शिकवते निसर्गान चित्त्याला विजेची चपलता दिली त्यासाठी त्याच शरीर लाबसडक बनवल, डोक लहान आकाराच केल, शक्तिशाली पायाचे स्नायू दिले, पण प्रचड वेग गाठण्यासाठी शरीर कमी वजनाच ठेवल त्यामुळे मोठ्या भारी प्राण्यापुढे चित्ता निष्प्रभ ठरतो

काहीसे उत्तेजित होऊन लॉजवर परतताना वाटल, हरण वाचली पण चित्त्याच काय? 'जीवो जीवस्य जीवनम्' हा निसर्गाचा मूलमत्र नाही का? इतराना हा प्रसग सागताना कळल, काही लोकाना सिहिणीन केलेला झेब्राचा पाठलाग पाहायला मिळाला आहे सफारीवर बाहेर पडल की कुणाला काय

दिसेल हा निव्वळ योगायोगाचा भाग!

## मसाईनृत्य आणि 'तुम जियो हजारो साल'

कीकरॉकवर परतल्यावर आम्ही स्नान वगैरे करून ताजेतवाने झालो आणि लॉजच्या मुख्य इमारतीकडे आलो कारण लॉजच्या व्यवस्थापनान सात वाजता मसाईनृत्याचा कार्यक्रम आयोजित केला होता बघता बघता लाउजच्या खुर्च्या भरल्या सारेजण उत्कठेन वाट पाहू लागले बरोबर सात वाजता वाद्य वाजू लागली आणि रागेन पारपरिक वेषातल्या ८-१० मसाईंनी प्रवेश केला आणि आपला मेकप आणि चित्रविचित्र आभूषणाच प्रदर्शन करीत प्रेक्षकातून एक चक्कर मारली

अचानक वाद्यसगीतान वरची पट्टी गाठली अत्यत घोगऱ्या आवाजात साऱ्या नर्तकानी घशातून सूर काढून त्याला साथ दिली आता मुलमुली एकमेकाच्या खाद्यावर हात टाकून गोलाकार उभी राहिली. गोलाच्या मध्यावर एक तरुण आला आणि एका विशिष्ट लयीत त्यान सूर काढायला सुरुवात केली ते एक प्रेमगीत होत लौकरच वर्तुळातले तरुणही त्याला साथ देऊ लागले. तो जागच्या जागी डोलत होता बाकीचे पायान ताल देत होते वाद्याचा आवाज आणि लय हळूहळू वाढत होती बघता बघता विशिष्ट हालचाली करत हवेतच खाडकन् दोन्ही पावल जुळवून आवाज काढला पुन्हा पुन्हा सूर काढीत त्यान उच-अधिक उच उड्या मारायला सुरुवात केली तो दमल्यावर त्याची जागा दुसऱ्यान घेतली, नतर तिसरा तरुण पुढे आला मुली जागच्या जागी धुद होऊन थिरकत राहिल्या ज्या तरुणान जास्तीत जास्त वेळा उचात उच उड्या मारल्या, तो आजच्या रात्रीचा हीरो ठरला सगळ्या मुली कौतुकभरल्या डोळ्यानी त्याच्याकडे बघत राहिल्या वाटल, पौर्णिमेचा चद्र वर आला असताना एखाद्या मसाई खेड्यात उघड्यावर केलेल हे नृत्य किती जोषपूर्ण होत असेल!

अर्ध्या तासाचा हा कार्यक्रम सपल्यावर मडळी एकमेकाशी गप्पा मारण्यात दग झाली भोजनगृह लगतच होत, त्यामुळे अनेकानी तिथच बसून प्रतीक्षा करण पसत केल वाइनचे चषक रिते होऊ लागले 'टस्कर' बीअरचे पेले फेसाळू लागले युरोपमधली प्रेक्षणीय स्थळ अमेरिकन प्रवाशानी भरून गेलेली असतात पण इथ मात्र युरोपियन्सचा भरणा अधिक दिसला त्यातही इग्लिश लोक जास्त बऱ्याच प्रवासी कपन्याच्या मुख्य कचेऱ्या लडनमध्येच आहेत

आणि ब्रिटिश कॉलनीज्मुळे इंग्लिश लोकाना आफ्रिका जवळची वाटते आपल्याला वाटत वन्यपशू बघायला लहान मुल किंवा तरुणाना रस असेल पण 'अग गलित, पलित मुण्ड, दशनविहीन जात तुण्डम्' असे हे स्त्रीपुरुष तरुणाना लाजवणाऱ्या उत्साहान प्राणिनिरीक्षण करताना आम्ही पाहातच होतो आपल्याकडेही हळूहळू पर्यटन सस्कृतीन मूळ धरल आहे प्रवासासाठी वेळ आणि पैसा खर्च करण लोकाना मानवू लागल आहे

आठ वाजले जेवण तयार असल्याची सूचना घटानादान दिली भोजनगृहात गेल, की प्रथम सूट, बूट, टाय अशा वेषातला मेटर-डी (वेटर्सचा प्रमुख) अदबीन पुढे येतो कमावलेल नम्र हसू ओठावर खेळवीत सफाईदार इंग्लिश बोलत नम्रपणे आपल ठरलेल आसन दाखवतो त्या टेबलवर आपल नाव लिहिलेली छोटी पाटी असते वेटर्ससुद्धा कडक युनिफॉर्ममध्ये, माजरपावलानी चालणारे, चपळाईन सर्व्ह करतात पाण्यान हिंदकाळणारे ग्लास तुमच्यासमोर आदळत नाहीत किंबहुना ते पाणी आणतच नाहीत कारण जेवणाबरोबर मद्यपान किंवा पेप्सीसारख शीतपेय घ्यायचीच पद्धत आहे अशी मनाला सुखवणारी सेवा त्यानी दिल्यावर आपण 'असान्ते' म्हणायच म्हणजे धन्यवाद द्यायचे की लगेच उत्तर येत 'कारिबू' (you are welcome) हा 'असान्ते - कारिबू' चा जप सगळीकडे चाललेला भोजन चालू असताना मधेच येऊन मेटर-डी चौकशी करणार "जेवण आवडल ना ?" आपणही Mzuri (खूपच छान) अस कौतुक करायच

आज निम्म जेवण झाल आणि एकदम दिवे गेले हा काय प्रकार म्हणून बघतो तोच स्वयपाकघरातून एक छोटीशी मिरवणूक येताना दिसली एका शोभिवत ट्रेमध्ये भला मोठा केक, त्यावर मेणबत्त्या लावलेल्या असा हातात धरून येणारा कुक त्या मिरवणुकीच्या अग्रभागी होता स्वयपाकाची भाडी, पळ्या, चमचे याचा वाद्यवृद वाजवीत स्वाहिली गाण म्हणत इतर कर्मचारी नाचत येत होते बघताबघता मिरवणूक एका टेबलाशी थाबली तिथ बसलेल्या एका मध्यमवयीन स्त्रीला समारभपूर्वक तो केक कुकन अर्पण केला तिच्या बरोबरच्या लोकानी टाळ्या वाजवायला सुरुवात केली गाण्याचे सूर उच्च गेले, पाठोपाठ दिवे प्रकाशित झाले हॉलमध्ये सगळ्या टेबलावर हातान ठेका धरला जाऊ लागला आणि 'हॅपी बर्थडे टू यू' या परिचित गाण्याचे सूर सगळ्याच गळ्यातून

उमटू लागले

त्या स्त्रीचा आज वाढदिवस होता तिचा पती आणि इतर मित्रमंडळींनी हा बनाव घडवून आणला होता हॉटेलच्या व्यवस्थापनान त्याला उत्तम साथ दिली होती सारेच पर्यटक त्यात सामील झाले लाजेन आणि आनदान तिचा चेहरा नुसता फुलून गेला होता हा आगळावेगळा वाढदिवस तिच्या कायमच्या स्मरणात राहणार होता मसाईनृत्याइतकाच हा प्रसग मला तरी अतिशय आवडला

# बलून सफारी आणि शँपेन ब्रेकफास्ट

६

आज आमच्या आफ्रिकन सफारीचा शेवटचा दिवस आतापर्यंत आलेल्या अनुभवाचा उत्कर्षबिंदू आज साधला गेला पाहिजे अस मनोमन वाटत होत आणि यासाठी आम्ही सुप्रसिद्ध 'बलून सफारी'च आरक्षण काल रात्रीच केल होत

त्यानुसार आज पहाटे साडेपाचलाच दरवाजावर थाप पडली (इथे प्रत्येक कुटिरात फोनची सोय नाही ) घाईघाईन तयार होऊन आम्ही लॉजच्या मुख्य दालनात आलो आमचा कॅप्टन डॉन हा आम्हाला टी-शर्ट आणि अर्ध्या चड्डीत कालच भेटला होता - आज नखशिखात वैमानिकाच्या वेषात आमच स्वागत करायला उभा होता त्याची माणस तासभर आधीच पूर्वतयारीसाठी बलूनपोर्टवर रवाना झाली होती गरम वाफाळणारा चहा घेऊन आम्हीही चटकन् निघालो जीपमधून पाच-एक मिनिटातच बलूनपोर्टवर येऊन पोचलो

माझ्या कल्पनेतल्यापेक्षा हे बलून केवढ तरी अवाढव्य होत मजबूत नायलॉनच हे रगीबेरगी बलून फुगल्यावर तीन मजली इमारतीएवढ मोठ झाल होत एका प्रचड मोठ्या ब्लोअरमधून त्यात हवा भरली जात होती बलून आता थड हवेन पूर्ण भरल होत, हेलकावे खात होत त्याच्या दोऱ्या एका भक्कम आयताकृती बास्केटला अडकवण्यात आल्या होत्या या बास्केटला चार कप्पे होते प्रत्येक कप्प्यात तीन माणस उभी राहायला जागा होती आधारासाठी आतल्या बाजूला मजबूत पट्टे होते ते धरूनच उभ राहायच होत शक्यतो निश्चलपणे - अगदी कमीत कमी हालचाल करत चारी कप्प्याच्या मधोमध एक मोकळी जागा होती तिथे गॅस बर्नर बसवला होता तीच आमच्या कॅप्टन डॉनची उभ राहाण्याची जागा होती

बास्केटमधे चढून कस उभ राहायच, बलून जमिनीवर उतरताना कोणती काळजी घ्यायची याबद्दल डॉनन आधी सूचना दिल्या होत्या आजच्या या सफारीत फक्त आठच धाडसी वीर होते सर्वजण आपापल्या जागी नीट उभे

राहिले बलून तर एकसारख हेलकावे खात होत, उडण्याच्या तयारीत होत, त्याचे दोर अजून खालच्या लोकानी धरून ठेवले होत आता कॅप्टनन गॅस बर्नर चालू केला मोठा जाळ झाला गरम हवा बलूनमध्ये शिरू लागली थड हवेला बाहेर ढकलू लागली बलूनमध्ये आता पुरेशी तरगण्याची क्षमता आली असावी कॅप्टनन खूण केली खालच्या माणसानी दोर सोडून दिले हसतमुखान क्वाहेऽरीचा पुकारा केला एखाद्या तरगत्या पिसासारख हळुवारपणे बलून हवेत उचलल गेल अल्लदपणे तरगू लागल बघता बघता ७०-८० फुटावर पोचल खूप भीती वाटेल अस वाटल होत; पण अगावरून मोरपीस फिराव तितक्या सहजतेन हे घडल

आता बरोबर साडेसहा वाजले होते ताबड फुटल होत पक्षी भराऱ्या घेत होते थडगार वाऱ्याच्या झोताबरोबर बलून निघाल होत आम्ही चक्क पाखरासारखे मसाईमारावरून उडत निघालो होतो विहगम दृश्य म्हणजे काय त्याचा शब्दश अनुभव घेत होतो वरून झेब्रे आणि ग्नूचे कळप एकत्र हुदडताना दिसत होते दूर दक्षिणेकडे दिसणाऱ्या टाझानिया सरहद्दीकडे त्याचा प्रवास चाललेला होता प्राथमिक शाळेची मुल कशी रागेत पण दगा करत ट्रिपला जातात तसच ते गमतीदार दृश्य होत गॅझल आणि इपालाचे कळप छोट्या ठिपक्याच्या रागोळीसारखे दिसत होते त्याच्या शेपट्या लुटुलुटू हलताना इतक्या उचीवरूनही दिसत होत्या. विस्तीर्ण पसरलेल्या माळरानावर अधुनमधून तुरळक झाडी होती हत्ती आणि जिराफ डोकावत होते अँटिलोप म्हणजे शिगाडा काळवीट याना रीडबक असही म्हणतात माराच वैभव असलेली ही देखणी धिप्पाड हरण कालच्या सफारीत भेटली नव्हती आज बलूनमधून बरोब्बर दिसली तशीच इलॅंड जातीची हरणसुद्धा

आमचा कॅप्टन बलूनची दिशा आणि तोल साभाळण्याच काम तर करीतच होता, पण गाईडची भूमिकाही बजावत होता बलून खाली येऊ लागल की पुन्हा गरम हवा भरून तो त्याला ठराविक उचीवर ठेवत असे मात्र बलून पुढे पुढे जात होत ते वाऱ्याच्या झोताबरोबरच काळी आयाळवाला एकाडा सिह झाडाखाली उभा असलेला कॅप्टननच दाखवला इतक्या उचीवरूनही त्याच्या शरीराची भव्यता आणि डौल कळत होता आमच्या बलूनची भलीमोठी सावली खाली पडली होती बलूनबरोबर तीही पुढे पुढे सरकत होते सावलीबरोबर

शर्यत लावल्याप्रमाणे रानडुकराचीही पळापळ चालली होती कॅप्टनच्या दोन गाड्या जमिनीवरून आमचा पाठलाग करत होत्या बलून ज्या दिशेला जाईल तिकडे पाठोपाठ येत होत्या

बघता बघता एक तास सपला उन्ह चढू लागली गॅस बर्नरमुळे हवा गरम भासू लागली गरम हवेत खूप प्रवाह निर्माण होतात त्यामुळे बलून हेलकावे खात म्हणून बलून सफारी नेहमी पहाटेच्या थड वेळी असते हळूहळू बलूनमधली हवा कमी करून कॅप्टनन ते खाली आणायला सुरुवात केली आणि थोड्याच वेळात जराही धक्का न बसता एका मोकळ्या जागेत कुशलतेन त्यान बलून उतरवल त्याच्या सूचनेनुसार बास्केटमध्ये खाली बसून आम्ही आधारपट्टे धरून ठेवले होते त्यामुळे कोणताही त्रास झाला नाही आमच्या या विचित्र यानातून आम्ही बाहेर उड्या टाकल्या, तेवढ्यात एक गाडी तिथ येऊन पोचलीच गाडीतून आम्ही निघालो आणि २-३ मिनिटातच अकेशियाच्या सावलीत येऊन पुन्हा गाडी थाबली ओहो ! या लोकानी एक टेबल आणि छोटी छोटी स्टुल झाडाखाली माडून नाश्त्याचा सरजाम जय्यत तयार ठेवला होता टेबलावर सुदरसा चौकडीचा टेबलक्लॉथ आणि अगदी पुष्पगुच्छसुद्धा निरनिराळे सँडविच, चीज, बटर, अड्याचे प्रकार, केक, फळे आणि चहाकॉफीऐवजी नाजूक नखरेल पेल्यातून शँपेन हा 'बुश'मधला शँपेन-ब्रेकफास्ट बलून सफारीच खास आकर्षण समजला जातो खर तर इथ पायी फिरायला मनाई आहे पण हा नाश्ता मात्र गाडीबाहेर पडून मोकळेपणान गप्पा मारत आम्ही घेतला एक सात-आठ हत्तींच कुटुब वाटचाल करीत वास्तविक आमच्या दिशेनच येत होत मात्र माणसाना पाहून की काय त्यानी सरळ दुसरी वाट धरली गॅझलचा एक कळप दुडकत तिथ आला, आणि बुजून दुसरीकडे निघून गेला सकाळची ती प्रसन्न वेळ, मोकळ वातावरण-आम्हाला काही धोका आहे अस जाणवतच नव्हत

मनसोक्त खाण झाल्यावर तहान भागवण्यासाठी आम्ही पेप्सीचे कॅन उचलले आणि गाडीत जाऊन बसलो या गाडीचा ड्रायव्हर एक पोरगेला तरुण होता गभीर चेहऱ्याचा हा मुलगा तोंडी परीक्षेत धडाधडा उत्तर द्यावीत तशी प्राण्याची पुस्तकी माहिती म्हणून दाखवत होता 'टस्कर' कुणाला म्हणतात ? विचारल की लगेच हस्तिदताची सारी माहिती, जगातल्या सगळ्यात लाब हस्तिदताच वजन, घेर, लाबी हे सार त्याला तोंडपाठ होत मी त्याला या

पाठोपाठ इंगित विचारल तेव्हा कळल, अभयारण्यात गाईडच काम करायला या लोकाना प्रशिक्षण घ्याव लागत इथला कानाकोपरा पालथा घालावा लागतो प्राणिपक्ष्याची इत्थभूत माहिती मिळवावी लागते लेखी व तोंडी परीक्षा द्यावी लागते तेव्हाच प्रमाणपत्र मिळून गाईडची नोकरी मिळते अर्थात् आमच्या बार्नीपाशी प्रदीर्घ अनुभवातून आलेला अनेक मनोरजक गोष्टींचा खजिनाच होता, तुलनेन हा अगदी 'सखाराम गटणे' वाटला

## बबूनचा खट्याळपणा

कीकरॉक लॉजवर परत आलो इथला पोहण्याचा तलाव आमच्या रूमच्या अगदी विरुद्ध टोकाला होता त्यामुळे पोहण्याचा बेत रहित केला मस्त स्नान वगैरे करून लॉजच्या आवारात इकडेतिकडे भटकू लागलो एका दालनामध्ये फार मोठ्या मोठ्या लोकाच्या तसबिरी लावल्या होत्या इग्लडची राणी एलिझाबेथ, नॉर्वेचे राजे, अमूक देशाचे अध्यक्ष, तमूक देशाचे पतप्रधान वगैरे ही सारी बडी मडळी मसाईमाराला भेट देऊन गेली होती इथल सर्वांत जुन पहिल लॉज म्हणून कीकरॉकला त्याच आतिथ्य करता आल साक्षात् पोप पॉलसुद्धा व्हॅटिकनमधून इकडे येऊन इथल्या प्राण्याना आणि माणसाना आपले पवित्र आशीर्वाद देऊन गेले होते

आमचा कॅप्टन डॉन तिथ हजरच होता लफ्फेबाज सही करून त्यान आमची उड्डाणप्रमाणपत्र तयार ठेवली होती कोणकोणते प्राणी 'वरून' पाहिले त्याची नोंदही प्रमाणपत्रावर होती डॉन मूळचा अमेरिकन, लॉस एजेलिसचा राहणारा वयाच्या पधराव्या वर्षी तो विमान चालवायला शिकला म्हणे! गेली आठ वर्षे इथ मसाईमारात आहे "इतक्या कडक उन्हाळ्यात घरापासून इतक्या दूर काम करायला कस काय आवडत? अस विचारल्यावर खास अमेरिकन पद्धतीन खादे उडवून त्यान सागितल 'It's a living" जुन्या पठडीतली एक कविता आठवली - "पोटासाठी भटकत जरी दूर देशी फिरेन मी राजाच्या सदनी अथवा घोर रानी शिरेन.."

दुपारची जेवण झाली. सारेजण एकमेकाशी सफारीत काय काय पाहिल त्याची चर्चा करत होते बलून सफारी अगदी कमी लोक घेतात, त्यामुळे उत्सुकतेन आमच्याकडे विचारणा होत होती 'एक अविस्मरणीय अनुभव' अस आम्ही वर्णन करत होतो थोडा वेळ गप्पा झाल्यावर झोप यायला लागली म्हणून

खोलीत जाऊन बिछान्यावर अग टाकल बाहेर कडक ऊन तळपत असल तरी वारा झुळुझुळू वाहात होता हवा येण्यासाठी खोलीचा एक दरवाजा उघडा ठेवला होता डोळा कधी लागला ते समजलच नाही अन् अचानक काहीतरी खसफस आवाज आल्यामुळे जाग आली डोळे उघडले सामान ठेवण्याच शेल्फ आतल्या बाजूला होत तिथूनच आवाज येत होता खोलीत चोर शिरला की काय ? काहीही पुढे करायच्या आतच एक काळाकभिन्न केसाळ हुप्प्या आतून तोंडात शेव आणि लाडूच्या पिशव्या धरून रुबाबात आला आपलीच खोली असल्यासारखा राजरोसपणे दरवाजातून बाहेर चालता झाला उभा राहिला असता तर माणसाएवढी त्याची उची भरली असती मागोमाग पळतच आम्ही बाहेर गेलो तर आरामात मोकळ्या जागेवर बसून तो लाडूचा समाचार घेत होता तेवढ्यात एका गोऱ्या बाईन त्याच व्हिडिओ चित्रीकरण करायला सुरुवात केली बघता बघता आणखी प्रेक्षक जमले आफ्रिकन बबून जातीचा हा हुप्प्या कुणाला फार जवळ येऊ देत नव्हता लगेच दात विचकून भीती दाखवत होता शेवटी फार गर्दी जमली तेव्हा त्यान ती लूट सोडून तिकडून पोबारा केला ताबडतोब स्टर्लिंग पक्ष्याचा एक घोळका तिथ जमला आणि कुलुकुलू आवाजात भाडत त्या खाऊवर तुटून पडला

लॉजच्या आवारात ही बबून माकड पुष्कळ दिसत होती पण ती काही पाळीव नव्हती उलट 'माकडाना खिजवू नका, खायला देऊ नका' अशा पाट्या जागोजागी लावल्या होत्या मात्र हे बबून्स भुरट्या चोऱ्या करायला चागले सोकावले होते कारण पुढच्या पाचच मिनिटात त्याच हुप्प्यान पलीकडच्या खोलीत घुसून काहीतरी पळवल सधी मिळताच डल्ला मारणाऱ्या बबूनच्या गोष्टी खूप ऐकल्या नतर 'साबुरू' अभयारण्यात बबूनन एका बाईची पर्स पळवली उच झाडावर बसून पर्स उघडून आत खाण्यालायक काही आहे का बघितल पासपोर्ट, विमानाची तिकिट, प्रवासी धनादेश अशा महत्त्वाच्या वस्तू खाली फेकल्या शेवटी ती पर्सच निराश होऊन भिरकावून दिली त्या बाईची अवस्था मात्र केविलवाणी झाली होती नशीब की त्यान पासपोर्ट फाडला नाही आम्ही प्रत्येक ठिकाणी लॉजच्या इमारतीत राहिलो पण जे लोक सफारीवर तबूत राहतात त्याना तर फार काळजी घ्यावी लागते सर्व खाद्यपदार्थ लपवून चक्क कुलपात ठेवायचे आणि वर जड वजन ठेवायच अशी पद्धत आहे तबूच्या

कापडाला कुलूप लावल तर बबून कापडच फाडतात थोडक्यात काय आमच्या दिवाळीच्या फराळावर बबूनच नाव लिहिलेल होत

### आफ्रिकेचं वैभव - शिगी गेंडा

आफ्रिकन हत्तींच्या खालोखाल मला कुतूहल होत गेंड्याबद्दल ऱ्हायनोसेरस म्हणजे शिगी गेंडा हे आफ्रिकेच एके काळच वैभव खरोखर गेंडा हा प्राणी दिसायला तसा ओबडधोबड, कुरूपच म्हणाना! तो काही सशासारखा गोजिरवाणा नाही की हरणासारखे विशाल डोळे त्याला लाभलेले नाहीत सिंहाचा मर्दानी रुबाब किंवा चित्त्याची चपळताही नाही त्याच्याकडे अगडबब शरीर, अनाकर्षक राखाडी रग, जाड सुरकुत्यानी भरलेली त्वचा, मिचमिचे डोळे आणि कपाळावरच शिग अस हे गबाळ ध्यान कुणाच्या मनात प्रेम उत्पन्न करणार? त्यातून त्याचा स्वभावही गरीब, प्रेमळ नाही चिडखोर, सतापी, एकलकोंडा आणि अनपेक्षित वागणारा प्राणी अशी त्याची कीर्ती आहे तेव्हा त्याच्या वाटेला जायच माणसाला तरी मुळीच कारण नाही

पण हत्तींना हस्तिदताचा, शहामृगाना रेशमी पिसांचा आणि हरणाना मखमली कातड्याचा शाप असतो तसाच एक अजब शोध कुणाच्या तरी सुपीक मेंदूत लावला म्हणे, गेंड्याच्या शिगात पुरुषाची लैंगिक शक्ती वाढवण्याचे गुण असतात! झाल - त्या शिगाची पावडर करून केलेली औषध, गोळ्या चीन, तैवानच्या बाजारात मिळू लागल्या. अति श्रीमताच्या, नवश्रीमताच्या देशात अशा गोळ्याना भरपूर गिऱ्हाइक मिळू लागली बघता बघता गेंड्याच्या शिगाच्या किमती आकाशाला जाऊन भिडल्या कायद्याला धाब्यावर बसवून, चोरून शिकार करणाऱ्या सोमाली, इथिओपियनाच्या बदुकींना आफ्रिकन गेंड्याचे बळी पडू लागले एकेका शिगाला लाख लाख डॉलर हे आकर्षण जबरदस्त होत केवळ दहा वर्षांच्या अवधीत विध्वसक मानवान गेंड्याची सख्या २ लाखावरून २५,००० वर आणली तेव्हा कुठे जगातले निसर्गप्रेमी, पर्यावरणवादी आणि प्राणिशास्त्रज्ञाना जाग आली गेडा हा प्राणी पृथ्वीवरून नामशेष होतो की काय अशी परिस्थिती असताना ॲना मर्झ या ब्रिटिश स्त्रीन गेंड्याचा निर्वंश होऊ देणार नाही म्हणून कबर कसली

केनियातले बलाढ्य जमीनदार क्रेग कुटुबीय यानी या कामगिरीसाठी ॲनाला ५,००० एकर जमीन देऊ केली इथ माऊट केनियाच्या पायथ्याशी

अॅनान जगातल पहिल गेंडा अभयारण्य तयार केल आणि स्वत ला गेंड्याच सरक्षण आणि सवर्धन यासाठी वाहून घेतल. आज त्या अभयारण्यात ४० गेंडे आहेत तर केनियातल्या सर्वात मोठ्या म्हणजे मारा अभयारण्यात केवळ ८ गेंडे उरले आहेत

सफारीतून फिरणाऱ्या पर्यटकाना गेंडा पाहायला मिळण हे म्हणूनच दुरापास्त झालेल आहे अन् त्यामुळे गेंडा पाहण हा पर्यटकाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न होऊन बसलाय बार्नीन अनेकाच्या कथा सागितल्या ना! लोकाना वाटत, सफारीचे पैसे खर्च केलेत ना, मग ऱ्हायनो दिसत नाही म्हणजे काय! ऱ्हायनो दिसला तर पैसे वसूल! बार्नीकडे 'ऱ्हायनो दाखव' म्हणून हट्टच धरून बसायची मडळी बार्नी म्हणतो, "तुम्हाला ऱ्हायनो बघायचाय! मग नैरोबी प्राणिसग्रहालयात जा ना! तिथ पिंजऱ्यात अडकवून ठेवलाय प्रदर्शनीय गेंडा इथे मारामध्ये गेंडा फिरतो आपल्या मर्जीन, राजीखुशीन अख्खा दिवस इथल्या वाटा पिंजून काढल्या तरी दिसेलच अस नाही नशिबवान असाल तर दर्शन होईल त्याच "

पण आमच नशीब जोरावर असाव बार्नीला साधारणपणे कोणत्या भागात गेंडा आढळतो याची माहिती होतीच सफारीची वेळ सपता सपताच गाडीतल्या रेडिओन अचानक जागा होऊन सदेश द्यायला सुरुवात केली मग बार्नीन गाडी जोरदार पळवण, आणि इतर २-३ गाड्या थाबल्या होत्या तिथे जाऊन पोचण अल्पावधीतच रीतसर पार पडल सुमारे १० मीटर अतरावर उच उच वाढलेल्या गवतात एक काळ धूड पसरल्यासारख दिसत होत, एखादा खडक पसरावा तस त्याच पूर्ण रूप पाहाण्याचे प्रयत्न वेगवेगळ्या कोनातून आम्ही करत होतो पण स्वारी आपल्याच मस्तीत पहुडली होती आता हळूहळू लोकाची भीती चेपली आणि गाड्या पुढे पुढे सरकू लागल्या गेंड्याभोवतालच गाड्याच वर्तुळ लहान लहान होऊ लागल कॅमेऱ्याचे फ्लॅश पटापट चमकू लागले त्या चचल प्रकाशाला तो बुजला असावा आता आमची दखल घेण त्याला भाग होत. ते अक्राळविक्राळ धूड जेव्हा उठून उभ राहिल आणि आपल्या अधू मिचमिच्या डोळ्यानी आमच्याकडे पाहू लागल तेव्हा त्याचा अवाढव्य आकार पाहून आम्ही चागलेच धास्तावलो आता त्यान कान हलवले, मान हलवली एक दोन पावल टाकून प्रेक्षकाचा अदाज घेतला गेंडा एकदा बिथरला आणि धावून आला की मोटरगाड्याच काय, रेल्वेचे डबेही उलथून टाकू शकतो, अस समजल

होत त्यामुळे सुज्ञपणे आम्ही तिथून काढता पाय घेतला पण दुर्मिळ गेंड्याच दर्शन झाल्याचा आनद काही वेगळात होता

**वनराजाच अखेरचं दर्शन**

आज सध्याकाळी ४ वाजता जेव्हा 'मारा'मधल्या शेवटच्या सफारीवर आम्ही निघालो, तेव्हा वाटल, वन्य पशूना त्याच्या नैसर्गिक निवासस्थानी जाऊन पाहण्याची ही अखेरची सधी दुर्मिळ ऱ्हायनो दाखवून बार्नीन आम्हाला सफारीचा बोनस दिला तसच सहसा न दिसणार दृश्य आजच्या या भटकतीमध्ये सुदैवान आम्ही पाहू शकलो

कालपासून इथ अनेक सिहिणी आणि त्याचे बच्चे अस कौटुबिक दृश्य खूप वेळा पाहिल पण सिह आणि सिहीण याची क्रीडा अचानकपणे एका घळईत चाललेली दिसली सिह काळी आयाळवाला, रुबाबदार, धाक वाटावा असा, खेड्यातला मजबूत हाडापेराचा भरघोस मिशाचा पाटील जणू मादी नुकतीच तारुण्यात पदार्पण केलेली, बुजरी, नवथर, घाबरणारी निदान आम्हाला तरी तस वाटल ती गुरगुरत होती, शेपटी फुगवत होती, पजा उगारत होती सगळ स्पष्ट दिसत होत सिह ताकदीन तिच्यापेक्षा नक्कीच वरचढ होता, काही वेळा आपल वर्चस्व सिद्ध करीत होता त्या वनराजाच्या खासगी आयुष्यात डोकावण थोड्या वेळान आम्हालाच निषिद्ध वाटू लागल म्हणून तिथून सटकलो 'बॉर्न फ्री' सिनेमात शेवटी एल्सा सिहीण अशाच दिसणाऱ्या सिंहान साद घातल्यावर मालकिणीला सोडून त्याच्या पाठोपाठ निघून जाते

सिह, चित्ता किंवा बिबळ्या याच्या माद्या जेव्हा माजावर येतात तेव्हा झाडाच्या बुध्यावर त्या मूत्रविसर्जन करतात त्याला एक विशिष्ट गध येतो मादी सवगड्याच्या शोधात आहे हे निमत्रण नराला तेव्हाच मिळत अर्थात सिह एक कुटुबवत्सल प्राणी असल्यान एका नवऱ्याबरोबर २-३ बायका आणि मुल सारे सुखान नादतात चित्ता किंवा बिबळ्या मात्र एकेकटे फिरतात माद्या काही महिने पिलाच सगोपन करतात स्वत शिकार करण्यासाठी ती तयार झाली की पिलही आईपासून स्वतत्र होतात

अबोसेलीचे जिराफ आणि मसाईमारातले जिराफ वेगवेगळे होते अबोसेलीला जिराफाच्या अगावर आपल्या कवडी गच्चीप्रमाणे रेषामय नक्षी होती त्याना रेटिक्युलेटेड जिराफ म्हणतात इथे 'मसाई' जिराफाच्या अगावर

चादण्या चादण्याच डिझाइन इथे 'टोपी', 'हार्टबीस्ट' आणि 'अँटेलोप' अशा मोठ्या जातीची हरण मुबलक, अबोसेलीला जास्त करून छोट्या नाजुक जाती - गॅझल आणि इपाला

थोडस पुढे एका निष्पर्ण वृक्षाच्या फाद्यावर बरीच गिधाड नुसती बसलेली दिसली ती एकमेकाकडे पाहात पण कोणीच उडून खाली येत नव्हत त्याना भक्ष्य दिसत असाव, पण जवळ जायची भीती वाटत असावी एवढ्यात २-३ गाड्या थाबलेल्या दिसल्या म्हणून आम्हीही थाबलो तिथे 'फ्रेश किल' बघायला मिळाल नुकत्याच मारलेल्या वाइल्डबीस्टच्या शरीरावर पाय ठेवून सिहीण दिमाखात उभी होती तिच तोंड सगळ रक्ताळलेल होत दुसरी सिहीणही दुसऱ्या बाजून लचके तोडत होती आसपास ३-४ बच्चे कल्ला करत होते सिहिणी एकमेकींवर प्रेम करतात 'एक तीळ सात जणात' वाटून खायला त्याची हरकत नसते शिकारसुद्धा दोघी-तिघी मिळून करतात विशेषत जनावर मोठ असेल तर 'आयत्या बिळावर नागोबा' तसा आयत्या शिकारीवर सिह ताव मारतो निसर्गाची ही रीत माणसानही उचललीय दिवसभर कष्ट करून ससार चालवणाऱ्या आणि बेकार नवऱ्याला दारूचे पैसे देणाऱ्या बायका प्रत्येक झोपडपट्टीत आढळतातच

रात्री जेवण झाल्यावर लॉजच्या आवारातच थोडी शतपावली केली अन् झोपायला गेलो उद्या लौकर उठायच होत नैरोबीला लवकर पोचून मोंबासाला जाण्यासाठी विमान पकडायच होत दुपारचा 'बबूनचा खट्याळपणा' लक्षात असल्यामुळे दारखिडक्या काळजीपूर्वक बद केलेल्या होत्या

कधीतरी मध्यरात्री एकदम जाग आली - कसल्यातरी डुरकावण्याच्या आवाजान खोलीबाहेरच्या व्हराड्यात कोणीतरी आल होत काचेवर पाय किंवा डोक घासल्याचा स्पष्ट आवाज येत होता - थोडी धसफस - खुडबुड भरीत भर म्हणून दिवे गेलेले डोळ्यात बोट घातल तरी दिसणार नाही असा गच्च काळोख तेवढ्यात पलीकडून कोणीतरी शक्तिमान टॉर्चचा झोत मारू लागल प्रखर प्रकाशझोतात अनेक डोळे चमकले अस दिसल दुडक्या चालीन कोणीतरी पळतय् असा आवाज आला आमची भीतीन गाळण उडाली खोलीत फोनही नव्हता बाह्य जगाशी सपर्क नव्हता आणि दाराबाहेर कोण येऊन ठाकल होत देव जाणे। पण जनावर कमीत कमी ८-१० असावीत जीव मुठीत धरून तसेच

बसून राहिलो खोलीची सपूर्ण एक भित काचेची होती एखादा रानरेडा किंवा गेंडा चाल करून आला तर काचेचा काय टिकाव लागणार! अर्ध्यापाऊण तासान हळूहळू शातता पसरली, तोपर्यंत टॉर्चचे झोत फिरतच होते नतर खूप उशिरा झोप लागली

दुसऱ्या दिवशीची सकाळ नेहेमीसारखीच उजाडली आणि या रहस्याचा उलगडा झाला एकतर इथ जनरेटर्सवर वीजनिर्मिती, म्हणजे काटकसरीनच वीज वापरायची - म्हणून दररोज रात्री ११ च्या पुढे वीजपुरवठा बदच ठेवतात अशा वेळी जगलातून झेब्रे, मू, किंवा जिराफही लॉजच्या आवारात घुसतात मात्र ते तसे धोकादायक नाहीत अबोसेलीला लॉजबाहेरच्या कुपणातून विद्युतप्रवाह खेळवला होता इथ जनावराना तसा कोणताच अटकाव नाही मग या अनाहूत पाहुण्याना घालवण्यासाठी लॉजचे कर्मचारी विजेरीचे झोत मारतात, कारण हे प्राणी प्रखर उजेडाला घाबरतात जिराफ आवारातल्या झाडाचे शेंडे खुडून टाकतात झेब्रे नुकत्या वर आलेल्या झाडाना पाठी घासून ती पार खिळखिळी करतात एकूण, या जनावरामुळे इतक्या काळजीपूर्वक जोपासलेल्या वृक्षवल्लींची पुरी वाट लागते शिवाय या गवतखाऊ प्राण्यापासून धोका नसला, तरी त्याच्या मागावर आलेल्या निशाचर हिंस्र श्वापदाच काय? हा प्रश्न तसा अनुत्तरित राहिला काही ठिकाणी तबूत राहायची सोय केली जाते, त्यावेळी सरक्षणव्यवस्था कशी असते याची माहितीच काढावी लागेल

## बळी तो कान पिळी

७

गवतखाऊ प्राण्याना शत्रू बरेच असल्यान, स्वत च्या रक्षणासाठी त्याना सावध राहाव लागत, शक्ती आणि युक्ती दोन्हीचा वापर करावा लागतो हरण, झेब्रे यासारखे प्राणी दिसायला निरुपद्रवी दिसले तरी त्याच्या त्याच्या वर्तुळात ते आक्रमक बनू शकतात. विशेषत दरवर्षी 'मेटिग सीझन' मध्ये तर काळवीट नाकातून जोरात फुसाडतात. खुरानी जमीन उकरतात आणि शिग रोखून दुसऱ्या नराना आव्हान देतात स्वत च्या 'राज्याच्या' सीमेच्या रक्षणासाठी ते अत्यत जागरुक असतात हरिणींच्या वेताच्या हगामात हरणाच्या कळपातले ताणतणाव अधिकच वाढतात स्थलातराच्या वेळी गवतखाऊ प्राणी उघड्यावर येतात आणि हिंस्र श्वापदाचा धोका त्या वेळी सर्वात जास्त असतो अशा वेळी २-२ लाख वाइल्डबीस्टची पिल जन्माला येतात आणि धडपडून पायावर उभ राहून कळपाचा आसरा घ्यायची घाई करतात

वेळप्रसगी एकाकी काळवीट शिगाच्या हत्यारान चित्ता किंवा बिबळ्याचाही सामना करू धजतो बबून माकडाचा शत्रू झाडावर लीलया चढणारा बिबळ्याच असतो पण बिबळ्यासुद्धा बबून एकटादुकटा असल्याशिवाय हल्ला चढवीत नाही माजराला दारखिडक्या बद असलेल्या खोलीत कोंडल आणि काठीचा धाक दाखवला तर तेसुद्धा सगळ्या शरीराची कमान करत, मिशा फेंदारत आणि हिस्स आवाज करत त्याचप्रमाणे बबूनच्या पुढ्यात शत्रू येऊन ठाकला तर बबूनचेही केस ताठ उभे राहतात, डोक वरती करून जबडा उघडून तो दात विचकतो, डोळे गरागरा फिरवीत पुढच्या पायान थयथयाट करतो एकूण असा त्याचा भीतिदायक अवतार पाहून एखादा हिंस्र पशूही माघार घेतो

ऱ्हायनोसारख्या बलिष्ठ प्राण्यालाही अनेक सकटाचा सामना करावा लागतो ऱ्हायनोचा प्रजोत्पादनाचा वेग अत्यत कमी आहे - एक मादी तब्बल ३ वर्षांनी पिलाला जन्म देते आजूबाजूच्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची त्याची क्षमताही तशी कमीच आहे ऱ्हायनोंच्या पिलानाही तरसापासून सिहापर्यंत शत्रू

असतातच हत्ती, जिराफ आणि ऱ्हायनो हे प्राणी शाकाहारीच असले तरी प्रचड आकार आणि जबरदस्त ताकद यामुळे ते जगलात तग धरतात

समरूपता हे निसर्गान प्राण्याना दिलेल दुसर साधन आजूबाजूच्या परिसरात पूर्ण मिसळून जवळजवळ दिसेनास व्हायच आणि स्वत चा जीव वाचवायचा हरणाच्या अगावरचे पट्टे किंवा ठिपके त्याना झुडपात कौशल्यान लपवतात झेब्रे दिवसाउजेडी उघड्या माळरानावर अतिशय उठून दिसतात त्यामुळे ते फार अस्वस्थ आणि सावध असतात, पण ज्या वेळी सिहाच्या हल्ल्याचा धोका जास्तीत जास्त असतो अशा सधिप्रकाशात ते जवळजवळ अदृश्य होतात

सूर्याची ऊर्जा हिरव्या वनस्पतीत साठवली जाते शाकाहारी प्राणी वनस्पती खातात मासाहारी प्राणी शाकाहारींवर किंवा आपल्याहून लहान आकाराच्या मासाहारींवर जगतात प्राण्याच्या मृत शरीराची त्याच भूमीवर अत्यत पद्धतशीरपणे विल्हेवाट लावली जाते पर्यावरणाचा समतोल अचूक राखला जातो यालाच जीव - भू - रसायन चक्र म्हणतात (Bio-Geo-Chemical Cycle) हे जगलात अविश्रात चालू असत

सिंह हा सगळ्या हिंस्र श्वापदात निर्विवादपणे आकारान मोठा, वजनात भारी आणि बलशाली आहे हत्ती, ऱ्हायनोसारख्या मोठमोठ्या प्राण्याची शिकारही तो सघटितपणे करू शकतो २-३ सिहिणी आणि ४-५ छावे मिळून भक्ष्याभोवती अर्धवर्तुळाकार उभे राहून एकत्रितपणे हल्ला चढवतात पण अर्थात त्याच खाद्य झेब्रे किंवा नू हेच असत

बिबळ्याची ताकद, चपळता आणि अचूकता सिंहापेक्षाही श्रेष्ठ आहे स्वत च्या वजनापेक्षा मोठ भक्ष्य बिबळ्या सहज मारू शकतो आणि दातात पकडून झाडावर घेऊन जाऊ शकतो पाणवठ्यावर ओठगलेल्या एखाद्या झाडाच्या फादीवर गुपचूप दबा धरून बसणे आणि अधारात पाण्यावर आलेल्या जनावरावर एकदम झेप घेऊन त्याच्या नरडीचा घोट घेणे ही बिबळ्याची पद्धत !

आम्हाला पाहायला न मिळालेली आफ्रिकन रानकुत्र्याची टोळी म्हणजे सर्वांत योजनाबद्ध शिकारी समजले जातात अस म्हणतात की सिहाच कुटुब गवतात पहुडल असेल तर जवळच हरण, इपाला आणि गॅझल खुशाल चरत राहतात, पण रानकुत्र्याचा नुसता आवाज लाबवरून आला तरी सैरावैरा पळत सुटतात मात्र तितक्याच वेगान न थकता मैलोन्‌मैल त्याचा पाठलाग करण्याची

क्षमता रानकुत्र्यामध्ये असल्यामुळे बहुधा कुत्र्याची सरशी होते

सर्वात महत्त्वाच - शिकार ही खेळ किंवा मनोरजन म्हणून केली जात नाही, तर भूक भागवण्यासाठीच केली जाते पोट भरताच शिकार थाबते अनेक प्रकारची हिंस्र श्वापद असूनही त्याच्या जातीनुसार त्याच आवडत भक्ष्य वेगळवेगळ असत - त्यामुळे त्याच्यात सघर्ष होत नाही एखाद्या ठिकाणी शिकार मिळण अवघड झाल्यास तो प्राणी ती जागा सोडून दुसरीकडे जातो, त्यामुळे तिथे राहिलेल्याना आपली सख्या वाढवायची सधी मिळते

शिकार हा जगलाच्या पर्यावरणाचा एक महत्त्वाचा घटक आहे कोल्हे, तरस, शिकारी पक्षी (गरुड, ससाणे वगैरे) सामान्यपणे कळपातल्या अशक्त, जखमी, वृद्ध, बालक अशाची हत्या करतात - जे जगायला तितकेसे समर्थ नसतात डार्विनच्या 'Survival of the fittest' या विचारसूत्राचा पडताळा इथे येतो मोठे शिकारी (सिह, बिबळ्या इ ) मात्र ऐन उमेदीतली जनावर मारतात, पण ही हत्या बेगुमान नसते तर 'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' एवढ्यापुरतीच असते म्हणूनच की काय माणसाला हिंस्रतम श्वापद - 'Wanton Predator म्हटल आहे

## मसाईमाराला रामराम - चलो मोंबासा

**८**

सकाळचे ६ वाजले होते लॉजच्या स्वयपाकगृहातून आम्हाला ब्रेकफास्ट व्यवस्थित पॅक करून मिळाला, फक्त एक कप चहा घेऊन आम्ही कीकरॉकचा निरोप घेतला पुन्हा एकदा खडबडीत कच्च्या रस्त्यावरून आमची निसान नैरोबीच्या दिशेन पळू लागली आता नैरोबी विमानतळावर आम्हाला नेऊन सोडल की बार्नीचा आणि आमचा सबध तुटणार होता गेले पाच दिवस कुशलतेन त्यान आमच सारथ्य केल होत आफ्रिकन बुशचे सारे पैलू आमच्यासमोर पेश केले होते रानातल्या जीवसृष्टीचा परिचय करून दिला होता मसाई लोकाविषयी, तसच एकूण कृष्णवशीय लोकाच्या अनेक गोष्टी सागून त्याच्या समाजजीवनात डोकवायची सधी दिली होती हे सार करताना आपण फार अवघड किंवा कटाळवाण काम करतोय असा आव न आणता अनेक लोककथा आणि हास्यविनोद सागून वातावरण प्रसन्न राखल होत अशा बार्नीच्या रूपान आम्हाला एक सच्चा आफ्रिकी मित्र लाभला होता आमच्या गाडीत त्यान बोटीवर ठेवतात तसल लॉगबुक ठेवल होत त्यात रोजच्या रोज घडणाऱ्या उल्लेखनीय घटनाची नोंद करायची होती मीही इमानेइतबारे ते लॉगबुक रोज भरल शेवटी बार्नीबद्दल मनापासून कौतुकाची उधळण करून मी ते लिखाण सपवल

तीनचार तासानी आमची गाडी पक्क्या गुळगुळीत रस्त्याला लागली लवकरच नैरोबीचा बोर्ड दिसू लागला, आणि थेट नैरोबी विमानतळाकडे आम्ही कूच केल आता त्याच्या अतर्गत (डोमेस्टिक) एअरपोर्टवरून आम्हाला मोंबासाला जायच होत आमची बुश सफारी सपली होती त्यात आलेला शीण घालवण्यासाठी दोन दिवस मोंबासाला मुक्काम होता

मोंबासा! अगदी लहानपणापासून आफ्रिका खडाचा नकाशा काढला की मोंबासा नजरेत भरे युरोपीयन दर्यावर्दी लोकानी अटलाटिकमध्ये जी व्यापारी जहाज हाकारली ती केप ऑफ गुड होपला वळसा घालून दार-एस-सलाम, झाजीबार आणि मोंबासाला येऊन थाबत असत तसेच उत्तर आफ्रिकेच्या अरबी

देशाचे खलाशी तांबड्या समुद्रातून मोठ्या सख्येन इकडे मोंबासाला येऊन पोचले त्यामुळे कित्येक शतकापासून आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावरच हे नैसर्गिक बदर आतरराष्ट्रीय व्यापाराच मोठ केंद्र बनल आजही केनियामधल ते दुसऱ्या क्रमाकाच शहर आहे.

मोंबासाचे आजचे रहिवासी दिसायला आफ्रिकी नीग्रोपेक्षा वेगळे आहेत कारण ते अरब आणि नीग्रो याच्या वर्णसकरातून निर्माण झाले आहेत मोंबासाला बोलली जाणारी भाषासुद्धा एक मिश्रबोली आहे जुन मोंबासा शहर व्यापारउदिमाच्या निरनिराळ्या इमारतींनी गच्च भरलेल आहे सपूर्ण रस्त्यावर छत्र धरणारी कृत्रिम हस्तिदताची कमान हे या शहराच चिन्ह आहे तसच प्रचड आकाराचा कॉफीमग हे दुसर चिन्ह अरबानी इथे प्रथम कॉफीचा व्यापार सुरू केला अस म्हणतात मोंबासाला अनेक वर्षं पोर्तुगीज, स्पॅनिश वसाहती होत्या त्याची स्मृतिचिन्ह म्हणजे तत्कालीन वास्तुकला दाखवणारी चर्चेस आणि हवेल्या किंवा किल्लेवजा इमारती

अलीकडे काही वर्षांत मोंबासाच नैसर्गिक सौंदर्य लोकाच्या नजरेत भरल पाढराशुभ्र रेतीचा सागरकिनारा, गर्द झावळ्याचे पखे झुलवणारी ताडामाडाची झाड आणि निरनिराळ्या जलक्रीडा करण्यासाठी सुयोग्य समुद्र याचा उपयोग करून मोंबासाला आता एक अत्याधुनिक सागरी क्रीडाकेंद्र म्हणून विकसित करण्यात आल आहे जिथ व्यापारी बोटी आणि त्याच्याबरोबर येणार बकालपण याचा मागमूसही नाही अशा या नवीन मोंबासाचा सागरकिनारा म्हणजे मैलोनूमैल पसरलेली एकापुढे एक बाधलेल्या आलीशान हॉटेल्सची मालिकाच आहे

आम्ही राहिलो होतो ते हॉटेल सिल्व्हर ऑर्किड या मालिकेची शान अधिकच वाढवणार होत तीन तीन पोहण्याचे तलाव, अनेक मदिरागृह, वेगवेगळ्या पद्धतीची पाकसिद्धी करणारी भोजनालय, जिम्नॅशियम, ब्यूटीपार्लर, डिस्कोथेक, ठिकठिकाणी विखुरलेली क्यूरिओशॉप्स् आणि ५०० हून अधिक शयनकक्ष असणार हे भपकेबाज हॉटेल धिल्लन नावाच्या पजाब्याच्या मालकीच होत सहाशे कर्मचारी त्या हॉटेलमध्ये धिल्लनसाहेबाच्या हुकुमावर नाचत होते हे पाहून आम्ही अवाक् झालो त्या हॉटेलच्या सर्व कॉरिडॉर्सची लाबी काही किलोमीटर भरली असती

आमच्या भोजनाची सोय चक्क भारतीय भोजनगृहात करण्यात आली

होती इतके दिवस आम्ही वेगळ्याच रुचीचे शाकाहारी पदार्थ आवडीन खात होतो पण इथ आम्हाला खास पजाबी डिशेस्, आईस्क्रीम वगैरे मिळाल आणि अगदी अतरात्मा तृप्त झाला उत्कृष्ट प्रतीच सागरीखाद्य (मासे, खेकडे, कालव, अगदी ऑक्टोपस सुद्धा) हीसुद्धा इथली खासियत होती आणि अशा समुद्रभाज्याचा आस्वाद अनेकानी आवडीन घेतला भोजन चालू असताना अत्यत सुरेल आवाजात पाश्चात्य सगीत ऐकू येत होत इकडे सर्वत्रच जेवणानतर कॉफी घेण्याची पद्धत आहे त्यानुसार वाफाळणारे कॉफीचे कप हातात घेऊन आम्ही त्या मोहून टाकणाऱ्या सुराचा मागोवा घ्यायला सुरुवात केली. खालच्या मजल्यावर एका प्रशस्त लाउजमध्ये मडळी वेताच्या आरामदार्यी खुर्च्यांवर बसून कॉफीचा आस्वाद घेत होती समोर एक कृश गरीब चेहेऱ्याची नीग्रो तरुणी हातात माइक धरून सुराचा स्वर्ग निर्माण करत होती तिला एक नीग्रो तरुण एकाच वेळी अनेक वाद्य सफाईन वाजवीत पार्श्वसगीत देत होता तोंडात माऊथ ऑर्गन, हातात गिटार आणि दोन्ही पायाना 'बोंगो' बाधलेले, असा तो वन मॅन ऑर्केस्ट्रा होता बघता बघता श्रोत्याचे पाय ताल देऊ लागले, माना डोलू लागल्या, कॉफीचे कप दूर ठेवले गेले लोकप्रिय गाण्याच्या फर्माइशी होऊ लागल्या सामान्य रूपाची ती गायिका अचानक सुदर भासू लागली आमच्याजवळ बसलेली एक मध्यमवयीन जोडी नकळत उठली आणि मधल्या मोकळ्या जागेत वॉल्ट्झचे पदन्यास करू लागली, खर तर पाश्चात्य सगीत आणि नृत्य यात आम्ही अनभिज्ञ पण बघताना जाणवत होत, दोघानाही तालाची उत्तम जाण आहे, आणि एकमेकाशी कोऑर्डिनेशन तर मस्तच आहे स्वत च्याच मस्तीत हरवलेल ते जोडप बघताबघता वाढत्या वयाच्या बधनातून मुक्त होत होत त्याच्यापासून स्फूर्ती घेऊन इतरही लोक उठले आणि तो सारा लाउज नृत्याच्या तालावर झुलू लागला ती सध्याकाळ मोठी जादूभरी वाटली

ड्रमच्या ठेक्यावर नाचणारे आफ्रिकी आणि पाश्चात्य लोक काही काळापुरती तरी स्वत वरची शिष्टाचाराची जाचक बधन विसरतात आणि मनातल्या स्वच्छद ऊर्मींना वाट करून देतात ही प्रथा आम्हा भारतीयात का बर नाही ? आम्ही पाढरेपेशे सतत आपली परीटघडी का सांभाळत राहातो ? पढरीच्या वारीत ग्यानबा तुकारामाच्या गजरात धुद होऊन रिंगण धरणारे वारकरी असेच बधमुक्त होत असतील, नाही ?

दुसऱ्या दिवशी सकाळी पोहायच ठरवल होत म्हणून ६ वाजताच सगळ्यात

मोठ्या तलावावर पोचलो तेव्हा कळलं, तलाव ७ वाजता खुला होतो म्हणून पाणी तर अगदी नितळ पारदर्शी होत, पण रात्री झाडाची पानं वगैरे पाण्यात गळून पडली होती ती साफ करायच काम चालल होत म्हणून आम्ही समुद्रकिनाऱ्यावर भटकायला गेलो शेजारचच होटेल प्रसिद्ध 'व्हाइटसँडस्' निघाल इथे आजवर अनेक हिंदी सिनेमाच चित्रीकरण झालय दोन्ही हॉटेलात इतर सर्व सुखसोयी होत्याच, पण सागरी क्रीडाची सोय आमच्या इथ फारच चागली होती स्कूबा डायव्हिंग, स्नॉर्केलिग (पाणबुड्याच्या पोशाखात पाण्याच्या आत जाण), वॉटरस्कीइग, विंडसर्फिंग, पॅरासेलिगपासून ते डीप सी फिशिगपर्यंत सर्व प्रकार उपलब्ध होते शक्तिमान स्नायू, साहसी स्वभाव आणि गरम खिसा या तिन्ही गोष्टी एकत्र पाहिजेत त्यासाठी!

मोंबासाहून उत्तरेला जवळच मालिंदी म्हणून बेट आहे तिथ जाण्यासाठी मोबासाहून रोज बससेवा किंवा फेरी आहे मासेमारी हा पाश्चात्याचा आवडता क्रीडाप्रकार आहे अशासाठी मालिंदी नदनवनासारख आहे इथ जवळच प्रेक्षणीय अशी दुसरी जागा म्हणजे शिबा हिल अभयारण्य हत्तींच सवर्धन आणि सरक्षण यासाठीच खास हे अरण्य घोषित करण्यात आल आहे मोंबासाला ऐतिहासिक महत्त्वाच एक पुरातन दीपगृह आहे ते अजूनही चागल्या अवस्थेत आहे तिथ आम्ही रात्री जाऊन वर्तुळाकार फिरणाऱ्या सर्चलाइटची मजा पाहिली

बघता बघता मोंबासातले दोन दिवस कापरासारखे उडून गेले वास्तविक अभयारण्यातला प्रवास काही अगदी खडतर नव्हता पण हे शेवटचे दोन दिवस तर पूर्ण ऐषारामात घालवले मोंबासाहून नैरोबीला येताना विमान २१,००० फुटावर पोचल तेव्हा खिडक्यामधून २०,००० फूट उचीचा किलिमाजारो पर्वत बराच वेळ दिसत राहिला पुन पुन्हा ते दृश्य आम्ही डोळा भरून पाहून घेतल

## आफ्रिका एक चितन

बाकी आफ्रिकन सफारीबद्दल माझ्या ज्या काही कल्पना होत्या त्यातली एक साफच चुकीची होती मला वाटे, आफ्रिकन अभयारण्य म्हणजे घनदाट विषुववृत्तीय पर्जन्यवन असणार निबिड वृक्षाच्या दाटीतून कसबस वाट काढीत आपल्याला जाव लागेल, सर्वांग झाकतील असे कपडे घालावे लागतील आणि जळवा, त्सेत्से माशा, डास असे कीटक भयकर त्रास देतील अर्थात् अशी परिस्थिती असणारी जगल आफ्रिकेत आहेतही पण आपण कुठल्या सफारीची

निवड करतो, त्यावर बरच काही अवलबून आहे आमची 'किली सफारी' तर एकदम सुखावह झाली भौगोलिकदृष्ट्या प्रत्येक ठिकाणी वेगळा अनुभव आला अबोसेली हा पाणथळ दलदलीचा प्रदेश, मसाईमारा हा आफ्रिकन सॅवाना म्हणजे गवताळ कुरणाचा प्रदेश, नैवाशा रिफ्ट व्हॅलीतल नयनरम्य ठिकाण, तर मोंबासा म्हणजे आपल्या गोव्यासारखे। कुठेही कटाळा आला नाही की थकायला झाल नाही

जगातली सर्वांत मोठी अभयारण्य टाझानियात असताना आम्ही केनियाला का गेलो ? याच मुख्य कारण म्हणजे केनियात अनेक वर्षापासून विकसित झालेल पर्यटनखात केनियात १९६१ पर्यंत ब्रिटिश वसाहती होत्या त्यामुळे राज्यकर्त्यांनी शिकारीसाठी म्हणा किंवा प्राणिनिरीक्षणासाठी म्हणा, रस्ते, दळणवळणाची साधन आणि ऐन जगलात मनुष्यवस्तीपासून इतक दूर, सर्व सुखसोयींनी युक्त अशी निवासस्थान उभारली

अर्थात् हेही खरच की जे परकीय गोरे लोक इथे वसाहती करून राहिले त्यानी स्वार्थासाठी या देशात वर्षानुवर्षं मनमानी केली आफ्रिकेच वैभवस्थान असलेले हत्ती, गेंडे, शहामृग, चित्ते आणि सिहाच्या शिकारी केल्या शिसम रोझवुडची अरण्य भुईसपाट केली जेव्हा इथली निसर्गसपत्ती हळूहळू नष्ट होण्याच्या मार्गाला लागली, तेव्हा जगातले विचारवत, प्राणिशास्त्रज्ञ, पक्षीमित्र, पर्यावरणवादी अशी निसर्गप्रेमी शहाणी माणस खडबडून जागी झाली आणि त्यानी प्राण्याच्या कत्तलीविरुद्ध जोरदार आवाज उठवला वन्य पशूच्या शिकारीवर कायद्यान बदी घालायला अनेक देशाच्या प्रशासनाला भाग पाडल वन्यपशूची वसतिस्थान अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आली नामशेष होऊ पाहाणाऱ्या दुर्मिळ पशुपक्ष्याच मुद्दाम सवर्धन करण्याचे प्रयत्न अलीकडे काही वर्षात होऊ लागले आहेत

१९६३ मध्ये नैरोबीला आतरराष्ट्रीय निसर्गसरक्षण परिषद भरवण्यात आली यात विविध देशातल्या, व्यवसायातल्या - विविध सामाजिक - आर्थिक स्तरातल्या लोकानी भाग घेतला वन्यजीवाच सवर्धन करण्यात येणाऱ्या अडचणी परिषदेपुढे माडल्या गेल्या अभयारण्याच व्यवस्थापन योग्य रीतीन करण ही प्रत्येक आफ्रिकी देशाच्या प्रशासनाची जबाबदारी आहे अस प्रथमच मान्य केल गेल 'Poaching' म्हणजे बेकायदा शिकार ही प्रत्येक अभयारण्याची. समस्याच आहे जोपर्यंत खुद्द आफ्रिकींना आपल्या प्राण्याना अभय द्यावस वाटत नाही तोपर्यंत त्याच

भविष्य खडतर आहे कारण कृष्णवर्शीय लोक वन्य पशूकडे शेतमळे नासणारे, गार्यीना मारणारे किंवा रुचकर मास असलेले प्राणी या नजरेन बघतात टाझानियाचे अध्यक्ष न्यरेरे या परिषदेत जाहीरपणे म्हणाले, "युरोप अमेरिकेतल्या लोकाना प्राणी बघावेसे वाटतात ही एक अगम्य आणि विचित्र आवड दिसतेय, पण ती आपण पुरी केली पाहिजे" - कारण उघड आहे - पर्यटन हे अनेक आफ्रिकी देशाच महत्त्वाच उत्पन्नाच साधन आहे पर्यटनाचा विकास-पर्यायान अभयारण्याचा विकास 'पैसा' याच नगदी कारणासाठी होत असला, तरी अशा प्रयत्नातूनच आफ्रिकी वन्यजीवन पुन्हा पूर्वीसारख समृद्ध होईल, आणि या पृथ्वीचा एक अश त्याच्या नैसर्गिक विशुद्ध वैभवान पुन्हा एकदा तरारून वाढेल अशी आशा आहे

अजूनही आफ्रिकन नीग्रो जागतिक प्रवाहापासून दूरच आहे साक्षरतेच अत्यल्प प्रमाण, कुपोषण, दारिद्र्य, बेकारी, भूकबळी, बालमृत्यूच मोठ प्रमाण ही आजही तिथे वस्तुस्थिती आहे व्यसनाधीनता, गुन्हेगारी, एच.आय व्ही , एबोलासारख्या महाभयकर विषाणूची सतत टागलेली तलवार यामुळे आजचा आफ्रिकी तरुण गाजला आहे हळूहळू छोटे छोटे देश स्वायत्त होत आहेत केनिया हा तुलनेन बराच विकसित देश आहे केनियाचे उद्योगधंदे, नागरी विकास आणि अर्थव्यवहार आता ब्रिटिशाच्या ताब्यात नसून पिढ्यान् पिढ्या तिथे स्थायिक झालेल्या भारतीयाच्या हातात आहेत गुजराती, पजाबी, सिंधी आडनावाच्या पाट्या जागोजाग आहेत रस्त्यान दिसणाऱ्या प्रत्येक भपकेबाज मोटारीचा मालक, प्रत्येक राजमहालासारख्या बगल्याचा मालक भारतीय वशाचा असतो शाळा कॉलेजना सुद्धा भारतीय नाव दिलेली आढळली आपल्या देशात पारतत्र्यकाळात इग्रज हिंदी लोकाना तुच्छतेन वागवीत इकडेसुद्धा आफ्रिकी लोकाना शोषित, दलित भूमिकाच वाट्याला आली आहे प्रचड आर्थिक विषमता हे इथल्या समाजाच विदारक शल्य आहे काही थोडे मूठभर अतिश्रीमत आणि बाकीचे सारे दारिद्र्यरेषेखाली अशी परिस्थिती आहे समाजाची नैतिक, शैक्षणिक, सास्कृतिक मूल्य जपण्याच काम करणारा जो मध्यमवर्ग असतो तो आफ्रिकेत अस्तित्वातच नाही त्यातूनच जन्म घेते गुन्हेगारी आजचा नीग्रो तरुण चैन, उपभोगाच्या इतका मागे आहे की चाकू किंवा रिव्हॉल्व्हरच्या धाकावर वाटमारी, चोरी, सशस्त्र घरफोडी, दरोडे, खून, बलात्कार या सगळ्याच गुन्ह्याच प्रमाण इथ भीतिदायक आहे नैरोबीसारख्या आधुनिक शहरातही 'सध्याकाळी रस्त्यान

एकटेदुकटे फिरू नका' अशा सक्त सूचना पर्यटकाना दिल्या जातात कोणतेही दागिने किंवा मौल्यवान घड्याळ घालून सफारीवर जाण सुरक्षित नाही अस आम्हाला आधीच मित्रमडळीनी सागितल होत त्यानुसार मी अगदी जुन घड्याळ घालून गेले तरी एके ठिकाणी एक विक्रेता त्याच्याकडच्या लाकडी जिराफाच्या बदल्यात मला घड्याळच मागू लागला अर्थात हे वाचून सफारीवर जाण्याचा विचार बदलायच कारण नाही कारण जोवर आपण पर्यटनसस्थेच्या नियमानुसार राहतो तोवर आपल्या सुरक्षिततेची पूर्ण जबाबदारी त्याचीच असते पर्यटनामुळे त्याना अमूल्य परकीय चलन मिळत, तेव्हा पर्यटकाना ते फुलासारखं जपतात

## गेले पाहायचे राहून



मला पूर्ण कल्पना आहे की 'किली सफारी' हा पूर्व आफ्रिकेचा एक छोटासा भाग आहे केनियातच अजून कितीतरी ठिकाण पाहण्यासारखी आहेत ऐकल आहे की इथली ट्रीटॉप सफारी हा एक अनोखा अनुभव आहे इथे उच मजबूत निलगिरी वृक्षाच्या बुध्यावर बाधलेल्या लाकडी केबिनमध्ये रात्र काढायची आहे आसमतात मुद्दाम निर्माण केलेल्या क्षारमय पाणथळीवर दिवसा किंवा रात्रीसुद्धा शेकडो प्राणी येतात ते पाहायचे आहेत अशा पाणथळीला Salt lick म्हणतात ट्री टॉप आर्कला ऐतिहासिक महत्त्व आहे १९५२ साली इथली पाहुणी होती इग्लडची राजकन्या एलिझाबेथ इथे तिचा मुक्काम असतानाच तिला कळवण्यात आल की इग्लडचे राजे मरण पावले असून, राजसिहासनाची वारस म्हणून तिला घोषित करण्यात आल आहे इथूनच ही भावी राणी राज्याभिषेकासाठी मायदेशी परतली

साबुरू अभयारण्याला भेट देऊन निळ्या पायाचा सोमाली शहामृग, आणि विषुववृत्ताची रेषा पहिलीच पाहिजे तिथे एक पाय उत्तर गोलार्धात आणि एक पाय दक्षिण गोलार्धात ठेवून फोटो काढायला हवा

माऊट केनिया म्हणजे किकुयूच्या देवाच सिहासन (Throne of Kikuyu god) अस म्हणतात इथला 'माऊट केनिया सफारी क्लब', थडगार आल्हाददायक हवा, सभोवार शभर मैलापर्यंत पसरलेली वनराई आणि क्लबमधून होणार माउट केनियाच्या शिखराच दर्शन या साऱ्याची वर्णन मनाला मोह घालणारीच आहेच

पण याहूनही महत्त्वाच म्हणजे पुढच्या वेळी भेट द्यायचीच टाझानियाला मसाईमाराला लागूनच दक्षिणेकडे पसरलेल जगातल सगळ्यात मोठ अभयारण्य सेरेन्गटी म्हणजे लेक न्याराझापर्यंत विस्तारलेल पठार आहे आफ्रिकन सॅवानाचा हा प्रदेश नुसता गवताळ कुरणानी झाकलेला आहे उन्हाळ्यात हे गवत वाळून सोनेरी होत-त्यात वावरणाऱ्या सिहाच्या त्वचेसारख सेरेन्गटीमध्ये डाबरी रस्ते नाहीत - शहर - खेडी - झोपड्या काही, काही नाही नजर पोचेपर्यंत इथे दिसत फक्त गवत, गवतातून डोकावणारे खडक, काटेरी अकेशियाची झाड आणि

निर्भयतेन वावरणारे वन्य पशू

उन्हाळ्यात हे पठार तापत, गरम हवेच्या झळा सळसळत वर येतात हवेत गरम प्रवाहाच्या लाटा निर्माण होतात छोट्या विमानांना, बलून्सना राख झटकावी तस झटकून देतात विमानाचे किंवा हेलिकॉप्टरचे आवाज आले की इथले प्राणी बावरतात, गोंधळतात, इतस्तत धावू लागतात त्याच्या खुरानी धूळ वर उडायला लागते

झेब्रा, इपाला किंवा वाईल्ड बीस्टचे हे कळप धावताना पाहून काय वाटत त्याच वर्णन करण अवघड आहे पाळीव गाईम्हशींचे सुस्त कळप आणि हे पूर्ण रानटी पशू यात जमीनअस्मानाच अतर आहे निसर्गाच्या पूर्ण ताब्यात असलेली ही भूमी, इथला रानवटपणा, मानवी व्यापारीकरणाचा जराही ठसा न उमटलेले इथले वन्य जीव पाहताना, अज्ञात प्रदेशात पहिल पाऊल टाकताना माणसाला जो काही आनद होत असेल तीच भावना उफाळून येते ही पृथ्वी यत्रयुगाच्या 'सुसस्कृतपणाच्या' आधी कशी होती याच दर्शन म्हणजे हे इपालाचे कळप

सेरेन्गटीमध्येच एक भौगोलिक चमत्कार म्हणता येईल अस न्गोरोन्गोरो (Ngorongoro) ज्वालामुखीच विवर आहे या विवराच्या उतरत्या भितींवर आणि तळाशी इतक्या मोठ्या सख्येन वन्यप्राणी आढळतात की हे विवर एकदा पाहिल की सर्व आफ्रिकन वन्यजीवन पाहिल्यासारखच आहे इथेच मन्यारा सरोवराजवळ ट्रीलायन्स-म्हणजे जगातली एकमेव झाडावर राहणारी सिहाची जात दृष्टीस पडते

आणि जगातला सगळ्यात मोठा धबधबा पाहायचा असेल तर आफ्रिकेलाच जाव लागेल पण केनियापासून खूप दूर, दक्षिणेकडे जिथे झाम्बिया आणि झिंबाब्वेच्या सरहद्दीवरून महानदी झाबेझी वाहाते या नदीच्या काठी उगवणाऱ्या गवताला एलेफट ग्रास म्हणतात, कारण हत्ती लपून जाईल एवढ ते घनदाट आणि उच असत झाबेझीतून फेरफटका मारला तर पाणी इतक सथ दिसत की पुढे काही मैलावर जगातल्या सात आश्चर्यापैकी एक वाट पाहातय ही कल्पनाही येत नाही आपण बोटीतून फिरत असताना, पाण्यातून डोकी काढून बघतात हिप्पो आणि सुसरी, कारण झाबेझी हे त्याच घर आहे आणि मानवप्राणी तिथला पाहुणा!

या झाबेझीच्या प्रवाहात शतकानुशतकापूर्वी एक नवल घडल धरणीकप झाला आणि नदीचा तळ एकदम खचला आणि तयार झाला एक महाप्रचड

जलप्रपात दोनदोनशे मीटर उचीपर्यंत जलतुषार उडवणारा 'मोसिआतुन्या' (Mosi-oa Tunya) इथे राहाणाऱ्या आफ्रिकी लोकाना कितीतरी लाबून या धबधब्याची गाज ऐकू येई वर उडणारे तुषार दुरून पाहताना दरीतून धूर निघतोय असा भास होई या दरीत राहाणारा वनदेव क्रोधान गर्जना करतोय अस त्या भाबड्या जीवाना वाटे म्हणून त्यानी याच नाव ठेवल 'मोसिआतुन्या' याचा अर्थ आहे The Smoke That Thunders गर्जना करणारा धूम्रासुर

१९ व्या शतकात इथे गोरे लोक आले त्याच्यापैकी एक धाडसी प्रवासी डॉ डेव्हिड लिव्हिग्स्टन यान या खेचून घेणाऱ्या अविरत आवाजाचा मागोवा घेतला तेव्हा नजरेत मावणार नाही असा अलोट जलप्रपात त्याच्या दृष्टीस पडला त्या राजनिष्ठ इग्रजान त्याला नाव दिल 'व्हिक्टोरिया फॉल्स'. सूर्यकिरण त्याच्या तुषारातून जातात तेव्हा एकाच वेळी दोन दोन तीन तीन पूर्ण वर्तुळाकृती इद्रधनुष्य इथे दिसतात, हे खरोखर अलौकिक दृश्य आहे एका वेळी फक्त एक माणूस जाऊ शकेल एवढा अरुद पूल या धबधब्यासमोर बाधलाय त्याला 'Knife-edge bridge' 'असिधारा पूल' अस म्हणतात त्यावर उभ राहून खाली दिसणार ते अमाप, कधी न सपणार, मोहिनीमत्र घालणार पाणी निसर्गाच्या रौद्रभीषणतेचा प्रत्यय देत

झाबियाची राजधानी लुसाकाहून रस्त्यान किंवा विमानमार्गे लिव्हिग्स्टनला जाता येत किंवा झिबाब्वेची राजधानी हरारे इथूनही लिव्हिग्स्टन गाठता येत हे छोटस गाव व्हिक्टोरिया फॉल्सच्या समोरच वसवलेल आहे डॉ लिव्हिग्स्टनच स्मारक म्हणून जगप्रसिद्ध नायगारा धबधब्याचे ज्याप्रमाणे अमेरिकन आणि कॅनेडियन असे दोन भाग आहेत, तसाच व्हिक्टोरिया फॉल्स पण झाबिया आणि झिबाब्वे दोन्ही देशात आहे पण हे दोन्ही धबधबे पाहणारे म्हणतात, व्हिक्टोरिया फॉल्सपुढे नायगारा म्हणजे जगली चित्त्यापुढे पाळीव माजर!

अशी आहे विस्तीर्ण, अ-नागर, अपरिचित, वैविध्यान समृद्ध आफ्रिका Black is beautiful म्हणायला लावणारे इथले आदिवासी आफ्रिकेच गूढ आकर्षण कोणत्याही विकसित देशात नाही आफ्रिकेला 'डार्क कॉंटिनेंट' - कृष्णखड म्हणतात या कृष्णखडाच्या सावलीत राहावस वाटल जॉय अॅडमसन, कुकी गॉलमन, जेन गुडाल, अॅना मर्झ याच्यासारख्या पशुपक्षीप्रेमींना म्हणून इथल पर्यावरण, वन्य जीवन जपण्यासाठी त्यानी आयुष्य वेचल अशा एकेक व्यक्तीन नामशेष होऊ पाहणाऱ्या दुर्मिळ पशुपक्ष्याच्या सरक्षणासाठी लढा उभारला

जॉन वर्टीसारख्या छायाचित्रकारान दोन-दोन, तीन-तीन वर्ष सलग दुर्गम जगलात राहून चित्ते, बिबळ्या, सिह याची वसतिस्थान, शिकारीची पद्धत, नरमादी आणि बच्च्याचे सबध याच आदी जवळून, जिवाचा धोका पत्करून छायाचित्रण केल म्हणून आपल्यासारख्या लोकाना या रानावनातल्या दुनियेत डोकावता आल अशा लोकाची सख्या वाढो आणि इथल वन्य जीवन पुन्हा पूर्वीसारख समृद्ध होवो अशी मनापासून इच्छा गुड बाय्! क्वाहेऽरी !!

■ □ ■

अ-प्रवास
८६
२१४२८

REFBK-0029428